


# सार्थ श्रीगुरूपरम्परामृतम्



श्री रामदेव श्री वीरविठ्ठलदेव प्रसन्न

# सार्थ श्रीगुरूपरम्परामृतम्


* प्रथमावृत्ती - १९०४

* पुनर्मुद्रण - २००४

* प्रकाशक *

वसंतराव धेंपे शैक्षणिक आणि संशोधन प्रतिष्ठान,

पणजी-गोवा.

फोन : २२२६२८१-८६

* मुद्रक *

राजहंस प्रिंटिंग प्रेस,

नागाळा, कोल्हापूर - ४१६ ००२.

फोन : २६६४६३०

(खाजगी वितरणाकरिता)

# सार्थ श्रीगुरूपरम्परामृतम्

✽ प्रकाशक ✽
वसंतराव धेंपे शैक्षणिक आणि संशोधन प्रतिष्ठान,
पणजी–गोवा
फोन : २२२६२८१–८६

## श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश

# श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

### संदेश

**श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्य पदवाक्य प्रमाण**
**पारावार पारीण यमनियमाद्यष्टांग योग संपन्न**
**श्रीमद्वैष्णवसिध्दान्त प्रतिष्ठापनाचार्य वर्य**
**श्रीमत्सकल सुरनिकर मुकुटमणिरंजित दिव्य**
**श्रीरामदेव वीरविट्ठल चरणकमलसंततानुराधक**
**श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश**
**श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर करकमलसंजात**
**श्रीमद्द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर वरकुमारक**
**श्रीमद्विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांचा आशीर्वाद**

''श्री गुरुपरम्परामृतम्'' या सन १९०४ मध्ये प्रकाशित झालेल्या जुन्या ग्रंथाची नवी आवृत्ती प्रसिध्द करण्याचा तुमचा मनोदय स्तुत्य आहे. भटकळ नरसिंह पुराणिक आणि कुमठा नारायणाचार्य यांनी श्रीमठ परंपरेतील वीस स्वामीजींचा परिचय करून देणारे संस्कृत श्लोक रचले आणि प्रत्येक श्लोकाचा सुबोध मराठी अनुवादही जोडल्याने या पुस्तकाची उपयुक्तता वाढली. श्रीगुरुपीठाबद्दल अनुयायांच्या मनात भक्ति व आदर निर्माण करण्याचा तो एक अभिनंदनीय प्रयत्न होता. सदर पुस्तकांतील एक स्तबक, ज्यामध्ये विविध पुण्यतिथी व वृंदावनस्थळांची नोंद आहे, आज या पुस्तकाच्या प्रती दुर्मिळ झाल्या आहेत.

या पुनर्मुद्रणाने इतिहासाचा एक आराखडा वाचकांना दृग्गोचर होईल शिवाय ते भक्तिस्तोत्र आहे. मठमंदिरांच्या जीर्णोध्दाराप्रमाणेच जीर्ण व दुर्मिळ विचारसंपदेचे पुनर्मुद्रण हेही एक पुण्यकार्यच असते. इतिहासकाळापासून आजतागायत धेंपे घराण्याने श्रीगुरुपीठाची अनन्य भक्तिभावे केलेली सेवा सर्वश्रुत आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रथम प्रकाशनाच्या शताब्दिप्रसंगी त्याच्या पुर्नमुद्रणाचा योग यावा आणि ते कार्य तुमचे पितामह वसंतराव धेंपे यांच्या स्मृत्यर्थ स्थापित प्रतिष्ठानामार्फत व्हावे हा दैवी योगायोगच होय. आम्ही प्रसन्न मनाने या उपक्रमाचे स्वागत करतो.

तुमचे व तुमच्या कुटुंबियांचे सतत कल्याण व क्षेमाभिवृध्दि व्हावी यासाठी श्रीवीरविट्ठल सान्निध्यात पंढरपुर येथील चातुर्मासकालीन वास्तव्यातून आशीर्वाद प्रेषित आहोत.

**इति श्री नारायण स्मरणम्**

क्षेत्र पंढरपुर,
दि. २९ ऑगस्ट २००४

# प्रयोजन

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मटाच्या पर्तगाळी येथील मुख्यालयांत एका उत्सवानिमित्त गेलो असता, माझे लक्ष ग्रंथालयातील एका जीर्ण पुस्तकाकडे गेले. कुतूहलाने मी ते उचलले. पुस्तकाचे शीर्षक 'सार्थ श्रीगुरुपरम्परामृतम्' असे असून श्री शके १८२५ (सन १९०४) मध्ये प्रकाशित झाले होते. संस्कृत भाषेतील हे काव्य रचलेले असून सुबोध मराठी गद्य अनुवादहि प्रत्येक श्लोकाअखेर दिलेला आहे. श्री मठपरम्परेतील विसावे आचार्य प.पू. श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ स्वामी महाराजांचा पट्टाभिषेक शके १८१४ मध्ये झाल्यानंतर त्यांच्या आर्शीर्वादाने लिहिलेले श्रीगुरुपरम्परेचा परिचय करून देणारे हे काव्य दत्तात्रेय गोविंद सडेकर यांनी आपल्या छापखान्यात मुद्रित करून खानापूर येथे प्रसिध्द केले. पुस्तकातील प्रथमादिषष्ठपर्यंतचे सहा स्तवक आणि अष्टमस्तवक भटकळ-श्रीनरसिंह पौराणिक ह्यांनी रचले आहे असे प्रस्तावनेत नमूद करून ठेवलेले आहे. या ग्रंथात प्रथमादि सप्तम पर्यंतच्या सात स्तवकांत श्रीगोकर्ण संस्थानाधिपती श्रीगुरु महाराजांची चरित्रें आली आहेत. सप्तम आणि नवम स्तवक कुमठानारायणचार्य यांनी रचलेले आहेत. अष्टम स्तवकांत परम्परेतील श्रीगुरुवर्यांच्या पुण्यतिथी व वृन्दावनस्थळे नमूद करण्यात आलेली आहेत.

माझ्या हातात पडलेल्या पुस्तकाची प्रत जीर्ण असली तरी सुवाच्य होती. मुद्रित पुस्तकाच्या पहिल्याच पृष्ठावर वरच्या कोन्या भागात 'ही पटी श्रीनिवास धेंपे यांची असे' - ता. १३ सेतंब्र १९०४ अशी नोंद होती.

ठीक शंभराव्या वर्षी हा ग्रंथ माझ्या हाती पोचविण्यामागे एखादा दैवी संकेत तर नसेल ना असा विचार मनाला स्पर्शून गेला. माझ्या पणजोबाचे नाव आज मी धारण करीत आहे, ही जाणीव उत्कटतेने झाली. यावर्षी विद्यमान तेविसावे मठाधीश श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी महाराज यांची षष्ट्यब्दि साजरी होत असताना ह्या प्राचीन गुरुपरंपरेच्या पद्य इतिहासाचे पुनर्मुद्रण करून नव्या पिढीला तो उपलब्ध करून द्यावा असा विचार मनात आला आणि तो प्रस्ताव प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींसमोर ठेवला असता प.पू. श्री स्वामीजींनी प्रसन्न मनाने अनुकूलता दर्शविली म्हणून ह्या पुस्तकाचे पुनर्मुद्रण होऊ शकले. इतिहासाच्या दृष्टीने विचार करता हे पुस्तक अपूर्ण आहे हे ओघाने आलेच. तरी गत शंभर वर्षांच्या इतिहासाची नोंद या पुनर्मुद्रित आवृत्तीला जोडलेली आहे.

प.पू. श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामींच्या षष्ट्यब्दि प्रसंगी हे सुगंधी पुष्प श्रीचरणी अर्पण करण्याची संधि मिळाल्याबद्दल मी कृतार्थ आहे.

**श्रीनिवास वासुदेव शेणवी धेंपे**
अध्यक्ष
**वसंतराव धेंपे प्रतिष्ठान**

पणजी
२९ ऑगस्ट २००४

सार्थ -

# श्रीगुरुपरम्परामृतम्

किंवा

श्रीमन्मध्वमतानुयायिश्रीगौडसारस्वतवैष्णव
ब्रह्मवृन्दान्तर्गतश्रीगोकर्णमठसंस्थानाधिपति
श्रीगुरुमहाराजचरित्रम् ।।

हे

श्रीमद्धरिगुरुभक्तांकरिता
कुमठा-नारायणाचार्य यांनी शोधिले

# प्रकाशकाचे दोन शब्द

या संग्राह्य आणि परमवंद्य ग्रंथास लोकाश्रय चांगला मिळेल अशी आशा आहे ती श्री स्वामीकृपेनें पूर्ण होवो. या ग्रंथाच्या प्रती खपून थोडीशी मदत होतांच श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामीकृत द्वैतार्थपर श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ छापून प्रसिध्द करण्यात येईल. सदरील गीता ग्रंथ फारच महत्वाचा असून संस्कृत मूळ-श्लोक, त्यांवर संस्कृत टीका आणि मराठी तात्पर्यार्थ मिळून बराच मोठा होणार आहे. यामुळें तो छापून प्रसिध्द करण्यास खर्चही बराच लागेल करितां जिज्ञासु लोकांनी या ग्रंथास आश्रय देऊन श्रीगीताग्रंथप्रकाशनाचें श्रेय मिळवावें अशी नम्रतापूर्वक प्रार्थना करितों.

श्री गुरुपंरपरामृत ग्रंथास असो किंवा श्री मद्भगवद्गीता ग्रंथास असो ज्यांच्याकडून मदत होईल त्यांची ती मदत अनाठायीं होणार नाही. कारण तिच्यापैकी कांहीं भाग श्रीमठाकडे जाणार आहे आणि हें कामही संस्थानाचेंच आहे, या करिता कोणीही थोड्या खर्चाकडे न पाहतां मुख्य कर्तव्यांपैकी एक कर्तव्य किंवा अनेक खर्चाच्या बाबी पैकी पहिली ही एक बाब समजून या कृत्यास मदत करावी.

आपलेपणाची ओळख व्हावी, संस्थानची थोरवी कळावी आणि विचारांची प्रगल्भता वाढावी तर अशा प्रकारचे अनेक ग्रंथ संस्थानांतून आम्हांस प्राप्त झाले पाहिजेत आणि आम्हीही ते मोठ्या आवडीनें वाचले पाहिजेत तरच उभयपक्षी प्रोत्साहन उत्पन्न होऊन आनंदस्थान अशा श्रीस्वामीकृपेने इच्छितार्थ पूर्णत्वास पावतील, असो. आपण सूज्ञ आहां, पूर्ण अभिमानी आहां, विचारी आहा, तेव्हां आपणास जास्त सांगितलें पाहिजे असें नाही. वरील दोन शब्दांवरूनच आपल्या लक्षांत सर्व आशय आला असेल व तो येवो इतकी श्री विष्णूकडे आणि श्री गुरुस्वामींकडे याचना करून आपली रजा घेतों.

खानापूर
१/१/१९०४

प्रकाशक
**दत्तात्रेय गोविंद सडेकर**

(मूळ ग्रंथातून)



॥ श्रीद्वैत सिध्दांत प्रतिष्ठापनाचार्य ॥
॥ श्रीमदिंदिराकांत तीर्थ श्रीपाद वडेर ॥
(पट्टाभिषेक शके १८१४ नंदन संवत्सर)
चित्रशाळा प्रेस, पुणें

# सूचना

'विष्णुभक्तिर्देव भक्तिर्गुरुभक्तिस्तथैव च।
तत्तच्छ्रैष्ठ्यानुसारणे मुक्तौ नियतसाधनम्
भक्तिपूर्तौ भवेन्मुक्तिस्तदभावे च नो भवेत्'।।
- इति वृहदारण्यकोपनिषद्भाष्यम् ।

श्रीमन्मध्वमतानुयायी श्रीगौडसारस्वतवैष्णवब्रह्मवृंदांत श्रीगोकर्णमठसंस्थान व श्रीकाशीमठसंस्थान अशी दोन संस्थानें आज पुष्कळ दिवसांपासून शिष्यप्रशिष्यपरंपरेनें चालत आलीं आहेत; या उभय संस्थानच्या भजक शिष्यमंडळीस 'आपल्या मठाचे श्रीगुरुमहाराज कधींपासून झाले? ते आजपर्यंत किती झाले? त्यांनी कोणकोणती सत्कृत्ये आचरिलीं? ते कोठे कोठे व केव्हा केव्हा मुक्त झाले? या त्या मठांतील अचुक चालू असलेले संप्रदाय शिष्यवर्गानें पाळावयाचे असतात ते कोणते कोणते?' वगैरे माहिती नसून परपंथीय पुस्तकें पाहून त्यांत गुंग होत्यातें ते स्वस्वमठसंप्रदायभूत सद्वैष्णव धर्मसुध्दां विसरून, 'सप्ताह, गुरुद्वादशी, पंचायतनपूजा, जीवब्रह्मैक्योपासना वगैरे व्रताचरणें करूं लागले आहेत. फार तर काय स्वसद्वैष्णवसंप्रदायप्रतिष्टापक आदिगुरु श्रीमन्वध्वाचार्य यांचें नांव जन्मांत एकदां सुध्दां त्यांच्या मुखावाटे निघण्याचें कठीण झालें आहे !!!

अशी ही अतिशोचनीय दशा जाणून संप्रति उपलब्ध अनेक ग्रंथाधार पाहून तयार केलेला हा सार्थ श्रीगुरुपरंपरामृत या नांवाचा ग्रंथरूप इतिहास छापण्यांत आला आहे; तज्ज्ञानेच्छु ब्रह्मवृंदानें हा ग्रंथ आपल्या संग्रहात ठेवून यांतील श्रीगुरुमहाराजांची त्रोटक सुचरित्रे वगैरे लक्षपूर्वक ध्यानी आणून स्वस्वांतःकरणपूर्वक श्रीगुरुभक्तिपरायण झाले असतां ते श्रीहरिप्रसादानें धर्मार्थकाममोक्षाख्यचतुर्विधपुरुपार्थसिध्दीस साधन होईल यांत संशय नाही.

या ग्रंथांत, प्रथमादिसप्तपर्यंतच्या सात स्तवकांत श्रीगोकर्णमठसंस्थानाधिपती श्रीगुरुमहाराजांची चरित्रे आलीं आहेत; अष्टमस्तवकांत त्या श्रीगुरुमहाराजांचें सदोदित स्मरण व्हावें म्हणून नित्य पारायणाकरिता मूलमात्र नवम स्तवक लिहिला आहे, हे अष्टमनवमस्तवक क्रमानें प्रथम द्वितीय परिशिष्टत्वानें लिहिले आहेत; यांहून तृतीय परिशिष्टांत अगत्याचे अगे १२ संप्रदाय आले आहेत. आणि शेवटी सर्व स्तवकस्थ श्लोकांची अकारादिवर्णानुक्रमानें अनुक्रमणिका लिहिली आहे.[१]

या ग्रंथाच्या सोवत श्रीगुरुपरंपरापटही एक निराळाच जोडला आहे.


प्रथमादिषष्टपर्यंतचे सहा स्तवक आणि अष्टमस्तवक मात्र श्रीभटकळ-नरसिंहपौराणिक यांनी रचिले आहेत व अवशिष्ट सर्वही श्री कुमटा-नारायणाचार्य यांनी रचिले आहेत.

हे पुस्तक, या पुस्तकाच्या शोधांत राहिलेल्या दोषांवद्दल वाचकांकडे क्षमा मागून घेणाऱ्या श्रीकुमटा-नारायणचार्य यांनीं शोधिलें आहे.

(मूळ ग्रंथांतून) - **शोधक**

---

१. पुनर्मुद्रणांत हा विभाग समाविष्ट नाही.




श्रीमद् पूर्णप्रज्ञतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी



श्रीमद् पद्मनाभतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

|| श्री ||

सार्थ -

# । श्रीगुरुपरम्परामृतम् ।

## । प्रथमः स्तबकः ।

लक्ष्मीशं वरदायकं नरहरिं मध्वं मुनीशं तथा
श्रीशान्तां विजयाभिधां भगवतीं जीवोत्तममादीन्गुरून् ।
नत्वाहं प्रकटीकरोमि भुवने माहात्म्यमिष्टार्थदं
श्रीगोकर्णमठालयाधिपमहासद्वैष्णवस्वामिनाम् ॥

सद्भक्तवरदायक श्रीलक्ष्मीनरसिंह तसेच मुनिवर्य श्रीमन्वध्वाचार्य आणि भगवती श्रीशान्तादुर्गा व श्रीविजयादुर्गा तसेच प्राचीन गुरुवर्य श्रीजीवोत्तमतीर्थ श्रीपादादिधर्माध्यक्ष यांस नमन करून श्रीगोकर्णमठपरंपरागत श्रीमद्वैतसिध्दांतप्रतिष्ठापनाचार्य श्रीगुरुमहाराज यांचे महात्म्य या जगांत मी प्रगट करितो, ज्याच्या श्रवणपठनादिकाने सर्व इष्टार्थ परिपूर्ण होतील. ॥१॥

मया गुरुपरम्परामृतमिदं मुदा रच्यते
गुरुप्रवरतोषणं सुजनवृंदवाग्भूषणम्।
अनेन करुणाकरः सपदि रुक्मिणीनायकः
करोतु विजयं नृणां गुरुवरैः सदा पूजितः ॥ २ ॥

ज्यामुळे सर्व श्रीगुरुमहाराज मजवर संतुष्ट होतील व सर्व सज्जनांची वाणी निर्दोष होईल, असा श्रीगुरुपरंपरामृतनामक हा ग्रंथ मी प्रेमपुरःसर रचितो; या ग्रंथाच्या (श्रवणपठनादिकानें) सर्व सज्जनांना श्रीगुरुमहाराजांना सदाच पूज्यमान् व दयासमुद्र असा श्रीवीरविठ्ठलदेव शीघ्र विजय देवो ॥२॥

इदं कलम्बेन्दुवसुस्थिरमिते शाकेऽत्र वर्षे विजयाभिधानके ।
नृसिंहपौराणिकशर्मणा मया कुम्भापुरे श्रीमति संवितन्यते ।। ३ ।।

या श्रीशालिवाहन शक १८१५ विजयसंवत्सरांत या लक्ष्मीवत् कुमठा शहरांत हा श्रीनरसिंहपौराणिक मी हे श्रीगुरुपरंपरामृत सादरे विस्तार करितों. ।। ३ ।।

सुखमिच्छन्ति सर्वेऽपि न दुःखं तु मनागपि
तच्च देवप्रसादेन जायेतेति हि वेदवाक् ।। ४ ।।

सर्व प्राणिमात्र सतत सुखच इच्छितात, तिळमात्रहि दुःखाची इच्छा करीत नाहीत; अशा निर्दुःख शाश्वत सुखाला 'स्वस्वरूपानंद' म्हणतात, हा आनंद या प्रकृतिबंधांतून मुक्त झाल्यावांचून प्राप्त होणे अशक्य (स्तबक ७ श्लोक६७), 'श्रीमन्नारायणाच्या अनुग्रहावांचून या प्रकृतिबंधांतून मुक्त होणे हेही अशक्य होय.' अशीही [१]श्रुति ऐकतोच.

न प्रसादो विना भक्तिं देवज्ञानं विना न सा ।
गुरुभक्तिं विना ज्ञानं जायेतेति च वेदवाक् ।। ५ ।।

तसेच, श्रीमन्नारायणाच्या ठायीं सुदृढ भक्ति ठेविल्यावांचून त्याचा अनुग्रह होत नाहीं, त्याच्या स्वरूपाचे ज्ञानच जर मुळीच नसेल तर त्याच्याठायीं भक्तिही करिता येत नाही, सद्गुरूंच्या सदुपदेशावांचून किंवा अुनग्रहांदिकावांचून तें नारायणाचें ज्ञान होण्याचाही संभव नसतो, शेवटी 'सद्गुरूंच्याठायीं भक्ति केली असता ते सदुपदेश किंवा अनुग्रहादिक करितात.' अशीही [२]श्रुति ऐकतोच. ।।५।।

---

१. 'यस्य प्रसादात्परमार्तिरूपादस्मात्संसारान्मुच्यते नापरेण ।
नारायणोऽसौ परमो विचिन्त्यो मुमुक्षुभिः कर्मपाशादमुष्मात् ।।
२. 'यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते - (ऽ) कथिता ह्यर्थाः प्रका (श्य) शन्ते महात्मनः ।।'

श्रीसद्गुरुप्रसादार्थं निर्दुःखसुखकामिनः ।
श्रयामः श्रीगुरून्भो भो वर्णयन्तोऽथ तद्यशः ॥६॥

अहो, शाश्वतस्वस्वरूपानंदापेक्षावान् सज्जन हो! या प्रमाणे बारीक विचार केला असतां शेवटी 'सद्गुरूंच्या अनुग्रहावांचून शाश्वतस्वस्वरूपानंदाची प्राप्ति होत नाही' असे ठरते. म्हणून यापुढे त्या सद्गुरुमहाराजांची, चरित्रकीर्ति गात गात आपण सारे त्यांना शरण जाऊं, व त्या योगाने त्यांच्या अुनग्रहास पात्र होऊं ॥६॥

मोक्षार्थी प्राप्नुयान्मोक्षं ज्ञानार्थी ज्ञानमाप्नुयात् ।
विद्यार्थी प्राप्तुयाद्विद्यां पाठस्यास्य प्रभावतः ॥७॥

ज्यास शाश्वतस्वस्वरूपानंदानुभवरूप मोक्षाची इच्छा आहे त्यानेही, ज्यास परात्परतत्वज्ञानाची इच्छा आहे त्यानेही व ज्यास सच्छास्त्रादि विद्येची इच्छा आहे त्यानें ही, भक्तिपूर्वक हे श्रीगुरुपरम्परामृत पठन (पारायण) करावें म्हणजे त्याची त्याची इच्छा परिपूर्ण होईल. ॥७॥

द्रव्यार्थी प्राप्तुयाद्द्रव्यं पुत्रार्थी पुत्रमाप्नुयात् ।
रोगी मुक्तो भवेद्रोगात्पाठस्यास्य प्रभावतः ॥८॥

ज्यास द्रव्याची इच्छा आहे त्यानेही, ज्यास पुत्राची इच्छा आहे त्यानेही व ज्यास रोगांपासून मुक्त होण्याची इच्छा आहे त्यानेही, भक्तिपूर्वक हे श्रीगुरुपरम्परामृत पठन (पारायण) करावे म्हणजे त्याची इच्छा परिपूर्ण होईल. ॥८॥

मूको वाग्मी भवेद्वन्ध्या सगर्भा स्यान्मुदा श्रुतेः ।
अचिन्तः स्यात्सचिन्तोऽपि पाठस्यास्य प्रभावतः ॥९॥

भक्तिपूर्वक हे श्रीगुरुपरम्परामृत ऐकिले असतां मूक तो वक्ता होईल व वांझ स्त्री गरोदर होईल, आणि जो चिंताक्रांत झाला आहे त्याने भक्तिपूर्वक हे श्रीगुरुपंरपरामृत ऐकिले असतां किंवा पठन (पारायण) केलें असतां तो निश्चिंत होईल. ॥९॥

इदं पवित्रचारित्र्यं गुरूणां यः शुचिः पठेत्।
सप्तवारं तिवारं वा सर्वाभीष्टानवाप्नुयात् ॥१०॥

जो मनुष्य शुचिर्भूत (सोंवळा) होत्साता हे श्रीगुरुमहाराजांचे लोकपवित्र चरित्र म्हणजे तत्प्रतिपादक हें श्रीगुरुपंरपरामृत भक्तिपूर्वक सातदां किंवा तीनदां तरी पठन (पारायण) करील त्याचे सर्व मनोरथ सिध्द होतील ॥१०॥

आधार्य जीवोत्तमतीर्थपादैं र्विनिर्मितं संग्रहसारपुस्तकम् ॥
श्रीवादिराजेरितपूर्ववृत्तं विलोक्य चास्मिंश्चरितं लिखामि ॥११॥

श्रीजीवोत्तमतीर्थविरचित सारसंग्रह या ग्रंथास आधार करूनही, श्रीवादिराजतीर्थप्रोक्त इतिहासादिक अवलोकन करूनही, श्रीगुरुमहाराजांचे सर्व चरित्र या ग्रंथात लिहिले जातें. ॥११॥

अल्लीअदिल्शाहमहीश्वरेण प्रत्यर्पितं सच्छदनं विलोक्य ॥
प्रेक्ष्यावनीपैरितरैरनेकैः प्रत्यर्पिता उत्तमपत्रिकाश्च ॥१२॥
पौराणिकेशैश्च तथा कवीशैः संनिर्मितानामपि पुस्तकानाम् ॥
मुख्यार्थमादाय मदीयचित्ते वृत्तं गुरूणां परिवर्णयामि ॥१३॥

अल्ली आदिलशहा या नांवाच्या विजापुरच्या बादशहाने व इतर अनेक राजांनीहि दिलेलीं जयपत्रे आणि रहदारीपत्रें पाहूनही, पुरातन पौराणिकांनी व कवीनी रचिलेल्या ग्रंथाचा मुख्य सारांश मनांत आणूनही, श्रीगुरुमहाराजांचे सर्व चरित्र या ग्रंथांत वर्णिलें आहे. ॥१२॥१३॥

पूर्वं ब्रह्माणमसृजद्विष्णुः सर्जनकर्मणि।
ब्रह्माथ परमान्हंसान्मनसः सनकादिकान् ॥१४॥

पूर्वी म्हणजे सृष्टिकालाच्या आदीं या जगाची सृष्टि निर्माण करण्याकरिता सर्वस्वतंत्र अशा श्रीमन्नारायणाने ब्रम्हदेवास उत्पन्न केला; नंतर त्या ब्रह्मदेवाने आपल्या मनापासून सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार असे चार परमहंस उत्पन्न केले. ॥१४॥

तेषां शिष्यत्वमगाद्दुर्वासाः शङ्करांशजो योगी ।
तच्छिष्यः परतीर्थः सत्यप्रज्ञस्तु तच्छिष्यः ।।१५।।

जो रुद्राच्या अंशापासून अत्रिपत्नी अनुसूयेच्या ठायी उत्पन्न झाला असा दुर्वासमुनि, त्या पूर्वोक्त (१/१४) परमहंसांचे शिष्यत्व पावला; त्यानें स्वाश्रमधर्म उर्जित करण्यासाठी परतीर्थ या नांवाचा शिष्य केला; आणि या परतीर्थांनी सत्यप्रज्ञ या नांवाचा शिष्य केला. ।।१६।।

सत्यप्रज्ञस्य शिष्योऽभूत्प्राज्ञतीर्थो महामतिः।
अच्युतप्रेक्षनामाभूत्प्राज्ञतीर्थस्य शिष्यकः ।।१६।।

त्या सत्यप्रज्ञाचार्यांनी बुध्दिमान् असा प्राज्ञतीर्थ या नावाचा शिष्य केला; प्राज्ञतीर्थांनीही अच्युतप्रेक्षाचार्य यांस चतुर्थाश्रम दिला ।।१६।।

तस्मिन्काले कलिना मलिनं तत्त्वं विचारयन्वायुः।
आनन्दतीर्थनामा शिष्योऽभूत्तस्य तत्त्वमुध्दर्तुम् ।।१७।।

त्यापुढें कांही दिवसांनी कलीच्या प्राबल्याने वैष्णवसिध्दांत म्हणजे खरा मार्ग संपूर्ण मलिन झालेला पाहून भगवदाज्ञेने वायुदेव त्या मलिन वैष्णवसिध्दांत मार्गाचा उद्धार करण्यासाठी श्री शालिवाहनशक १०४० विलंबिसंवत्सर आषाढमास कृष्णपक्ष चतुर्थी दिवशीं श्रीक्षेत्र उडपीजवळ शिवहळ्ळी या गांवांतील श्रीमध्यगेहभट्ट यांच्या घरी वासुदेव या नावाने अवतरून अच्युतप्रेक्षाचार्य स्वामिमहाराजांचें शिष्यत्व पावून श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्य या नांवाने प्रसिध्द झाला; यांनाच द्वैतसिध्दांतप्रतिष्ठापक 'मध्वाचार्य, पूर्णप्रज्ञाचार्य इत्यादि नांवें आहेत[१]. ।।१७।।

---

१.'प्रथमो हनुमान्नाम द्वितीयो भीम एव च।
पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत्कार्यसाधकः ।।'
रामावतारीं - हनुमान, कृष्णावतारीं - भीमसेन आणि कलियुगीं श्री मध्वाचार्य, हे तीन वायुदेवाचेच अवतार.

आनन्दतीर्थार्यकरारविन्दाज्जातो हृषीकेशयतिप्रबर्हः।
जीवेश्वराद्वैतमतं निरस्य द्वैतं प्रतिष्ठाप्य रराज भूमौ ॥१८॥

श्रीमदानंदतीर्थभगवत्पादार्यांचे शिष्य हृषीकेशतीर्थ, यांनीही श्रीमन्मध्वाचार्यामागे जीवेश्वरैक्य मताचा निरास करून जीवेश्वरभेदनिरूपक द्वैत मताची स्थापना केली; व त्यायोगे ते लोकात प्रकाशमान झाले. ॥१८॥

शिष्यः समात्मेश्वरतीर्थकोऽस्य श्रीसंभवोऽस्य त्वपराजितोऽस्य ॥
अस्याभवद्योगिवरश्च विद्यामूर्तिर्यतिः श्रीनिधिरस्य शिष्यः ॥१९॥

त्या हृषीकेशतीर्थांचे शिष्य समात्मेश्वरतीर्थ, त्यांचे शिष्य संभवतीर्थ, त्यांचे शिष्य अपराजिततीर्थ, त्यांचे शिष्य विद्यामूर्तितीर्थ व त्यांचे शिष्य श्रीनिधितीर्थ. ॥१९॥

विद्येशस्तस्छिष्यो विरक्तिमतिमान्बभूव यतिवर्यः।
तच्छिष्यः श्रीवल्लभतीर्थाख्योऽराजत यथा खरकरः ॥२०॥

श्रीनिधितीर्थांचे शिष्य विद्येशतीर्थ, हे तर अत्यंत विषयविरक्त असून भगवदुपासनेत रत होते; त्यांपासून केवल तेजाने सूर्यासारखे श्रीवल्लभतीर्थ झाले. ॥२०॥

तच्छिष्योऽप्यास जगद्भूषणतीर्थो यतिस्तु विद्यावान् ।
तस्यान्तेवासित्वं चक्रे श्रीरामचन्द्रतीर्थाख्यः ॥२१॥

पुढे श्रीवल्लभतीर्थांचे शिष्य जगद्भूषणतीर्थ झाले, हे मोठे विद्वान् होते; त्यांनी स्वधर्म संरक्षण करण्यासाठी श्रीरामचंद्रतीर्थ यांस आश्रम दिला. ॥२१॥

यात्रार्थमुद्युक्तमनाः प्रतस्थे दिशामुदीचीं सहसा परिव्राट् ॥
तीर्थैः पवित्रीकृतगात्रयष्टिस्तुष्टाव सीतापतिमादिदेवम् ॥२२॥

हे श्रीरामचंद्रतीर्थ कांही वर्षांनी महायात्रेच्या उद्देशाने उत्तरदिशेप्रत प्रयाण करिते झाले; त्यांनी सकलतीर्थांच्या स्नानाने आपले गात्र पवित्र करून श्रीफलिमारुमठपरंपरागत उपास्य आदिदेव श्रीरामचंद्रप्रभु याची अखंड स्तुति चालविली. ॥२२॥

तीर्थाभिषेकव्याजेन वाराणस्यां महामनाः।
उवास जान्हवीतीरे वर्षमेकं महामुनिः ॥२३॥

हे श्रीरामचंद्रतीर्थ महानुभाव तीर्थाभिषेकाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र काशीत भागीरथीच्या तीरावर एक वर्ष पर्यंत राहिले. ॥२३॥

ततः स यतिराट् तदा स्वजनसंचयैरन्वितं -
क्रमेण बदरीवनं मुनिभिरन्वितं सुन्दरम् ॥
अवाप्य कमलापतिं विधिभवादिसंसेवितं
दरारिवरधारिणं परिचचार नारायणम् ॥२४॥

तेथून हे यतिराज श्रीरामचंद्रतीर्थ आपल्या कांही शिष्यमंडळीसह मोठमोठे ऋषि राहत असलेल्या मनोहर अशा बदरिकाश्रमात गेले, व तेथें ब्रह्मरुद्रादिदेव निरंतर ज्याची सेवा करितात, ज्यांने हातात शंखचक्रादिके धारण केली आहेत, अशा श्रीनारायणाची उपासना करीत राहिले ॥२४॥

कालं स्वकीयं पुरतो निरीक्ष्य योगी मुमुक्षुः किल रामचन्द्रः ॥
छात्रं सुपात्रं ह्यनवेक्ष्य काले चिन्तां दुरन्तां महतीमवाप ॥२५॥

या रीतीने त्या बदरिकाश्रमात राहत असता श्रीबादरायणोपासनासक्त त्या श्रीरामचंद्रतीर्थश्रीपादांस वार्धक्यदशा प्राप्त होऊन देहावसानसमय जवळ आला; तेव्हा स्वकीय मंडळीत चतुर्थाश्रमास योग्य असा ब्रह्मचारी कोणीही न दिसल्यामुळें आणि कोणास तरी उपदेश देऊन दंडादिक स्वाश्रमधर्मचिन्हे व उपसाहित्ये दिल्यावांचून पंचत्व प्राप्त झाले तरी परलोक दुर्लभ असेही मनांत येऊ लागल्यामुळे त्यांना मोठी चिंता झाली. ॥२५॥

शैलाङ्कवैश्वानरभूमिसंमिते शाके मधौ मन्मथवत्सरे सिते ।
तिथौ विधातुर्मनसा जगाम नारायणं योगिवरस्तदानीम् ॥२६॥

त्या वेळीं म्हणजे श्रीशालिवाहनशक १३९८ मन्मथसंवत्सर चैत्रमास शुक्लपक्ष द्वितीया दिवशी हे वृध्द योगिवर्य श्रीनारायणस्मरणपूर्वक योगासनावर बसून ध्यानस्थ झाले. ॥२६॥

स्वप्ने तदा श्रीहरिणा प्रचोदितः सारस्वताचार्यकुलोद्भवं वटुम् ।।
कृत्वा स शिष्यं विधिना सदण्डं सपादुकं तत्वमुपादिशच्च ।।२७।।

तेव्हा स्वप्नामध्ये श्रीरामदेवाची त्यांना प्रेरणा झाल्यामुळे श्रीगौडसारस्वतब्राह्मण-कुलोत्पन्न माधवनामक ब्रह्मचाऱ्याला विधिपुरःसर दंडधारणादिपूर्वक उपदेश देऊन त्याचे श्रीनारायणतीर्थ असे अभिधान ठेविले. ।।२७।।

श्रीराघवं वीरमुपास्यदैवतं दत्वा तदानीं समयं निरीक्ष्य ।।
नारायणेत्याव्हयदेनमाह च गच्छ स्वकीयं पुरमित्युदारः ।।२८।।

नंतर त्याला स्ववंशपरंपरोपास्य श्रीवीररामचंद्राची मूर्ति देऊन तसेच देहावसानसमयी 'हे नारायणा! तूं आपल्या गांवास जा.' असे सांगून ते मुक्त झाले. ।।२८।।

नारायणस्तीर्थपदो महात्मा श्रीरामचन्द्रार्चनतत्परोऽभूत् ।
गुरोरनुज्ञां परिगृह्य गौडसारस्वताचार्यगुरुः प्रतीतः ।।२९।।

स्वगुरूंची ही अनुज्ञा स्वीकारून श्रीनारायणतीर्थ हे श्रीरामचंद्र ध्यानासक्त होत्साते श्रीगौडस्वारस्वतब्रह्मवृंदाचे गुरुवर्य असे प्रसिध्दीस पावले. ।।२९।।

ततः प्रतस्थे वररौप्यपीठपुरीं गुरूक्त्या स हि योगिवर्यः
प्राप्याथ कृष्णं परिपूज्य रात्रावुवास तस्यां यतिवृन्दमध्ये ।।३०।।

नंतर ते बदिरकाश्रमाहून गुरुवचनानुसार उडुपिक्षेत्रास गेले व तेथे श्रीकृष्णाचे पूजन करून त्या रात्री तिकडील यतिवृंदांत राहिले. ।।३०।।

प्रातः समुत्थाय पुरं च वृत्तमथाजगामाशु स तापसेन्द्रः ।
महाजनैस्तत्र समर्चितः सन्मठं प्रतिष्ठाप्य रराज तत्र ।।३१।।

मग तेथून ते तपस्वीवर्य दुसरे दिवशी प्रातःकाळी उठून भटकळ येथे गेले; तेथील महाजनांनी त्यांचा मोठा सत्कार केला; व तेथे मठ स्थापन करून ते राहिले. ।।३१।।

तस्मिन्काले महाराजः केलदीत्युपनामकः ।
तेनैतेभ्यः पदं दत्तं वडेरेति हि सादरम् ॥३२॥

त्यासमयी संपूर्ण कर्नाटक देशांतील वरिष्ठ महाराज संस्थान बेद्रूर ऊर्फ नगर येथील केलदी सिध्दण्ण नायक नांवाच्या मांडलिक राजाने या गुरुवर्यांची स्वाश्रमधर्माचरणयोग्यता पाहून आपले राजकीय परंपरागत वडेर असे प्रसिध्द अभिधान श्रीपादांस अर्पण केले; तेव्हांपासून श्रीपादवडेर असे म्हणण्याची चाल पडली आहे. ॥३२॥

तत्वं स्वकीयान्समवेदयद्यो वेदान्तविद्यामलचित्तवृत्तिः ।
गुरुर्गरीयानिह वासुदेवतीर्थाभिधं शिष्यमवाप दिव्यम् ॥३३॥

हे निरंतर वेदांतशास्त्राभ्यासेकरून निर्मल चित्तवृत्ति होत्साते. कांही दिवसांनी श्रीवासुदेवतीर्थ या नांवाचा शिष्य करून तेथेच समाधिस्थ झाले. ॥३३॥

स वासुदेवस्तपसा महीयांस्तीर्थाटनासक्तमना मनस्वी ।
चचार तीर्थानि बहूनि योगी प्रयागपूर्वाणि सुपावनानि ॥३४॥

नंतर हे योगिवर्य श्रीवासुदेवतीर्थ - सतत तीर्थाटनाच्या हेतूने प्रयाग आदि अनेक पुण्यक्षेत्रे व तीर्थे फिरत असत. ॥३४॥

पुनर्मठं वृत्तपुरस्थितं यो गत्वा गुरू राघवमर्चयित्वा ।
जीवोत्तमाख्यं हि चकार शिष्यं गतः पुनर्भीमरथीतटं सः ॥३५॥

कांही दिवसांनी ते परत भटकळास मठात येऊन श्रीरामचंद्राचे पूजन करून श्रीजीवोत्ततीर्थ या नांवाचा शिष्य करिते झाले. पुनः पंढरपुरास निघून गेले. ॥३५॥

रराज यतिनायकः प्रथितरुक्मिणीनायकं
मुदा परिचरन्सदा विबुधवृन्दसंसेवितम् ।
त्रितापभयहारिणं यदुवरं सतां पावनं
हरिं नरहरिं वरं सुरगुरुं महाविठ्ठलम् ॥३६॥

नंतर पंढरपुरांत हे यतिवर्य सकल ब्रह्मादिदेव ज्याची सदोदित सेवा करितात, जो शरणागतांचे त्रिविधतापभय हरण करितो. जो साधूंचे प्रतिपालन करून त्यांना पवित्र करितो, व 'हरि, नरहरि' असेही ज्याला म्हणतात, त्या यदुश्रेष्ठ, देवश्रेष्ठ, श्रीरुक्मिणीनायक महाविठ्ठलाची उपासना करीत भीमरथीतीरावर विराजमान झाले. ॥३६॥

इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिक
विरचिते सार्थे श्रीगुरुपरम्परामृते प्रथमः स्तबकः ॥१॥

• • •

## । द्वितीयः स्तबकः ।

जीवोत्तमार्केऽभ्युदिते जगत्यां लयं गतोऽज्ञानतमःसमूहः।
स्वतन्त्रमेको हरिरस्वतन्त्रं जीवो जडं चेति बभौ हि तत्त्वम् ॥१॥

या प्रकारें श्रीमज्जीवोत्तमतीर्थरूपी सूर्य लोकांत प्रगट झाल्यावर अज्ञान 'म्हणजे - ज्ञानाभाव, मिथ्याज्ञान व संशयज्ञान' या रूपाचा गाढ अंधःकार नाहींसा झाला; त्यामुळेच सच्चिदानंदाद्यनंतकल्याण गुणपरिपूर्ण सर्वोत्तम हरि हा एकटाच 'स्वतंत्र' आणि जीव व जड मिळून दोन्ही 'अस्वतंत्र' अशा प्रकारचे तत्त्व आपोआप प्रकाशमान झाले; अर्थात् - यथार्थज्ञानरूप प्रकाश या लोकीं पसरला. ॥१॥

जीवा अनन्ता जडमप्यनेकं नित्या ऋता जीवजडेशभेदाः।
नीचोच्चभावोऽस्ति हि जीवसंघे विष्णोर्वशे तिष्ठति सर्वमेतत् ॥२॥

ईशो रमेशस्ततसद्गुणाब्धिः सृष्ट्यादिकार्याष्टककारणं सः।
मुक्तिः परा नैजसुखानुभूतिस्तत्कारणं पूर्णहरिप्रसादः ॥३॥

तत्कारणं विष्णुपदैकभक्तिर्ज्ञानेन युक्ता च तथा विरक्त्या।
तत्कारणं श्रेष्ठगुरूपदेश इत्यादि स प्रोपदिदेश शिष्यान् ॥४॥

ते गुरुमहाराज स्वशिष्यांना तत्त्वोपदेश करिते झाले; तो असा कीं, - जीव, जड व ईश या तीन वस्तु सत्य आहेत; त्यापैकी रमाब्रह्मरुद्रेंद्रादिक जीव अनंत असून नित्य आहेत, त्यांत रमा नित्यमुक्त असल्याने तिला संसारबंध नसतो, ब्रह्मरुद्रेंद्रादिकाना संसारबंध असतो; प्रकृति, अव्याकृताकाश, कालप्रवाह, अकारादिवर्ण, गुणत्रय, महतत्त्व, अहंकारतत्त्व, वगैरे नित्य व अनित्य जडेंही अनेक आहेत; ईश तो एकटाच विष्णु नित्य आहे; जीवजीवानां, जडजडांना, जीवजडांना, जीवेशांना व जडेशांना परस्पर भेद सत्य असून नित्य असतात; जीवांतहि 'वरचा जीव, खालचा जीव व समान जीव' असे तारतम्यही नित्य असते; जीवजडें ही सदा ईशाधीन असतात; ईश तो जीवजडांहून उत्तम, स्वतंत्र, अनंतसद्गुणपरिपूर्ण व निर्दोष असतो; जीवांना गुणदोष तारतम्ये परिमित असतात; जीवजडेशांना निरनिराळ्या तऱ्हेतऱ्हेच्या शक्ति असतात, त्यांत ईशशक्ति अपरिमित अणि जीवजडशक्ति परिमित असतात; संसारी

जीव मुक्त होण्यासाठी किंवा लीलेने तो कृपासमुद्र ईश प्रकृतीस उपादान करून सत्य परंतु अनित्य अशा या जगाच्या सृष्टि, स्थिती, लय, नियमन, ज्ञान, अज्ञान, बंध व मोक्ष या कार्यांना कर्ता आहे; संसारापासून मुक्त होऊन स्वस्वयोग्यतेप्रमाणें शाश्वतस्वस्वरूपानंदानुभव हीच ती जीवांना मुक्ति, ही मुक्ति केवळ ईशप्रसादानेच जीवांना घडते; आत्मात्मीयसमस्तवस्तूंवरच्या प्रेमाहून अधिक अखंड प्रेमप्रवाह अशी ईशभक्ति ईशप्रसादाला कारण आहे. तत्त्वज्ञानपूर्वक विषयविरक्तीवांचून ती भक्ति घडत नाहीं, सद्गुरूंच्या उपदेशावांचून तत्त्वज्ञान होत नाही.' (स्तबक ७ श्लोक ६७) ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥

श्रीवीरविठ्ठलकृपामृतपात्रगात्रस्तत्त्वार्थबोधनविनाशितलोकपापः।
त्रैहोत्रिकद्विजवरार्चितपादपद्मस्तीर्थाटने स विदधे मतिमाप्तकामः ॥५॥

या प्रमाणे तत्वोपदेशाने लोकांचे पाप नाश करीत असलेल्या, आपले सर्व मनोरथ पूर्ण सिध्द झाल्यामुळे अगदी शांत असलेल्या, श्री जीवोत्तमतीर्थगुरुमहाराजांचे पादपूजन भक्तीने त्रैहोत्रिक[1] श्रीगौडसारस्वत ब्राह्मणवृंद करीत असतां, श्रीवीरविठ्ठलाची पूर्ण (स्तबक २ श्लोक २३-२४) कृपा यांवर होती म्हणून की काय एके दिवशी या गुरुमहाराजांच्या मनांत विचार आला कीं - 'आता नानातीर्थस्नाने करावी, नानाक्षेत्रस्थदेवतांचे दर्शन घ्यावे, त्या योगाने कृतकृत्य व्हावे.' ॥५॥

सोऽयं यात्रार्थमगमदुत्तरां दिशमुत्तमाम् ।
महायशास्तीर्थपदो जीवोत्तमयतीश्वरः ॥६॥

अति प्रसिध्द व परमपवित्र असे ते श्री जीवोत्तमतीर्थ गुरुमहाराज महायात्रेच्या उद्देशाने उत्तरदिशेप्रत चालले ॥६॥

यती रमाब्रह्मशिवादिसेव्यं क्षेत्रं हरेर्मञ्जुगुणि प्रसिद्धम्।
गत्वा स तत्रस्थमनन्तमाद्यं श्रीवेङ्कटेशं शिरसा ननाम ॥७॥

मार्गामध्ये म्हणजे सह्याद्रिप्रदेशावर लक्ष्मीब्रह्मरुद्रादिकांनी पूज्यमान, मंजुगुणि नामक महाप्रसिध्द विष्णुक्षेत्रावर जाऊन तेथे विराजमान असणाऱ्या पुराणपुरुष व देशतः कालतो व गुणतः अपरिच्छिन्न अशा श्री वेंकटेशास नमन करिते झाले. ॥७॥

---

१. गौडदेशांतील त्रिहोत्र या पुरांतील सारस्वतब्राह्मणांचा वंशांतील.

रमापतिं तत्र समर्च्य भक्त्या ततः पुरस्तात्स ययौ यतीन्द्रः।
नदीं प्रपश्यन्वरदां सुरेड्यां स्नात्वाथ तस्यां पुरतो जगाम ॥८॥

मग प्रातःकाली भक्तीने श्री वेंकटेशाची षोडशोपचार पूजा करून तेथून निघून पुढें क्रमाने प्राप्त अशा वरदा नदींत स्नान करून ते पुढे चालले ॥८॥

जीवोत्तमार्यो विजयाभिधानां पुरं ततः प्राप जनैः समृध्दाम् ।
अल्लीअदिल्शेति महान्प्रसिध्दो राजास तस्यां पुरि यावनेशः ॥९॥

पुढे ते चालत असता विजापुरास पोंचले. तेथे त्याकाली मुसलमान लोकांची मोठी वस्ती होती. तेथे अल्ली आदिलशहा या नांवाचा बादशहा राजा होता. ॥९॥

श्रुत्वा स्वपुर्यां समुपागतं तं श्रीपादवर्यं यवनस्तदानीम् ।
अभ्याशमागत्य यतीश्वरस्य सभाजयामास स भूमिपालः ॥१०॥

आपल्या राजधानींत प्राप्त झालेल्या श्रीगुरुमहाराजांचे वर्तमान ऐकून तो बादशहा स्वामिसंन्निधी येऊन स्वामींचा सत्कार करिता झाला. ॥१०॥

राजा मुनीन्द्रस्य परीक्षणार्थं पक्वामिषान्नं निजभक्षणार्हम् ।
संप्रेषयामास तदा यतीन्द्रो ददर्श राज्ञा प्रहितं स मांसम् ॥११॥

या गुरुमहाराजांची परीक्षा करावी असा मनांत विचार आणून तो बादशहा घरी गेला आणि भिक्षेच्या साहित्यासोबत मुसलमानाला योग्य असले पक्व मांसही पाठविता झाला. ते पाहून गुरुमहाराजांच्या मनांत पुष्कळ विचार आला. ॥११॥

जीवोत्तमार्यो गुरुराज एष तपःसमासादित तेजसा तत् ।
प्रसूनराशिं विरचय्य सद्यः संप्रेषयामास ततो नृपाय ॥१२॥

मग स्वामिमहाराजांनी आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्याने बादशहाने पाठविलेल्या मांसावर कमंडलूंतील उदक प्रोक्षण केलें, आणि पाहिलें, तेव्हां त्या मांसाची - सुगंधी पुष्पराशी झाली. तिच्या घमघमाटाने तो प्रदेश भरून गेला, नंतर ती पुष्पे गुरुमहाराजांनी प्रसादरूपाने बादशहाकडे पाठविली. ॥१२॥

---

१ इसवी सन १५५७-१५७९ पर्यंतचा प्रथमचा अल्ली आदिलशहा असावा.

यतिप्रबर्हेण तदामिषं तत्प्रसूनराशिं रचितं जनेन्द्रः।
दृष्ट्वा स संस्मृत्य तपःप्रभावं जीवोत्तमस्यामितमाप हर्षम् ॥१३॥

मग तो बादशहा मांसाचीं पुष्पें करणेचे स्वामिमहाराजांचे तपःसामर्थ्य पाहून आश्चर्यचकीत झाला. ॥१३॥

पुत्रीयन्सह भार्योऽसौ राजा जीवोत्तमं गुरुम्।
उपागत्य नमश्चक्रे जानुपातपुरःसरम् ॥१४॥

त्यानंतर तो पुत्रार्थी बादशहा आपल्या पत्नीसह अतिसमर्थ श्रीपादांच्या संनिधीं येऊन स्वकीय यवनरीतीप्रमाणे गुडघे टेकून नमस्कार करीत असे ॥१४॥

ततोऽमुं प्रार्थयामास सुतमन्वयभूषणम् ।
दातुं समर्थाः श्रीपादा इत्यदल्शो महीपतिः ॥१५॥

मग प्रार्थनाकरी कीं - 'अहो गुरुमहाराज हो! आपण तापसश्रेष्ठ असून आश्रितांचा मनोरथ पूर्ण करण्याविषयीं कल्पद्रुमच असल्यानें आमच्या वंशास अलंकारभूत असा पुत्र आम्हांस देण्याविषयी समर्थ आहा. त्यावरून आम्हांस सत्पुत्राच्या प्राप्तिसाठी आशीर्वाद द्या, म्हणजे आम्ही कृतकृत्य होऊ' ॥१५॥

श्रुत्वाथ राज्ञः सपरिग्रहस्य सुतार्थिनो दीनतरं वचः सः ।
जीवोत्तमार्यो यतिराण्नृपाय वरप्रदानाय मतिं चकार ॥१६॥

या प्रकारे पत्नीसहित पुत्राची इच्छा करणाऱ्या त्या बादशहाचे अतिदीन भाषण ऐकून ते जीवोत्तमतीर्थ त्या बादशहाला पुत्रप्राप्त्यर्थ वर देण्यासाठी तयार झाले. ॥१६॥

अभिमंत्र्य फलं तस्मै सभार्याय ददावयम् ।
फलं जग्ध्वा तदा राज्ञी सगर्भाभूत्क्षणात्किल ॥१७॥

त्यापुढें त्या यतिवर्यांनीं एक फल अभिमंत्रून त्या बादशहाला दिलें. ते फल यतिवर्यांच्या आज्ञेप्रमाणे बादशहाच्या पत्नीने तत्काल भक्षण केलें व ती लवकरच गर्भवती झाली. ॥१७॥

निरीक्ष्य तपसो बलं यवनराजधानीपति-
स्तदा विभवसंचयं यतिवराय तस्मै ददौ।
वरं च शिबिकासनं धवलचामराभ्यां युतं
तथा रुचिरदीपिके विमलमातपत्रं सितम् ॥१८॥

तेव्हां त्या बादशहानें गुरुमहाराजांचे तपःसामर्थ्य पाहून त्या गुरुमहाराजांना श्वेतछत्र, धवलचामरे, दिवट्या व शिबिका म्हणजे मेणा वगैरे पुष्कळ ऐश्वर्य दिले. ॥१८॥

ददौ विजयपत्रिकां प्रथितराजमुद्राङ्कितां
समुद्रवलयाधिपो यवनपो ह्यदिल्शाभिधः।
तदा यतिजनाधिपः करुणया धरित्र्याः पतिं
प्रतिप्रणयपूर्वकं समनुजं समाहर्षयत् ॥१९॥

त्या अल्लीआदिलशहा बादशहाने श्रीपादवर्यांस यवन लिपीची राजमुद्रा म्हणजे मोहोर दस्तखत याने सुशोभायमान रहदारीपत्र समर्पण करून स्वकीय रीतीप्रमाणे नमस्कार केला. तेव्हा गुरुमहाराजांनींही त्याला आशीर्वचन देऊन संतुष्ट केले. ॥१९॥

इत्थमुग्रतपास्तेन राज्ञा समभिपूजितः
उवास कतिचिन्मासांस्तत्र श्रीविजयापुरे ॥२०॥

याप्रकारे ते तीव्र तपस्वी श्री जीवोत्तमतीर्थ त्या बादशहाने अत्याग्रहपूर्वक राहण्याकरितां प्रार्थना केल्यामुळे विजापुरांत कांही महिने राहिले. ॥२०॥

ततः प्रतस्थे पुरतो यात्रार्थं स महामनाः।
वाराणसीं कुरुक्षेत्रं प्रयागं बदरीं तथा ॥२१॥
प्राचीं सरस्वतीं पश्यन्वाराहं पुष्करं ययौ।
ततः शिलानदीं पुण्यां गुन्तुं चक्रे मनो गुरुः ॥२२॥

मग विजापुराहून पुढे ते गुरुमहाराज चालत चालत प्रयाग, काशी, बदरिकाश्रम, कुरुक्षेत्र, प्राचीसरस्वती व वाराहपुष्कर म्हणजे ब्रह्मपुष्कर तेथपर्यंत जाऊन त्यापुढे शिलानदीप्रत चालले. ॥२१॥२२॥

गच्छतः पथि ततो यतेः पुरो दृष्टिगोचरमभूत्सरित्तटे।
विग्रहत्रयमुपाददे यतिर्विठ्ठलस्य किल दिव्यमद्भुतम् ।।२३।।

पुढे चालत असतां गुरुमहाराजांना शिलानदीच्या तीरावर श्री विठ्ठलाची धातुमय तीन विग्रहें दिसलीं. मनांत आश्चर्य पावून गुरुमहाराजांनी ती विग्रहे स्वीकारिली. ।।२३।।

पाण्डुरङ्गस्य मूर्तीनां त्रयं प्राप्य सुदुर्लभम् ।
मुदं प्राप यतीशः स चिन्तयन्वीरविठ्ठलम् ।।२४।।

ते श्रीपाद भूविजयविठ्ठल, दिग्विजयविठ्ठल व वीरविठ्ठल, या नावांच्या त्या तीन प्रतिमा घेऊन त्यांपैकी वीरविठ्ठलमूर्तीचे स्मरण करून अत्यंत संतोष पावले. ।।२४।।

तदागतस्तत्र महामुनीन्द्रः श्रीवादिराजो यतिराजराजः ।
समागमं प्राप्य च तस्य तेन संभावितोऽयं यतिराड्ययौ पुरः ।।२५।।

तेव्हा त्या आश्रमांत सुधापुरमठाचे श्रीमद्वादिराजतीर्थ श्रीपाद प्राप्त झाले, (हे श्रीक्षेत्र उडुपिस्थ अष्टममठांतर्गत सौदीमठाचे स्वामीमहाराज होत.) मग त्या उभयंताचा समागम झाला. त्यांनी श्रीजीवोत्तमतीर्थांचा सत्कार केला. त्यानंतर पुढें शिलानदीच्या उत्तम तीरावर पोंचले. ।।२५।।

गत्वा नदीं तां सुरवर्यसेवितां पस्पर्श नीरं किल योगिवर्यः।
महाध्वनः पारदिदृक्षयैव व्रतं चकाराशनहीनमेषः ।।२६।।

याप्रमाणे ते श्रीजीवोत्तमतीर्थ देवश्रेष्ठांनी सेवन केलेल्या शिलानदी जवळ पोंचून, तिचे पवित्रोदक स्पर्श करून, त्या पुण्य नदीच्या तटावर बसले व भरतभूमी पार करून, महाप्रस्थान करण्याच्या उद्देशाने शक्ति प्राप्त व्हावी म्हणून निरशनव्रत आरंभिते झाले. ।।२६।।

ततो भगवदिच्छया गगनतः समीरध्वनिः
श्रुतो हि यतिना यते तव विमानमायास्यति ।
दिनैः कतिपयैर्भवान्विबुधवृन्दसंसेवितो
भविष्यति भवाम्यहं तव दृशस्तदा गोचरः ॥२७॥

काही दिवसानी यांच्या व्रताचरणाचा आशय पाहून भगवदिच्छेने त्या आश्रमात अशी आकाशवाणी झाली कीं - 'हे यतिवर्या, तुझ्यासाठी सत्यलोकाहून विमान येईल, तूं त्यांत बसून जीवनमुक्तसभेत ये. मी तेथे तुला प्राप्त होईन.' ॥२७॥

भाम्यहं यते नूनं भवेऽस्मिन्नवक्षिगोचरः ।
अतो निवर्तय मनो व्रतात्परमदुष्करात् ॥२८॥

'हे यतिवर्या! या जन्मात तुला मी प्रत्यक्ष भेटणार नाही. तस्मात् तूं अतितीव्र श्रम करू नको. तर ते आरंभिलेले व्रत मला अर्पण कर म्हणजे पुरे.' ॥२८॥

श्रुत्वेति वाणीं गगने समीरितां समापयामास महाव्रतं तत् ।
यतिर्निवृत्तः स ततो जगाम वृन्दावनं पावनमच्युतात्मा ॥२९॥

ती आकाशवाणी ऐकून तत्काल त्या व्रताची समाप्ति करून परमात्म्यास स्मरत तेथून निघालेले ते यतिवर्य वृंदावनात पोंचले. ॥२९॥

विश्रान्तितीर्थे हरिलोकयात्राविश्रान्तिदेऽसौ विनिमज्य कृष्णम् ।
स्मृत्वा यतिः कुञ्जवनं च दृष्ट्वा तेनैव मार्गेण ययौ दिशं स्वाम् ॥३०॥

वृंदावनांत श्रीगोपालकृष्णाचे स्मरण करून जें परमपवित्र व वैकुंठलोकयात्रेचें विश्रांतिस्थान, त्या विश्रांतितीर्थांत स्नान करून कुंजवन म्हणजे लतागृह गोपिका आणि श्रीकृष्ण यांचे विहारस्थान ते पाहून त्याच मार्गानें स्वदिशेस म्हणजे दक्षिणेस चालले. ॥३०॥

क्रमेण भीमातटवासिनं हरिं नत्वाथ संपूज्य जगाम कृष्णाम् ।
निमज्य तस्यां प्रययौ स पावनं क्षेत्रं हरेर्भार्गवनामकस्य ॥३१॥

चालत चालत ते यतिवर्य मार्गी लागणाऱ्या तीर्थांत स्नान करीत क्रमाने पंढरपुरास येऊन श्रीपांडुरंगाला नमन करून तेथून श्रीकृष्णानदींत स्नान करून गोमांतक (गोवा) क्षेत्रीं पोंचले. ॥३१॥

गोमाचलप्रान्तनिवासिनं स रामं नमस्कृत्य ययौ पुरस्तात् ।
अङ्कोलकक्षेत्रमवाप्य योगी बभौ स्वकीयार्चितपादपीठः ॥३२॥

ते यतिराज गोमांतकक्षेत्रनिवासी श्रीपरशुराम याला नमन करून तेथून अंकोलेस येऊन पोंचले. तेथें स्ववर्गीय गौडसारस्वतब्राह्मणांनीं पादपूजा वगैरे उपचारांनी त्यांचा सत्कार केला. ॥३२॥

संप्राप्य गोकर्णमथो जितात्मा मठं प्रतिष्ठाप्य स तत्र योगी ।
श्रीविठ्ठलं देवमुदारविक्रमं संस्थापयामास तपोधनेन्द्रः ॥३३॥

तेथून ते गुरुमहाराज गोकर्णात येऊन तेथे एक नवा मठ बांधवून त्यांत त्यांनी श्रीभूविजयविठ्ठलाची मूर्ती स्थापन केली. ॥३३॥

ततो जगामाशु निजं पुरं तज्ञीवोत्तमो गर्भपुरं प्रपेदे।
मठालयं तत्र विनिर्ममेऽसौ बभौ प्रतिष्ठाप्य च तत्र विठ्ठलम् ॥३४॥

नंतर तेथून ते श्रीपाद भटकळास जाऊन तेथून बसरूरास गेले, आणि तेथे नवा एक मठ बांधवून त्यांत श्रीदिग्विजयविठ्ठलाची मूर्ती स्थापन करून कृतकृत्य झाले ॥३४॥

तदर्चकानां खलु वृत्तिमूलं चक्रे स्ववर्गं परिबोधयन्सः ।
तेनार्चिताङ्घ्रिः पुनरागतोऽभून्मठालयं स्वं गतसङ्गदोषः ॥३५॥

त्या बसरूरस्थ मठाची व्यवस्था राखण्याकरिता तिकडील स्वकीय वर्गास आज्ञा करून, मठांतल्या श्रीदिग्विजयविठ्ठलार्चक ऋग्वेदी आश्वलायनीय मोठे विद्वदाचार्य यांना उपजीविकेबद्दल देवताविनियोगार्थही वृत्ति म्हणजे कायमचे उत्पन्न व तेथील वर्गीयांचे पौरोहित्यही लावून देऊन, सर्वांकडून पूजित होत्साते परत आपल्या मूळ भटकळ मठांत आले. ॥३५॥

शिष्यं चकाराथ वटुं विरक्तं मुनिर्विनीतं पुरुषोत्तमाख्यम्।
तस्मै तृतीयां तनुमाप्तकामःश्रीविठ्ठलस्यैष ददौ तदानीम् ॥३६॥

तेथे कांही दिवसानंतर एका विरक्त अशा सदाचारनिष्ठ ब्रह्मचाऱ्याला आश्रम देऊन त्याचे पुरुषोत्तम तीर्थ असे नाम ठेऊन श्रीवीरविठ्ठलाची प्रतिमा सर्वोपस्करांसहित त्यांच्या स्वाधीन केली. ॥३६॥

संस्थाप्य शिष्यं स्वमठे यतीन्द्रो द्रष्टुं किलैच्छद्वृषभाद्रिनाथम् ।
ततो ययौ वेणुपुरं क्रमेण ततो मुनिः शेषगिरिं प्रपेदे ॥३७॥

त्यानंतर आपण श्रीवेंकटेशाच्या दर्शनोद्देशाने त्या पुरुषोत्तम शिष्यास मठांत ठेवून बेदरूरच्या मार्गानें हळुहळू वेंकटगिरीस पोंचले. ॥३७॥

तत्रस्थमीशं कमलायुतं हरिं श्रीवेङ्कटेशं शिरसा ननाम।
संपूज्य नारायणमादिदेवं श्रीशैलराजं स ततो जगाम ॥३८॥

तेथें असणाऱ्या आदिनारायण श्रीलक्ष्मीवेंकटेशाला शिरसा वंदनपूर्वक पूजा वगैरे उपचार समर्पण करून तेथून श्रीशैलराजास निघाले. ॥३८॥

जगाम कञ्चीं वरदायकं हरिं नत्वाथ संपूज्य ययौ पुरस्तात् ।
क्षेत्राणि पश्यन्प्रययौ स सेतुं क्रमेण जीवोत्तमतीर्थवर्यः ॥३९॥

ते जीवोत्तमतीर्थस्वामी कंचीक्षेत्रास गेले. तिकडे श्रीवरदराजास अभिवंदन करून क्रमाने क्षेत्रे पहात पहात सेतूवर पोंचले. ॥३९॥

निमज्य तस्मिन्पुरतो गतोऽयं श्रीपद्मनाभं परमं यतीन्द्रः।
ततः क्रमेणायमवाप दिव्यं क्षेत्रं मनीशः किल रौप्यपीठम् ॥४०॥

तेथे स्नानदिक करून पुढे अनंतपद्मनाभपुरांत (त्रावणकोरांत) श्रीपद्मनाभदेवाचे दर्शन घेऊन क्रमाने श्रीक्षेत्र उडुपीस येऊन दाखल झाले. ॥४०॥

तत्रापि पश्यन्यदुवंशकेतुं ननाम संतुष्टमना मनस्वी।
प्राप्तस्ततो गर्भपुरं महात्मा श्रीविट्ठलं देवमपूजयत्सः । ॥४१॥

प्रसन्नांतःकरण ते गुरुवर्य उडुपींत श्रीमन्मध्वाचार्यप्रतिष्ठापित श्रीकृष्णमूर्तीचे दर्शन घेऊन बसरूरास आले व येथे श्रीविट्ठलाचें अर्चन करीत कांहीं दिवस राहिले. ॥४१॥

ततो वृत्तपुरं प्राप्तो जीवोत्तमगुरुः पुनः
भक्तिमान्परमे विष्णौ सदण्डवरपादुकः ॥४२॥

सर्वोत्तम श्रीनारायणाचे परमभक्त श्रीजीवोत्तमतीर्थगुरुमहाराज बसरूराहून दंडपादुकांसहित पादचारी होऊन भटकळास आले. ॥४२॥

शिलामयीं विट्ठलमूर्तिमत्र प्रतिष्ठितां तां मठबाह्यदेशे।
आग्नेयकोणे स यतिप्रबर्हः समर्चयामास मुदा बुधेन्द्रः ॥४३॥

तेथें आपल्या मठाच्या बाहेर आग्नेयप्रदेशीं[1] स्थापन केलेल्या शिलामय श्रीविट्ठलमूर्तीची उपासना करीत राहिले. ॥४३॥

---

१. सन् १९८१ साली ह्या मठाच्या पुनःबांधणीच्यावेळीं आग्नेय दिशेंत असलेली शिलामय श्रीविट्ठलमूर्तीची पुनःप्रतिष्ठा गर्भगृहाच्या प्रदक्षिणेंत वायव्य प्रदेशीं स्थापण्यांत आली आहे.

उवास तत्रैव महानुभावो जीवोत्तमार्यः समयेन यानम् ।
अपश्यदादित्यसमानतेजः स्फुरत्पताकाभिनवं महात्मा ।।४४।।

हे महानुभाव श्रीमज्जीवोत्तमतीर्थश्रीपादवडेर भटकळात कालक्रमण करीत असता एके दिवशी सूर्यासारखें प्रकाशमान नानाप्रकारच्या पताकादिकांनी सुशोभित असें दिव्य विमान भगवदाज्ञेने आलेले त्यांनी पाहिले व मोठे हर्पनिर्भर झाले. ।।४४।।

तदैव संस्मृत्य हरिं वरेण्यं नारायणं देवमनन्तमाद्यम् ।
ध्यानं गतस्तत्र समाधिवृत्यायोगाधिरूढस्तनुमुत्ससर्ज ।।४५।।

तेव्हाच त्यांनी योगासनावर आरूढ होऊन आदिमध्यांतशून्य, पुराणपुरुप, सर्वसद्गुणपूर्ण, रमाब्रह्मादिकांहून उत्तम अशा श्रीमन्नारायणाचे स्मरण करून समाधियोगाने ध्याननिष्ठ होऊन नश्वर देहाचा त्याग केला. ।।४५।।

ततो यतीनां प्रवरः स दिव्यां तनुं दधानोऽर्कशताधिकप्रभाम् ।
विमानवर्यं स्वयमारुरोह सुनन्दनन्दादिभिरन्वितः सन् ।।४६।।

ते यतिश्रेप्ठ शतसूर्यांप्रमाणे तेजस्वी शरीर धारण करून सुनंदनंदादिक विष्णुपार्पदांसहवर्तमान स्वतःच पुढे दिसणाऱ्या विमानावर आरोहण करिते झाले. ।।४६।।

तदा विमानोपरि पुष्पवृष्टि-र्बभूव मुक्ता सुरनायिकाभिः।
खमुत्पपाताशु विमानमुत्तमं मरुत्पथे दुन्दुभिनिस्वनोऽभवत् ।।४७।।

तेव्हां देवस्त्रियांनी त्या विमानावर पुष्पवृष्टि केली व विमान आकाशांत उडाल्यावर देवदुंदुभींचा वाद्यघोप सुरू झाला. ।।४७।।

एतस्मिन्नेव समये रौप्यपीठमठालये।
वादिराजयतिः कृष्णं नीराजयितुमुद्यतः ।।४८।।

याच वेळीं श्रीक्षेत्र उडुपींत श्रीमद्वादिराजस्वामी नुकतेच श्रीकृष्णाला मंगलारति करीत होते. ।।४८।।

तदा वियति योगीन्द्रमपश्यत्स विमानगम् ।
समुत्थाय नमस्कृत्य नीराजनमथाकरोत् ॥४९॥

इतक्यांत आकाशात झालेला देवदुंदुभींचा घोष ऐकून त्यांनी वर पाहिले, तो त्या दिव्य विमानांत श्रीमज्जीवोत्तमतीर्थ बसून चाललेले त्यांना दिसले, तेव्हांच अभ्युत्थानपूर्वक नमस्कार करून नीरांजन दाखविले ॥४९॥

तत्दृष्ट्वा महदाश्चर्यं पप्रच्छुः स्वामिनं द्विजाः।
किमिदं क्रियते स्वामिन्गगने किं प्रदृश्यते ॥५०॥

हा आश्चर्यकारक प्रकार पाहून उडुपीमठातल्या ब्राह्मणांनी श्रीवादिराजस्वामिश्रीपादांना विचारले की - 'महाराज! हे आपण काय करीत आहा? आकाशात आपणास काय दिसत आहे वरे?' ॥५०॥

इति पृष्टो वादिराजः स्वानुवाच समुत्सुकः ।
श्रीपादानां स महात्म्यं पावनं विजयप्रदम् ॥५१॥

असा स्वकीय शिष्यांनी प्रश्न केलेला ऐकून श्रीवादिराजतीर्थगूरूंनी श्रीजीवोत्तमतीर्थश्रीपादांचे विजयप्रद व लोकपावन चरित्र त्या शिष्यांना कथन केलें ॥५१॥

इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिकविरचिते सार्थे श्रीगुरुपरम्परामृते द्वितीयः स्तबकः ॥२॥

• • •

# । तृतीयः स्तबकः ।

स एष पुरुषोत्तमस्तदनु पाण्डुरङ्गार्चकः
सदण्डवरपादुकः कपिशवाससा भासुरः ।
स्वकीयमठगेहगः श्रुतिपुटे धरिण्या मुनिः
स्वशिष्यपरिवारयुङ्मनुजपे मनोऽधारयत् ॥१॥

त्यानंतर गुरुवर्य श्रीमत्पुरुषोत्तमतीर्थ श्रीपादवडेर हे श्रीसंस्थान गोकर्णमठ येथे शिष्यपरिवारासह दंडपादुकांनी सुशोभित व काषायवस्त्रांनीं अलंकृत होत्साते अत्यंत विरक्तपणाने केवल गुरूंनी दिलेल्यां मंत्रादिकाच्या जपानुष्ठानात चित्त घालून राहिले होते. ॥१॥

वार्षिकमासांश्चतुरः समाप्य विद्वद्गुरुः स्वकीयेभ्यः
व्याचष्ट कर्मतन्त्र श्रौतस्मार्ताग्निहोत्रपूर्वं सः ॥२॥

ते चातुर्मासात अतिक्रमण करून श्रौतस्मार्तदर्शपोर्णमासाग्निहोत्रादिक धर्मांचा उपदेश स्वकीय जनास करीत असत. ॥२॥

अथो गुरुः स्वकीयेषु सदाचरणकर्मणाम् ।
पूर्वापरीकारभिया कर्मसिध्दान्तमातनोत् ॥३॥

या गुरुवर्यांनी स्वकीयब्रह्मवृंदामध्ये अवश्य कर्तव्यकर्मांच्या ठिकाणी म्हणजे शांतिक, पौष्टिक, प्रायश्चित्तिक, इत्यादिकांत अंतर पडून कर्मांचा ऱ्हास होऊं नये म्हणून तदुपयोगि कर्मसिध्दांत, संन्यासपध्दति, इत्यादि ग्रंथ रचिले आहेत. ॥३॥

एवं धर्मं प्रतिष्ठाप्य संप्रदायविवृद्धये।
शिष्यं चकार मेधावानणुजीवोत्तमाभिधम् ॥४॥

याप्रमाणें धर्मस्थापना करून संस्थानच्या संप्रदायानुसार त्यांनी अणुजीवोत्तमनामक शिष्य केला व आपण विश्रांति पावले. ॥४॥

स एष गोकर्णमठाधिवास- स्त्रैहोत्रिकब्राह्मणपुंगवानाम् ।
गुरुर्गरीयानिह वीरविठ्ठलं समर्चयामास हि वैष्णवाग्र्यः ॥५॥

हे वैष्णवश्रेष्ठ महाबुध्दिमान् गौडसारस्वतब्राह्मणांचे गुरुवर्य अणुजीवोत्तमतीर्थस्वामी गोकर्णमठात श्रीवीरविठ्ठलाची उपासना करीत राहिले. ॥५॥

जीवोत्तमोऽणुर्यतिराट् स्वधर्म- प्रवर्तनायैव चकार शिष्यम् ।
श्रीरामचन्द्राभिधमज्बनाभ- प्रसादपात्रं परसद्गुणाढ्यम् ॥६॥

या यतिवर्यांनी स्वधर्मउत्तेजनार्थ उत्तम गुणांनी युक्त, सदाचारसंपन्न व भगवदनुग्रहपात्र असा श्रीरामचंद्रतीर्थनामक शिष्य केला. ॥६॥

ततः परं योगिवरो जगाम गोमान्तकक्षेत्रनिरीक्षणाय ।
दिचोलिनाम्नीं नगरीमवाप्य गुरुर्वरेण्यः स उवास तत्र ॥७॥

त्यानंतर हे योगिश्रेष्ठ अणुजीवोत्तमतीर्थस्वामी गोमातंकक्षेत्र अवलोकन करण्यासाठी गेले ते डिचोलिग्रामात राहिले. ॥७॥

श्रीरामचन्द्रतीर्थश्रीपादानां चरित्रमतिचित्रम् ।
विजयप्रदं पवित्रं व्याख्याय प्रीणयामि गुरुवर्यम् ॥८॥

आतां श्रीरामचंद्रतीर्थ श्रीपादवर्यांचे आश्चर्यकारक, लोकपावन व विजयप्रद माहात्म्य वर्णन करितो; तेणेकरून श्रीगुरुमहाराज संतुष्ट होवोत. ॥८॥

गोकर्णस्थमठालयवासी श्रीरामचन्द्रयतिवर्यः ।
संपूज्य वीरविठ्ठलमनिशं लेभे मुदं महामतिमान् ॥९॥

हे गोकर्णमठात राहणारे महाबुध्दिमान् श्रीपाद श्रीरामचंद्रतीर्थ निरंतर श्रीवीरविठ्ठलाची उपासना करीत मोठा आनंद मिळविते झाले. ॥९॥

दिग्विजयरामचन्द्रं सोऽयं स्वं शिष्यमातनोद्यतिराट् ।
मेधाविनं विरक्तं विनीतममलं स्वसंप्रदायज्ञः ॥१०॥

स्वसंप्रदायक्रम जाणणारे हे यतिवर्य स्वामी मेधावान्, विरक्त, विनयसंपन्न व निष्पाप असा दिग्विजयरामचंद्रतीर्थ या नांवाचा शिष्य करिते झाले. ॥१०॥

पूर्वं हि विश्वकर्मा विनिर्ममे यत्नतः शुभा मूर्तीः ।
रामस्य लक्ष्मणस्य च सीताया मारुतेस्तथा क्रमतः ॥११॥

यापूर्वीच विश्वकर्म्याने यत्नपूर्वक श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुति यांच्या सुंदर मूर्ति निर्माण केल्या होत्या. ॥११॥

मूर्तिचतुष्टयमपि यः शिलामयं प्रस्तरान्तरास्थाप्य।
गोकर्णे मठपश्चाद्भागे गतवान्सुरालयं स्थपतिः ॥१२॥

त्या चार प्रतिमा त्याने एका शिलागर्भांत स्थापन करून ठेविल्या व आपण स्वर्ग लोकास गेला. हे स्थान सांप्रत श्रीसंस्थान गोकर्णमठाच्या मागे म्हणजे पूर्व दिशेंकडे आहे. ॥१२॥

तस्मिन्काले यतिः स्वप्ने हरिणा चोदितः किल ।
लेभे चतुष्टयं तत्र मूर्तीनां दिव्यमद्भुतम् ॥१३॥

कांही वर्षांनी श्रीहरीने स्वामिपाद श्रीरामचंद्रतीर्थांस स्वप्नांत सांगितल्यामुळे त्या गुप्त मूर्तींचा शोध करीत असता त्यांस त्या शिलागर्भांतील प्रतिमा सांपडल्या. ॥१३॥

ततो गुरुर्मठे स्वीये मूर्तिस्थापनकर्मणि ।
मतिं चकार मतिमान्स्वजनैरनुमोदितः ॥१४॥

मग त्यांनी त्या मूर्ती स्वकीय लोकांच्या अनुमोदनाने आपल्या मठांतच स्थापन करण्याचा विचार केला. ॥१४॥

स्वप्नोऽभवत्तस्य यतेस्तदानीं युक्तो भवान्मूर्तिचतुष्टयेन ।
गत्वोत्तराशां प्रति यत्र भारस्तत्र प्रतिष्ठापय दिव्यमूर्तीः ॥१५॥

परंतु, इतक्यांत पुनः त्यांस असे स्वप्न झाले कीं - "या मूर्ती इथे स्थापन करूं नये, या घेऊन उत्तर दिशेप्रत जावे व त्या जेथे जड होऊन वाहकांची गति कुंठित करतील तेथे त्या स्थापन कराव्या." ॥१५॥

इत्थं भगवता स्वप्ने चोदितः स यतीश्वरः ।
उदङ्मुको जगामाशु मूर्तियुक्त उदारधीः ॥१६॥

श्रीरामदेवाने स्वप्नांत सूचना केल्याप्रमाणे ते गुरुस्वामी त्या मूर्ती घेऊन उत्तर दिशेकडे चालले. ॥१६॥

द्वाभ्यां स मूर्तिवाहाभ्यां सहान्यैरपि संयुतः ।
रघुवीरपदध्यानयुक्तः पैङ्ग्याश्रमं ययौ ॥१७॥

ते श्रीपाद, दोन मूर्तिवाहक व इतर कांही मंडळी यांसहवर्तमान रघुवीरचरण चिंतन करीत पैंगिमुनीच्या आश्रमांत (पैंगीण येथे) जाऊन पोंहचले. ॥१७॥

तत्रैको रघुनाथस्य सीताया लक्ष्मणस्य च।
वहन्मूर्तीर्भराक्रान्तो बभूव गिरिकानने ॥१८॥

त्या दोन मूर्तिवाहकांपैकी एकटा म्हणजे राम, लक्ष्मण व सीता, यांच्या मूर्ति घेऊन चालणारा मनुष्य त्या मूर्तींच्या भारानें तेथेंच कुंठित झाला. ॥१८॥

रामचन्द्रो यतिस्तत्र निबिडे कानने जलम् ।
अदृष्ट्वा संशयाक्रान्तो मूर्तिस्थापनकर्मणि ॥१९॥

तेव्हां भगवदाज्ञेप्रमाणे त्या ठिकाणी मूर्ती स्थापन करण्याचा त्यांचा विचार झाला; परंतु तेथे उदक नसल्यामुळे त्या निर्जल स्थळी मठ स्थापन करणें दुर्घट व अयोग्य असंही त्यांस वाटले. ॥१९॥

यतिमूचे दाशरथिः सुषुप्तिगतमत्र सोऽग्रजप्रकृतिः।
अभ्यर्च्य धेनुममलां मुञ्च जलं दर्शयेदटव्यां सा ॥२०॥

याप्रमाणे ते चिंताक्रांत होऊन ध्याननिष्ठ असतां श्रीरामाने त्यांस निद्रेंत ब्राह्मणवेषाने येऊन सांगितले कीं - 'प्रभातकाळी कामधेनूची पूजा करून तिला सोडा, म्हणजे ती तुम्हांस उत्तम जल व स्थळ दाखवील. ॥२०॥

अथो रघूणां प्रवरस्य सख्यं चिकीर्षुणास्मिन्भृगुजेन कानने।
संप्रेषितासौ पयसां जनित्री प्राप्ता गुरोर्दृष्टिपथं तदानीम् ॥२१॥

त्यानंतर रघुवंश श्रेष्ठ श्रीराम यांच्या सहवासाची अपेक्षा करणाऱ्या श्रीपरशुरामदेवाने आपली कामधेनु तिकडे पाठविली ती या गुरुवर्यांनी पाहिली. ॥२१॥

प्रातः समुत्थाय हरेरनुज्ञया समर्च्य धेनुं स मुमोच योगी।
सा गौर्गता तत्र कुशावतीतटे प्राचीमुखी क्षिप्रमवस्थिताभवत् ॥२२॥

मग त्यांनी प्रातःकाळी उठून श्रीदेवाच्या अनुज्ञेप्रमाणे तिची पूजा केली व प्रणामपूर्वक प्रार्थना करून तिला सोडिले; तेव्हा ती पूर्वेकडे तोंड करून चालू लागली व त्या पर्वताखाली (पर्तगाळी) उतरून कुशावती नदीच्या तीरावर जाऊन उभी राहिली. ॥२२॥

पुरा विधात्रा रघुनाथसेवां करिष्यमाणेन कुशाम्बुबिन्दुना ।
विनिर्मिता सात्र सरिद्वरा वने कुशावतीं तां प्रवदन्ति सूरयः ॥२३॥

भविष्यकाळी श्रीरामदेवाची सेवा आपल्याकडून घडावी म्हणून पूर्वीच सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाने आपल्या कमंडलूंतील कुशोदकबिंदूने ती नदी निर्मिली होती, यास्तव तिला विद्वान लोक कुशावती असे म्हणतात. ॥२३॥

पयः क्षरन्तीं स पयस्विनीं तां सरित्तटे पर्वतकानने वरे ।
पश्यन्महात्मा मुदमाप तत्र श्रीरामचंद्रः किल तीर्थपादः ॥२४॥

त्या पर्वतकाननांत (पर्तगाळींत) पवित्र अशा कुशावती नदीच्या तीरावर त्या कामधेनूने आपली दुग्धधारा सोडिली. हें पाहून ते श्रीरामचंद्रतीर्थश्रीपाद मनांत अत्यंत संतोष पावले. ॥२४॥

ततो महेशस्य दिशं पयस्विनी यदृच्छया तूर्णमवाप दिव्यम् ।
ऋषेर्वनं तत्र पयः क्षरन्ती तिरोहिता सा मुनिवर्यमुक्ता ॥२५॥

त्यानंतर ती कामधेनु तशीच मोठ्या वेगाने ईशान्यदिशेस असलेल्या ऋषिवन (रिवण) नामक क्षेत्रास जाऊन तेथेंही क्षीर सिंचन करून अंतर्धान पावली. ॥२५॥

दृष्ट्वा महच्चित्रमिदं तदानीं गुरोर्गुरुणामतिविस्मयोऽभूत् ।
तपोनिधिर्विठ्ठलवीरदेवं सस्मार रामं स तथाञ्जनेयम् ॥२६॥

असा तो महदाश्चर्यकारक प्रकार पाहून गुरुमहाराजांस मोठा विस्मय वाटला व त्यावेळीं त्या तपोनिधींनी मोठ्या प्रेमाने श्रीवीरविठ्ठल, श्रीराम व श्रीमारुति यांचें स्मरण केले. ॥२६॥

श्रीरामसौमित्रिविदेहजानां मूर्तीस्तदा पर्वतकानने मठम् ।
बध्द्वा स संस्थाप्य ऋषेर्वने तु वार्तिं समस्थापयदेष योगी ॥२७॥

त्या योगिवर्यांनी कामधेनूने दर्शविल्याप्रमाणें त्या पर्वतकाननांत श्रीराम, लक्ष्मण व सीता यांची विग्रहे स्थापन करून ऋषिवनात मारुतीचे विग्रहही स्थापन केले. ॥२७॥

एवं तदाज्ञया तत्रतत्र संस्थाप्य ता यतिः ।
आमुक्त्युवास भक्त्यैष पूजयन्मरुतः सुतम् ॥२८॥

याप्रकारें श्रीदेवाच्या आज्ञेने चारही देवतांची विग्रहे स्थापन करून आपण मुक्तिपर्यंत ऋषिवनांत मोठ्या भक्तीनें श्रीमारुतीचें अर्चन करीत राहिले. ॥२८॥

दिग्विजयरामचन्द्रश्रीपादानां पदाम्बुजं नत्वा।
तेषां महिमानमथो विशदीकुर्यां गुरुप्रसादाय ॥ ॥२९॥

यापुढे श्रीदिग्विजयरामचंद्रतीर्थश्रीपाद यांच्या चरणकमलाना नमन करून गुरुप्रसादलाभाकरितां त्यांचे चरित्र वर्णन करितो. ॥२९॥

श्रीवीरविठ्ठलपदाब्जसमर्चनायां सक्तो विरक्तिमतिमाञ्जितसङ्गदोषः ।
भूपावने ऋषिवने किल रामदूतं संपूजयन्यतिवरोऽत्र मठे ह्युवास ॥३०॥

महाबुध्दिमान् व विरक्त असे हे श्रीदिग्विजयरामचंद्रतीर्थ श्रीवीरविठ्ठलाच्या चरणारविंदसेवेंत तत्पर असत. ते त्या ऋषिवनांत मारुतीची उपासना करीत मठामध्ये राहिले होते. ॥३०॥

लेभे हनूमतो मूर्तिं तुलसीकाष्ठसंभवाम् ।
तया सह महात्मासौ गुहावासं तदाकरोत् ॥३१॥

त्यांना तेथे तुलसीकाष्ठाची मारुतीची प्रतिमा मिळाली. ती घेऊन ते महानुभाव (जितेंद्रिय) पर्वताच्या गुहेंत वास करिते झाले. ॥३१॥

गिरेर्गुहायां सति योगपीठे समाहितात्मा स चकार तीव्रम् ।
तपो विशाले हृदये निधाय श्रीविठ्ठलं मध्वहृदब्जवासम् ॥३२॥

त्या पर्वतगुहेंत उत्तमप्रकारचे योगासन घालून विशुध्दांतःकरणाने श्रीमध्वहृदयांतर्गतवीरविठ्ठलाचे ध्यान करून उग्र तपश्चर्या करण्यास त्यांनी आरंभ केला. ॥३२॥

निःसङ्गतीव्रतपसा समाराधयताच्युतम् ।
श्रीमध्वहृदयावासं वादिराजोक्तमार्गतः ॥३३॥

त्यांनीं श्रीवादिराजतीर्थप्रोक्तपुनश्चरणक्रमाने निःसंगव्रतानुष्ठानें करून श्रीमध्वांतर्गत नरसिंहरूपी वीरविठ्ठलाची उपासना चालविली. ॥३३॥

पुनश्चरणयोगेन तुष्टाव मरुतः सुतम् ।
नृसिंहं च महायोगी भक्तिमान्परमे हरौ ॥३४॥

रमाब्रह्मरुद्रादिकांहून उत्तम अशा श्रीमन्नारायणाच्याठायी उत्कृष्ट भक्ति धारण करणारे ते परमहंस श्रीपाद पुनश्चरणयोगाने श्रीनरसिंह व आंजनेय यांचे स्तवन करिते झाले. ॥३४॥

प्रसादमकरोत्तस्मिन्वायुसूनुर्महाबलः ।
रामचन्द्रो दिग्विजयस्तपः सिध्दोऽभवत्तदा ॥३५॥

तेव्हा मुख्यप्राणांतर्गत श्रीलक्ष्मीनरसिंहाने त्यांवर प्रसाद केला, म्हणून हे दिग्विजयरामचंद्रतीर्थ तपःसिध्द झाले. ॥३५॥

असौ यतिगुरुः स्वयं कतिपयैरहोभिर्महा -
नगतो विपिनकाननं स्वजनवृन्दसंप्रार्थितः ।
चकार रघुचन्द्रकं करतलोद्भवं दण्डिनं
ततः स गुरुराययावृषिवनं पुनः पावनम् ॥३६॥

कांही दिवसांनी हे यतिवर्य स्ववर्गीय लोकांनी प्रार्थना केल्यावरून श्रीसंस्थान पर्तगाळीस येऊन तेथें रघुचंद्रतीर्थ या नावांचा शिष्य करून पुनः ऋषिवनास गेले. ॥३६॥

तदैव योग्या गुरुणोपदिष्टा महाजनास्ते रघुनन्दनस्य ।
महोत्सवार्थं पुरुषोत्तमस्य चक्रू रथं पर्वतकानने नवम् ॥३७॥

त्यावेळी गुरुमहाराज श्री दिग्विजयरामचंद्रतीर्थ यांच्या आज्ञेने महाजन मंडळींनी श्रीसंस्थान पर्तगाळी इथे श्रीरामदेवाच्या उत्सवार्थ नूतन रथ निर्माण केला. ॥३७॥

अथाजगामाशु ऋषेर्वनाद्यो योगीश्वरो दिग्विजयाभिधानः ।
महोत्सवार्थे वरपादुकाभ्यां चरन्नसौ दण्डधरो विरक्तः ॥३८॥

त्यानंतर हे योगिश्रेष्ठ श्रीदिग्विजयरामचंद्रतीर्थ रामनवमीच्या महोत्सवासाठी दंडपादुकांसह पर्तगाळीस आले. ॥३८॥

अनन्तरं चैत्रिकशुल्कपञ्चमी-तिथौ लसत्कौतुकबद्धहस्ताः।
सतान्त्रिकाचार्यवराः पतत्रिणां राजानमानर्चुरलं महाध्वजे ॥३९॥

तेथे चैत्रशुध्दपंचमीदिवशीं दक्षिणहस्तात यज्ञकंकण बांधलेले, कर्मानुष्ठानचतुर तांत्रिक, पुरोहित व ऋत्विज या सर्वांनी मिळून ध्वजासनावर पक्षिराज गरुडाचें पूजन करून वाद्यादि समारंभाने ध्वजारोपणादि कर्तव्य कर्म केले. ॥३९॥

षष्ठ्यां ततो वास्तुनवग्रहादीन्संतर्प्य होमादिभिरध्वरे द्विजाः।
दिवा निशायामपि शार्ङ्गपाणेश्चक्रुर्महं ते वरवाहनादिभिः ॥४०॥

षष्ठीदिवशीं यज्ञशाळेत, पंचमीदिवशी स्थापन केलेल्या कलशावर आवाहित वास्तुनवग्रहादिकांची हवनद्वारे तृप्ती करून दिक्पालादिकांस गंधाक्षतचरुपत्रतीर्थोदकांनीं बलिप्रदान करून त्या द्विजवर्यांनीं श्रीरामदेवास मोठ्या समारंभाने अनेक उत्तमोत्तम वाहनांवर बसवून दिवसभर व रात्रभर मोठा उत्सव केला. ॥४०॥

तथा परेऽह्नि प्रयतैर्द्विजातिभिस्तीर्थाम्बुगन्धाक्षतपुष्पजालैः ।
समर्चितः शक्रहुताशनाद्यै-र्युक्तो रघूणां प्रवरस्तुतोष ॥४१॥

तसेंच सप्तमी दिवशी पवित्र अशा ब्राह्मणांनीं तीर्थोदक. गंधाक्षत, सुगंधीपुष्पादिकांनी दिक्पालांसहित श्रीरामदेवाची उत्तम प्रकारे पूजा केली; त्यायोगें त्या देवतांसहित श्रीरामदेव संतुष्ट झाला. ॥४१॥

ततः परदिनेऽवरे कुसुमसंचयालंकृते
रथे निशि हि तान्त्रिकप्रमुखभूसुरा राघवम् ।
समर्च्य परमादरान्महितमीशमालेभिरे
परां मुदमथो जना जयजयेति तं तुष्टुवुः ॥४२॥

अष्टमी दिवशी श्रीगुरुवर्य व तांत्रिकादिकरून सर्व ऋत्विज आणि गृहस्थमंडळी यांनीं माध्यान्हिक सर्व कृत्ये आटोपल्यानंतर रात्रीच्या वेळी पुष्पतोरणादिकांनी अलंकृत अशा लहान पुष्परथावर श्रीरामदेवास बसवून परमादराने त्याची षोडशोपचार पूजा करून वाद्यनर्तनासहित उत्सव संपादून श्रीचा मोठा जयजयकार केला. ॥४०॥

ततो निशीथे करपात्रिको महान्सदर्भकूर्चः किल तान्त्रिको बलिम् ।
दण्डाभिधं भूतगणप्रतोषिणं विधाय भूताधिपमाश्वतोषयत् ॥४३॥

त्याच मध्यरात्री तो तांत्रिक हस्तात दर्भकूर्चपत्रिका म्हणजे बलिपात्र घेऊन भूतगणाच्या तृप्त्यर्थ दंडबलि घालून भूताधिपति म्हणजे क्षेत्रपाल यास महाबलिप्रदाने करून संतुष्ट करिता झाला. ॥४३॥

एवं दिनानां हि चतुष्टयेऽसौ द्विजाग्रणीस्तत्र समस्तदेवताः ।
विधानतोऽभ्यर्च्य महाजनाना-मिष्टाप्तये कर्म समार्पयध्दरौ ॥४४॥

या प्रकारें तो तांत्रिक आचार्य श्रीपादस्वामी यांच्या आज्ञेनुरूप महाजनांच्या कल्याणवृध्दीकरितां चार दिवस पर्यंत तत्तदनुष्ठान क्रमानें हवन, बलिप्रदान इत्यादिकानी समस्त देवतांस पुजून ते कर्म भगवदर्पण करिता झाला. ॥४४॥

ततो नवम्यामभवत्समागमः सारस्वतब्राह्मणपुंगवानाम् ।
गोमाचलप्रान्तनिषेविणां च कर्णाटकप्रान्तनिवासिनां तथा ॥४५॥

नवमी दिवशी प्रातःकाळीं श्रीरामदेवाच्या महोत्सवाकरितां गोमंतकीय व कर्णाटकीय एकंदर गौडसारस्वत ब्राह्मणमंडळीचा महाजन, विद्वद्वैदिक व गृहस्थ यांचा समूह श्रीसंस्थान पर्तगाळी येथे जमला. ॥४५॥

कोलाहलो वारवधूजनानां वेतालवादित्रसकिंकराणाम् ।
उद्योगिनां तत्र समागमोऽभून्महोत्सवे श्रीरघुनायकस्य ॥४६॥

श्रीरामदेवाच्या महोत्सवार्थ आमंत्रित व अनामंत्रित तद्देशीय गणिकास्त्रियांचा व वाजंत्री आणि बंदिपाठक यांचा कोलाहल तिकडे चालला होता; तसेंच पुष्कळ प्रकारचे व्यापारीलोकही त्या यात्रेस जमले होते. ॥४६॥

तदा मुहूर्तेऽभिजिति द्विजातयस्ते गन्धपुष्पादिभिराशु देवताः ।
संपूज्य दिक्पालबलिं विधाय ववन्दिरे राममशेषवन्द्यम् ॥४७॥

त्यानंतर मध्यान्हमुहूर्ताच्या वेळी सर्व ब्राह्मणांनी गंधपुष्पाक्षतांनी रथविनायकाची पूजा केली व ते सर्व लोक आणि श्रीरघुचंद्रतीर्थ श्रीपादवडेर हे वाद्यघोषपूर्वक दिक्पालादिकांस सदीपबलिप्रदान करून त्या नूतन महारथासभोवती श्रीरामदेवास रथावर चढविण्याच्या तयारीने हात जोडून उभे राहिले. ॥४७॥

लसत्पताकावलितोरणान्विते रथोत्तमे श्रीरघुवंशकेतुम् ।
अध्यासयामासुरथासनं महत्सतान्त्रिकास्तत्र गुरोरनुज्ञया ॥४८॥

ते तांत्रिक, ऋत्विज, वगैरे लोक त्या पताकातोरणादिकांनीं अलंकृत व सुंदर अशा महारथावर उभयतां गुरूंच्या आज्ञेनें, श्रीरामदेवास ब्राह्मणांचे सुमुहूर्तमंत्राक्षतदुर्वादर्पणादिकांसहवर्तमान चढवून भद्रपीठासनाच्या ठिकाणी बसविते झाले. ॥४८॥

श्रुत्वेमामुत्सवकथां वादिराजमठस्थितः ।
चुचोद मस्करी भूतं रथभङ्गाय दुर्मतिः ॥४९॥

पर्तगाळीत चाललेल्या या महोत्सवाची वार्ता ऐकून (उडुपिस्थाष्टमठान्तर्गत) सौदीमठप्रवर्तक तौलव संन्यास्याने जातिद्वेष उगविण्यासाठी त्या उत्सवसमयीं विघ्न करण्याच्या हेतूने नारायण या नांवाचे धुरंधर भूत उच्चाटन करून पाठविले. ॥४९॥

द्वेषिणा प्रेषितो भूतराजो नारायणाभिधः।
अन्तर्हितो रुरोधाथ रथं तत्र महाबलः ॥५०॥

त्या द्वेष्ट्याने पाठविलेल्या महाबलवान् नारायण नांवाच्या भूतराजाने पर्तगाळीस येऊन गुप्तरूपाने त्या महारथाची गति कुंठित केली; असा एकदम झालेला अवरोध पाहून सर्वलोक चकित झाले. ॥५०॥

खिलीभूतं रथं दृष्ट्वा जनाः कुण्ठितमानसाः ।
प्रार्थयांचक्रिरे सर्वे यतिं दिग्विजयाभिधम् ॥५१॥

'पुढे काय करावे' हें त्यांना सुचेना म्हणून सर्व लोक मठांत योगासनावर बसलेल्या तपस्विश्रेष्ठ श्रीदिग्दिजयरामचंद्रतीर्थांकडे येऊन विघ्न निवारण्यासाठी प्रार्थना करिते झाले. ॥५१॥

श्रुत्वा यतीन्द्रः स महाबलेन भूतेन रुद्धं सुदृढं रथोत्तमम् ।
निरीक्ष्य हस्तेन फलं गृहीत्वा संस्तम्भयामास महाद्भुतं तम् ॥५२॥

तें ऐकून योगदृष्टीने त्यांनी त्या भूतकृत्याचा विचार केला व एक श्रीफल हातात घेऊन मंत्रसामर्थ्याने त्या भूतराजास त्यावर आकर्षण करून श्रीवीरमारुतीच्या पायाखाली स्तंभन करून ठेविले. ॥५२॥

यतीश्वरेणाशु खिलीकृतोऽसौ हनूमतः पादतले समर्पितः ।
ततो जगर्जाखिललोकभीषणं स भूतराजः सहसा पपात ।।५३।।

या प्रकारे श्रीवीरमारुतीच्या पादमूलांत स्तंभन केलेला तो नाराणयभूतराज त्यावेळी भंयकर मोठी गर्जना करून खाली पडला तो अद्याप उठलाच नाही. ।।५३।।

अनन्तरं तत्र महोत्सवोऽभू-त्सीतापतेः श्रीरघुनन्दनस्य।
एवं महत्कर्म यतेर्निरीक्ष्य महाजननामतिविस्मयोऽभूत् ।।५४।।

यानंतर श्रीरामदेवाचा महोत्सव मोठ्या समारंभानें पार पडला. याप्रमाणे गुरुवर्यांचे तपःसामर्थ्य पाहून स्ववर्गीय लोकांस व इतरांसही मोठें आश्चर्य वाटलें. ।।५४।।

एवं निवर्त्यैष महोत्सवं मुनिः श्रीरामचन्द्रं शिरसा प्रणम्य ।
श्रीविठ्ठलं देवमथो समर्च्य पुनर्जगामाशु ऋषेर्वनं महत् ।।५५।।

याप्रकारे श्रीरामदेवाच्या महोत्सवाची पूर्णता करून श्रीरामदेवाला शिरसा नमन करून श्रीवीरविठ्ठलाचेहि पूजन करून ते श्रीमदिग्विजयरामचन्द्रतीर्थश्रीपाद पुनः ऋषिवनास गेले. ।।५५।।

तत्र दिव्यं तपस्तप्त्वा पावमानिं प्रपूजयन्
पुनर्जगाम योगात्मा सोऽङ्कोलाक्षेत्रमुत्तमम् ।।५६।।

त्या ऋषिवनांत काही दिवस दिव्यतपश्चर्या करून श्रीमारुतीची पूजा करून ते योगिवर्य अंकोला क्षेत्रास जाऊन राहिले. ।।५६।।

इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिक विरचिते सार्थे श्रीगुरुपरम्परामृते तृतीयः स्तबकः ।।३।।

●●●

# । चतुर्थः स्तबकः ।

अनन्तरं श्रीरघुचन्द्रनामा गोकर्णसंस्थानमठाधिवासः ।।
तीर्थाटनासक्तमनाः प्रपेदे वाराणसीं विष्णुपदीतटस्थाम् ।।१।।

त्यानंतर गोकर्ण मठात राहणारे श्रीरघुचंद्रतीर्थ श्रीपाद यांस काही वर्षांनी तीर्थाटन करण्याची इच्छा होऊन ते भागीरथी तीरावरील वाराणसी (काशी) क्षेत्राप्रत जाऊन पोंहचले. ।।१।।

उवास तत्र योगीन्द्रो गङ्गास्नानपरायणः ।
यात्रां समाप्य विधिवद्गोकर्णं पुनराययौ ।।२।।

तेथे राहून ते नित्य भागीरथीस्नान मोठ्या प्रेमाने करीत असत. कांही दिवसांनी तिकडील यात्रा विध्युक्तरीतीने आटपून ते परत गोकर्णास आले. ।।२।।

एवं महात्मा बहुशश्चकार यात्राविधिं तत्र पवित्रकर्मा ।।
निवृत्तधर्मा जितसङ्गदोषः संस्मृत्य वीराभिधपाण्डुरङ्गम् ।।३।।

याप्रमाणेंच त्यानीं श्रीवीरविठ्ठलाचे स्मरण करून पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. ।।३।।

अथ रघुचन्द्रः कर्तुं शिष्याणामष्टकं मनो दध्रे।
अष्ट मठान्गोकर्णे करिष्यमाणः स्वसंप्रदायज्ञः ।।४।।

त्यानंतर त्या श्रीरघुचंद्रतीर्थांनी उडुपींतील संप्रदायाप्रमाणेच पर्तगाळीतहि आठ मठ करण्याच्या हेतूनें गोकर्णांत येऊन शिष्यांस आश्रम देण्याचा विचार केला. ।।४।।

उपदिष्टाश्चत्वारस्तत्रैकः पञ्चतां तदा प्राप्तः।
पुनरपि चकार शिष्यं रघुचन्द्रः सोऽपि शान्ततामाप ।।५।।

आणि तिकडील आठ ब्रह्मचारी निवडून त्यांस पृथक पृथक् प्रायश्चितविधानादि करवून उपदेशास आरंभ केला. चार शिष्यांस उपदेश देऊन पुढची तजवीज करितात न करितात, तोंच त्यांतील एक पंचत्व पावला. असें असतां पांचव्यास आश्रम दिला, तोही इहलोक सोडून गेला. ।।५।।

एवं बहवः शिष्याः कृता गतास्ते तदा त्रयः शिष्टाः ।
क्रमतो लक्ष्मीनारायणतीर्थव्याससंयमीन्द्राख्याः ॥६॥

असे त्यांनी अनेक शिष्य केले, पण त्यांतील फक्त तीनच राहून बाकीचे पंचत्व पावले. त्या जिवंत राहिलेल्या शिष्यांचीं नावें लक्ष्मीनारायणतीर्थ, व्यासतीर्थ व संयमींद्रतीर्थ अशी होती. ॥६॥

गुरुरपि चिन्तां महतीमाप्तः किं कार्यमत्र मठकार्ये ।
स्वप्ने निवारितोऽसौ हरिणा तत्याज संभृतामाशाम् ॥७॥

आता मनांत योजिलेलें कार्य कसें तडीस न्यावे अशी गुरुवर्यांना मोठी चिंता उत्पन्न झाली. परंतु काही उपाय सुचेना तेव्हा निरुपाय होऊन भगवद्ध्यानांत निमग्न असतां स्वप्नांत देवाने त्यांस आज्ञा केली की - 'श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यांनीं स्थापन केलेला मठाष्टकसंप्रदाय इतरांकडून होणे अशक्य आहे याकरिता तशा धुरंधर कृत्यांत तुम्ही मन घालूं नका.' अशीं भगवदाज्ञा श्रवण करून त्यांनीं त्या कार्याची इच्छा सोडिली व ते पुनः पर्तगाळीस गेले. ॥७॥

शिष्टानां शिष्यानां मिथः कलिः प्रादुरास तत्र मठे ।
कलहस्त्वासीत्सततं तीर्थग्रहणादिकर्मणि प्राप्ते ॥८॥

इकडे त्या शिष्यत्रयामध्यें तीर्थग्रहण, तप्तमुद्राधारणादिकृत्यांत 'अहं पूर्वम् अहं पूर्वम्' म्हणून अभिमानपरत्वें कलह उत्पन्न झाला. ॥८॥

अहं पूर्वमहं पूर्वमित्यूचुः स्वगुरूं प्रति ।
रघुचन्द्रोऽपि तच्छ्रुत्वा चिन्ताक्रान्तोऽभवत्तदा ॥९॥

'मी अगोदर मी अगोदर' असे प्रत्यहीं ते शिष्य आपल्या गुरुंकडे म्हणूं लागले; तें ऐकून गुरुवर्य रघुचंद्रतीर्थ हे मोठे चिंताक्रांत झाले. ॥९॥

तृतीयः संयमीन्द्रोऽसौ गतो वाराणसीं किल।
राज्ञा समर्चितस्तत्र मठे वासं मुदाकरोत् ॥१०॥

त्यांपैकी तिसरे शिष्य संयमींद्रतीर्थ हे श्रीक्षेत्र काशीस गेले असतां तिकडे तेथील राजानें त्यांचा चांगला सत्कार केला व ते मठांमध्ये आनंदाने राहू लागले. ॥१०॥

व्यासतीर्थो गुरुं प्रोचे लक्ष्मीनारायणो यतिः।
भूयात्स संप्रदायज्ञ इति श्रीरघुचन्द्रकम् ॥११॥

दुसरे शिष्य व्यासतीर्थ यांनीं पहिले लक्ष्मीनारायणतीर्थ हेच संप्रदायक्रम वाढवोत असे गुरूंला सांगितले व आपण मुमुक्षुपंथाचा आश्रय करून श्रीसंस्थान पर्तगाळीं येथेच श्रीरामदेवाची उपासना करीत राहिले. ॥११॥

रघुवीरपदध्याननिष्ठः पर्वतकानने ।
अतितीव्रं तपस्तप्त्वा प्राप्तः स सदनं हरेः ॥१२॥

त्या पर्वतकाननामध्ये श्रीरामदेवचरणी ध्याननिष्ठ होत्साते मोठे तप आचरण करून ते तेथेच मुक्त झाले. ॥१२॥

अथ रघुचन्द्रः स्वमठे लक्ष्मीनारायणं हि संस्थाप्य ।
पारम्पर्यविवृध्द्यै प्रददौ मुद्रां सपादुकां तस्मै ॥१३॥

त्यानंतर गुरुस्वामी श्रीरघुचन्द्रतीर्थ यांनीं श्रीगोकर्णमठ परंपरागत मुद्रा व पादुका तसेच श्रीवीरविठ्ठलाची विग्रहें, देवतार्चन वगैरे आपला शिष्य लक्ष्मीनारायणतीर्थ यांजकडे देऊन स्वकीय ब्रह्मवृंदांतील धर्माध्यक्षकृत्यांचा कारभारही त्यांवरच सोंपवून आपण विरक्त पंथाचा आश्रय केला. ॥१३॥

ततः स्वर्णपुरं गत्वा रघुचन्द्राभिधो मुनिः।
तत्रोवास मठे गौडसारस्वतकुलार्चितः ॥१४॥

ते श्रीरघुचंद्रतीर्थगुरुस्वामी त्यानंतर स्वर्णपुरास (होन्नावरास) जाऊन तेथील गौडसारस्वत ब्राह्मणांकडून अर्चित होत्साते तेथेंच राहिले. ॥१४॥

लक्ष्मीनारायणः शिष्यं लक्ष्मीकान्तमथाकरोत् ।
अनन्तरं जगामासौ मठं वृत्तपुरस्थितम् ॥१५॥

इकडे श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ श्रीपाद वडेर यांनी पर्तगाळी मठांत राहून लक्ष्मीकांततीर्थ या नांवाचा शिष्य केला व तेथून आपण भटकळास गेले. ॥१५॥

नत्वाथ जीवोत्तमतीर्थपाद - वृन्दावनं पावनमेष योगी ।
ततः पुरस्तात्किल रौप्यपीठं गत्वात्र कृष्णं मनसा समार्चयत् ॥१६॥

तिकडे श्रीजीवोत्तमतीर्थ यांच्या वृंदावनाचे त्यांनी दर्शन घेतलें, तेथून उडुपीक्षेत्रास जाऊन त्यांनी श्रीगोपाळकृष्णाची मानसोपचारें पूजा केली. ॥१६॥

ततः क्रमेण प्रजगाम सेतुं प्रणम्य वीरं रघुराजमेषः ।
संस्मृत्य योगी जलधौ निमज्य रामेश्वरं प्राप यतीन्द्रवन्द्यः ॥१७॥

तिकडून ते श्रीवीरविठ्ठलाचें व श्रीरामदेवाचें स्मरण करीत करीत धनुष्यकोटीस जाऊन दक्षिणसमुद्रांत स्नान करून रामेश्वरास पोंचले. ॥१७॥

नत्वाथ संपूज्य शिवं च माधवं ततो ययौ योगिवरः स कञ्चीम् ।
तत्रस्थमाद्यं वरदं रमेशं संपूज्य शान्तिं समवाप दिव्याम् ॥१८॥

तेथें सेतुमाधवाचें दर्शन घेऊन रामेश्वराला नमन करून पुढें कंची क्षेत्रास गेले, व तेथें श्रीवरदराजदेवाची यथाविधि उपासना करून त्यांनी आपल्या मनाची शांति करून घेतली. ॥१८॥

ततः प्रतस्थे पुरतो भोगिराजगिरिं प्रति ।
तत्रादौ भैरवं नत्वा वराहमनु योगिराट् ॥१९॥

तेथून ते योगिवर्य वेंकटगिरीप्रत जाऊन प्रथम लागणाऱ्या कालभैरवास भेटून पुढें वराहदेवाचें दर्शन करिते झाले. ॥१९॥

ददर्श श्रीरमाकान्तं वेङ्कटेशमुदारधीः ।
संपूज्य त्रिदिनं तत्र गिरिश्रेष्ठ उवास सः ॥२०॥

नंतर लक्ष्मीपति श्रीवेंकटेशाचें यथाविधि पूजन करून ते उत्कृष्ट बुध्दिमान् श्रीपाद तेथे तीन दिवस राहिले. ॥२०॥

ततः प्रयाणाय मतिं चकार दिशां स्वकीयां किल तीर्थपादः ।
क्रमेण तीर्थानि निरीक्ष्य लक्ष्मीनारायणो वेणुपुरं प्रपेदे ॥२१॥

मग वेंकटगिरीहून पश्चिम दिशेस प्रयाण करून वाटेवर लागणाऱ्या तीर्थांचे स्नान व क्षेत्रांचे दर्शन करीत ते वेणुपुरास आले. ॥२१॥

तस्मिन्काले शाखानगरद्वार्यागतं यतिं श्रुत्वा ।
राज्ञी चन्नम्माची माण्डलिकी हर्षमाप तत्र गता ॥२२॥

त्यावेळीं त्या गावाचें आधिपत्य पावलेली चन्नम्माजी या नांवाची राजस्त्री ही आपल्या ग्रामाच्या उद्यानांत प्राप्त झालेल्या या यतिवर्यांचें वर्तमान ऐकून अतिशय संतोष पावती झाली. ॥२२॥

तदा हि सामन्तजनावकीर्णगृहापणद्वारपताकमालिनि।
पुरे स्वकीये यतिराजमेनं प्रवेशयामास मुदा जनैः स्वैः ॥२३॥

तिनें सामंत लोकांच्या वाड्यांतल्या गृहद्वारांच्याठायीं लावलेल्या पताका तोरणादिकांनी सुशोभित व व्यापारी लोकांच्या मोठमोठ्या इमारतींनी मंडित अशा राजमार्गावरून या प्रसिध्द लक्ष्मीनारायणतीर्थांना नगरामध्ये वाजत गाजत मोठ्या संमारंभाने आणिलें व तेथील गौडसारस्वत ब्राह्मणवर्गीयांच्या मठांत त्यांना ठेवून घेऊन मोठ्या आनंदानें ब्राह्मणद्वारा त्यांची पादपूजा वगैरे केली. ॥२३॥

ततो रजन्यां परिवारसंयुतो निवेशितस्तत्र मठे समर्चितः ।
उवास पञ्चाहमसौ यतीन्द्रः संपूज्य वीरं निजपाण्डुरङ्गम् ॥२४॥

तेथें त्या भक्तिमति मांडलिक राज्ञीच्या आग्रहावरून सर्व परिवारासहित श्रीवीरविठ्ठलाचें पूजन करीत पांच दिवस ते राहिले. ॥२४॥

षष्ठे दिने प्रातरुपेत्य राज्ञी तपस्विराजाय ददौ तदानीम् ।
छत्रं सितं पाण्डुरचामरे द्वे सुदीपिके शङ्खवरं च यानम् ॥२५॥

सहाव्या दिवशीं सकाळीं येऊन तिनें त्या तपस्वि गुरुवर्यांना श्वेतच्छत्र, दोन चामरें, दोन उत्तम दीपिका व शंख आणि शिबिका वगैरे वैभव अर्पण करून त्यांच्या चरणीं साष्टांग प्रणिपात केला. ॥२५॥

एवं महाराजसती हि चन्नमा पुनर्यतीन्द्राय महात्मनेऽसौ ।
दत्वा तदानीं जयपत्रिकां सा राज्ञी समभ्यर्चयदेव भक्त्या ॥२६॥

या प्रकारें ऐश्वर्य समर्पण केल्यानंतर आणखी त्यांना विजयपत्रही देऊन तिनें त्यांचा भक्तिपूर्वक पुष्कळ सत्कार केला. ॥२६॥

एवं महात्मा विभवैः समर्चितस्तपस्विराजो निजविठ्ठलं स्मरन् ।
आशीर्भिरेनामभिवर्धयंस्ततः प्रतिप्रयाणाय मतिं चकार ॥२७॥

त्यानंतर या महात्म्यांनी श्रीवीरविठ्ठलाचें स्मरण करून तिला कल्याणकारकआशीर्वचन दिलें व आपण पुढे जाण्याची तयारी केली. ॥२७॥

ततः प्रतीचीं दिशमुग्रतेजाः समागमत्तत्र पुरे च गर्भे ।
मठं समागम्य स पाण्डुरङ्गं संपूजयन्वृत्तपुरं जगाम ॥२८॥

तेथून ते तेजस्वी पुरुष पश्चिम दिशेने वाटचाल करीत बसरूर येथे आले व तेथे प्राचीन मठांत असलेल्या श्रीदिग्विजयविठ्ठलाची पूजा करून भटकळास परतले. ॥२८॥

---

१ शिवाजी महाराजाचा पुत्र राजाराम, त्याचा पुत्र शिवाजी, त्याचा पुत्र संभाजी, हा असावा. २ वरच्या (४/३०-३१) श्लोकातील संभाजी हा असावा; कालभेदानें दुसऱ्यावेळी ही रहदारी दिली असावी.

ततो गोकर्णमागत्य मठं स्वीयमवाप सः
अनन्तरं जगामाशु गौतमीं प्रति तापसः ॥२९॥

भटकळाहून गोकर्णास आपल्या मठांत आले व तेथे कांही दिवस राहून मग गौतमीच्या दर्शनास निघाले. ॥२९॥

ततः क्रमेणोत्तरदिङ्मुखः सञ्जगाम कोल्हापुरमुग्रतेजाः ।
रमां समभ्यर्च्य स तत्र राज्ञा सम्भाजिनाम्ना हि समर्चितोऽभूत् ॥३०॥

ते क्रमानें उत्तरीभिमुख होत्साते कोल्हापुरास गेले व तेथें श्रीलक्ष्मीदेवीची पूजा करून तेथील संभाजी या नांवाच्या राजाच्या आग्रहावरून कांहीं दिवस तेथेंच राहिले. ॥३०॥

तपस्विनोऽमुष्य महाप्रभावं निरीक्ष्य राजा जयपत्रमस्मै।
ददौ स्वपादावनतं स लक्ष्मीनारायणोऽवर्धयदाशिषा तम् ॥३१॥

महानुभाव तपस्वी गुरुवर्यांचें योगसामर्थ्य पाहून राजानें त्यांस जयपत्रिका दिली व नमस्कार केला. गुरुवर्यांनीही त्याला कल्याणवृध्दिकारक आशीर्वाद दिला. ॥३१॥

ततश्छत्रपती राजा शंभुनामा तपस्विनम् ।
दृष्ट्वा सभाजयामास दत्वास्मै जयपत्रिकाम् ॥३२॥

त्यानंतर छत्रपती शंभुराजानें यांस पाहून आदरोपचारपूर्वक रहदारी दिली. ॥३२॥

ततः शिवाजिनामको महीपतिस्तपस्विनम्।
श्रितं[३]ः स तीर्थकीर्तिना प्रवर्धितः शुभाक्षतैः ॥३३॥

त्यानंतर शिवाजी महाराजानीही यांचा पुष्कळ सत्कार केला व श्रीपादांनीं त्यांस मंत्राक्षता देऊन प्रवर्धना (संभावना) केली. ॥३३॥

---

३. वरच्या (४/३०-३१) श्लोकातील संभाजीचा पुत्र अथवा पिता हा असावा.

तत्सचिवः प्रह्लादकपन्ताख्यस्तीर्थपादपादाब्जम्।
अभ्यर्च्य विजयामालाग्रथितं पत्रं ददावमुष्मै सः ॥३४॥

त्यानंतर प्रल्हादपंत नामक कोल्हापूरच्या राजाचा मंत्री यानेंही त्यांस सत्कारपूर्वक विजयपत्र दिलें. (हे सर्व प्राचीन कागदपत्रांवरून समजून येते.) ॥३४॥

गोदावरीं विष्णुपदीं च गत्वा स्नात्वाथ काश्यां प्रणिपत्य माधवम् ।
भूयः समागम्य च गौतमीतटं तत्रैव वासं चकमे मुनीन्द्रः ॥ ॥३५॥

तेथून ते महानुभाव यतिश्रेष्ठ गोदावरीस गेले, तेथें स्नान करून पुढें श्रीक्षेत्र वारणासीत भागीरथीमध्ये स्नान करून बिंदुमाधवास नमस्कार करून परत गौतमीच्या म्हणजे गोदावरीच्या तीरावर येऊन राहिले. ॥३५॥

*इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिक विरचिते सार्थे श्रीगुरुपरंपरामृते चतुर्थः स्तबकः ॥४॥*

●●●

# पञ्चमः स्तबकः ।

लक्ष्मीकान्तो रमाकान्तनामानं शिष्यमातनोत् ।
चरित्वा भुवनं सर्वं ततः स्वर्णपुरं ययौ ॥१॥

इकडे लक्ष्मीकांततीर्थश्रीपाद यांनी रमाकान्ततीर्थ नांवाचा शिष्य केला व तीर्थयात्रेकरितां गेले आणि ती आटपून होन्नावरास येऊन राहिले. ॥१॥

ततः परमहंसोऽयं रमाकान्तो महायतिः ।
शिष्यं चकार गोकर्णे कमलाकान्तमुत्तमम् ॥२॥

मग परमहंस रमाकांततीर्थ श्रीपादवडेर यांनी गोकर्णमठात श्री कमलाकांततीर्थनामक उत्तम शिष्य केला. ॥२॥

अंड्कोलाख्यमहाग्रामे वसन्विट्ठलसंनिधौ।
विचार्य तत्त्वं मतिमाञ्जजाप परमं मनुम् ॥३॥

मग ते विद्वान यतिवर्य अंकोला नगरात जाऊन तेथील मठात श्री विट्ठलाच्या संनिधी तत्वविचार करीत प्रणवमंत्रजप करीत राहिले. ॥३॥

कमलाकान्ततीर्थस्तु शिष्यं तत्र मठालये ।
कृत्वा श्रीकान्तनामानं न्यवसद्विट्ठलाग्रतः ॥४॥

कमलाकांततीर्थांनीही गोकर्ण मठात श्रीकांततीर्थ नांवाचा शिष्य केला व आपण तेथेच राहिले. ॥४॥

चक्रे श्रीकान्तयतिर्विरक्तिमतिमान्गुरुस्तदा शिष्यम् ।
भूविजयरामचन्द्रकतीर्थाभिधमुत्तमं विनीतं च ॥५॥

श्रीकांततीर्थांनी भूविजयरामचंद्रतीर्थ या नावाचा विनीत व उत्तम गुणांचा शिष्य केला ॥५॥

तथा ययौ पर्वतकाननस्थं मठं यतीन्द्रो विरराज तत्र ।
संपूजयन्विट्ठलवीरमेष श्रीरामचन्द्रं मनसा समर्चयन् ।।६।।

ते गुरुस्वामी श्रीसंस्थान पर्तगाळी मठात जाऊन तेथे श्रीवीरविट्ठलाची उपासना, व श्रीरामदेवाचे स्मरण करून विश्रांती पावले ।।६।।

अनन्तरं भूविजयाख्यराम-चन्द्राभिधो यानवराधिरूढः।
सुचामराभ्यां धवलैश्च शङ्खैश्छत्रेण रेजे वरदीपिकाभ्याम् ।।७।।

त्या नंतर भूविजयरामचन्द्रतीर्थ श्रीपादवडेर हे श्वेतच्छत्र, धवल शंख, चामरद्वय, दीपिकाद्वय इत्यादि वैभवासहवर्तमान शिबिकासनावर बसून विराजमान झाले. ।।७।।

मठस्य वृद्ध्यर्थमुपात्तदण्डो धनं स्ववर्गान्वशमादधानः।
क्षेत्रं च वृत्तिं विशदीचकार योगी मुमुक्षुः किल रामचन्द्रः ।।८।।

या मुमुक्षु भूविजयरामचन्द्रतीर्थांनी गोकर्णमठ परंपरागत धर्म संरक्षणाकरितां स्ववर्गीय लोकांवर प्रतिवार्षिक कांही कर बसवून व संस्थानाच्या कायद्याप्रमाणें धर्माध्यक्षपणाचा अधिकार चालवून अपराधी लोकांस प्रायश्चित्ताबद्दल काणुक द्रव्याची वगैरे नेमणूक करून त्याचप्रमाणे दुसऱ्याही अनेक उपायांनी संस्थानाची वृत्ति (शेत भात वगैरेचे उत्पन्न) वाढविले. ।।८।।

ततो ययौ व्याघ्रशिलापुरं मुनिर्युक्तः स्वकीयैर्विभवैर्महीयान् ।
तत्र स्ववर्गीयजनैर्महादरात्समर्चितोऽभूद्गुरुराज एषः ।।९।।

ते एकदां दिग्विजयार्थ पर्तगाळीहून निघाले व व्याघ्रशिलापुर (हुल्लेकल्ल) येथे पोंहोचले असता तेथील स्ववर्गीय लोकांनी यांचा बहुमान करून त्यांस तिकडील मठात ठेवून घेतलें. ।।९।।

अथैतानागताञ्छ्रुत्वा व्यासराजमठालयः ।
लक्ष्मीनाथाभिधस्तीर्थपादो मुदमवाप सः ।।१०।।

स्वग्रामांत प्राप्त झालेल्या या गुरुवर्यांचे वर्तमान ऐकून, तेथील कर्णाटक देशस्थ श्रीव्यासराजमठप्रवर्तक श्रीलक्ष्मीनाथतीर्थस्वामी फार संतुष्ट झाले. ।।१०।।

समागमेच्छुरेतेषां लक्ष्मीनाथयतिस्तदा ।
आह्वयामास वेङ्कप्पशर्माणं परमादरात् ।।११।।

त्यांनी भूविजयरामचंद्रतीर्थांची भेट घेण्याच्या इच्छेने गौडसारस्वत ब्राह्मणांतर्गत वेङ्कप्पा यास आपल्या मठात बोलावून आणिलें ।।११।।

उवाच तं यतिर्युष्मद्गुरूणां तु महीयसाम् ।
समागमार्थिनां नस्त्वं साचिव्यं कुरु यत्नतः ।।१२।।

व सांगितले कि - 'तुमचे महात्मा गुरुवर्य यांच्या भेटीचा योग घडवून आणण्याचा प्रयत्न तुम्ही करा.' ।।१२।।

श्रुत्वा स वचनं तेषां गौडसारस्वताग्रणीः ।
वेङ्कप्पशर्मा स्वगुरूनाजगाम मुदा युतः ।।१३।।

हे ऐकून गौडसारस्वतब्रह्मवृंदात श्रेष्ठ ते वेंकप्पा हे स्वकीय गुरुकडे गेले. ।।१३।।

संप्रार्थ्य श्रीभूविजयरामचन्द्रगुरून्प्रति।
समागमार्थमुभयोः संधिं चक्रे यतीशयोः ।।१४।।

आणि प्रार्थनापूर्वक विनंती करून उभयतांच्या भेटीचा योग जुळविला ।।१४।।

अथ यतिवराज्ञया ते गुरुवर्यस्य स्वके मठे हूतौ ।
कर्मणि यत्ता वेङ्कटकृष्णाचार्यादयस्तदायत्ताः ।।१५।।

व्यासराजमठ स्वामी यांच्या आज्ञेने त्यांना आपल्या मठात आणण्याकरिता त्या मठाचे पारपत्यगार (कारभारी) वेंकटकृष्णाचार्य व इतर कर्णाटकी ब्राह्मणसमुदाय त्याच्याकडे गेले. ।।१५।।

सहवादित्रसकिंकरगणा जनास्ते गुरूत्तमं नत्वा।
उत्सवतः पथि तूर्णं प्रवेशयामासुरञ्जसा स्वमठम् ।।१६।।

आणि गुरुवर्यास नमस्कार करून त्यांस राजमार्गावरून वाजत गाजत मोठ्या समारंभाने आपल्या मठात घेऊन आले. ।।१६।।

अतः परं योगिवरः स लक्ष्मीनाथो महात्मानममुं मुनीन्द्रम् ।
संप्राप्य हर्षेण करं करेण धृत्वा समावेशयदुच्चपीठे ॥१७॥

याप्रमाणे मठात पोहोचताच लक्ष्मीनारायणतीर्थांनी त्या महानुभाव यतिवर्यास मोठ्या संतोषाने हातात हात धरून उच्चासनावर आणून बसविले. ॥१७॥

गन्धाक्षतैराच्र्य गुरुं यतीन्द्रो मालां निधायाथ गुरोश्च कंधरे ।
समर्प्य काश्मीरभवं च राङ्कवं संपूजयामास गुरुं वरेण्यः ॥१८॥

व त्यांची गंधाक्षतादि उपचारांनी पूजा करून कंठात पुष्पांची माला घालून त्यांना उत्तम प्रकारची काश्मिरी शालजोडी समर्पण केली. ॥१८॥

एवं गुरुर्भूविजयाख्यराम-चन्द्रो यतीन्द्रेण तदा सुपूजितः।
तेनैव साकं स्वमठं समेत्य सभाजयामास यतिं वरेण्यः ॥१९॥

याप्रमाणे गुरुवर्य भूविजयरामचंद्रतीर्थ यांचा लक्ष्मीनाथतीर्थ यांनी सत्कार केल्यानंतर आपल्या मठात परत येतांना त्यांनाही आणून त्यांचा म्हणजे लक्ष्मीनाथतीर्थांचा यांनीही सत्कार केला. ॥१९॥

अथ दिग्विजयं कृत्वा स्ववर्गैः परिपूजितः।
लेभे धनं च मानंच मठे वृत्तिमवर्धयत् ॥२०॥

त्यानंतर ते आपल्या दिग्विजयाचे कृत्य आटोपून स्ववर्गीय लोकांकडूनही उत्तम सत्कार पावून धन व मान मिळविते झाले. या प्रकारे उत्तम रीतीने त्यांनी संस्थानची वृत्ति वाढविली. ॥२०॥

एतस्य शिष्यतां प्राप्तो रमानाथगुरुर्महान् ।
शापानुग्रहसामर्थ्यसंयुक्तो विजितेन्द्रियः ॥२१॥

काही दिवसांनी या गुरुवर्यांचा श्रीरमानाथतीर्थ नामक मोठा सदाचरणनिष्ठ व शापानुग्रहसमर्थ असा शिष्य झाला. ॥२१॥

अथो भूविजयो रामचन्द्रो मुनिरुदारधीः।
अङ्कोलां प्राप्य तत्रास मठे विठ्ठलसंनिधौ ॥२२॥

त्यानंतर उत्कृष्टबुध्दिमान भूविजयरामचंद्रतीर्थ गुरुवर्य अंकोलेस येऊन राहते झाले. ॥२२॥

असौ रमानाथगुरुर्महीया-न्योगी विरक्तः सहदण्डपाणिः ।
काषायवासाः सह पादुकाभ्यां चचार तीर्थानि सुपावनानि ॥२३॥

परमविरक्त योगी रमानाथतीर्थ श्रीपाद वडेर हे काषायवस्त्रदंडपादुकांसहित पायांनीच अनेक पवित्र तीर्थे फिरून आले. ॥२३॥

श्रीमत्पर्वतकानने मठवरे सीतापतिं संस्मरं-
स्तत्रस्थं निजवीरविठ्ठलमसौ संपूजयन्योगिराट् ।
गोकर्णं च समेत्य पर्वणि महादेवस्य पाथोनिधौ
स्नानार्थं प्रययौ मुदा यतिवरो युक्तः स्वकीयैर्जनैः ॥२४॥

एके दिवशी ते पर्तगाळीहून महाशिवरात्रीचे पर्वणीकरितां गोकर्णास आले व तेथील मठात श्रीवीरविठ्ठलाचे पूजन करून समुद्रस्नानाकरिता स्वशिष्यांसह आपल्या वैभवानें युक्त होत्साते तीरावर गेले. ॥२४॥

कृत्वा स्नानं पुनर्गन्तुं स्वमठं प्रति योगिराट् ।
प्रचक्रमे स विभवैर्युक्तः स्वजनसंयुतः ॥२५॥

तेथे स्वकीय मंडळीसह स्नानादि कृत्य आटोपून तेथून परत आपल्या मठात येण्यास स्वविभवासह निघाले. ॥२५॥

तदानीं द्वेषिणो विप्रा हैविकाः पथि योगिनम् ।
रुरुधुः स्म न गन्तव्यं मार्गेऽस्मिन्विभवैरिति ॥२६॥

त्या वेळीं जातिद्वेष्ट्या अद्वैती हैविक ब्राह्मणांनी त्यांना मार्गावरून वैभवासहित जाऊ नये असे सांगून प्रतिबंध केला. ॥२६॥

श्रुत्वा स वचनं तेषां मध्याह्ने तप्तपादुकः ।
यतिः शशाप तान्विप्रान्किंचिद्रोषसमाकुलः ॥२७॥

भर दोनप्रहरची वेळ, उन्हाने पाय अगदी पोळत होते व ते ब्राह्मण तर हट्ट सोडीनात, हें पाहून सूर्यकिरणांनी संतप्तपादुका होत्साते रमानाथतीर्थ यतिवर्य यांनी किंचित् कोपाने त्यांस शाप दिला. ॥२७॥

यतिरोषसमुद्भूतशिखिवैश्वानरस्तदा।
दग्धुं प्रचक्रमे तेषां भवनानीति लोकवाक् ॥२८॥

त्याबरोबर यतीच्या कोपाने उत्पन्न झालेल्या अग्नीच्या ज्वालांनी त्यांची घरे जळू लागली अशें लोक म्हणतात. ॥२८॥

तदा प्रदुद्रुवुः सर्वे दुर्जना वह्निशान्तये।
अनन्तरं गतः स्वीयं मठं प्रति यतीश्वरः ॥२९॥

तेव्हा ते दुर्जन अग्निशांत करण्यासाठी धावले व हे गुरुवर्य मग त्याच मार्गाने आपल्या मठात आले. ॥२९॥

हैविका विस्मयं प्रापुर्निरीक्ष्य तपसो बलम् ।
अद्यापि दृश्यते चिह्नं शापस्यास्य महात्मनः ॥३०॥

त्या हैविक लोकांना या गुरुवर्यांचे तपःसामर्थ्य पाहून फार आश्चर्य वाटले. या महानुभाव गुरुवर्यांचे हे शापचिन्ह अजून तेथे दिसत आहे. ॥३०॥

ततः स दक्षिणामाशां प्रतस्थे विजयाय हि।
दिनैः कतिपयैः प्राप्तो वेङ्कटापुरमुत्तमम् ॥३१॥

त्यानंतर दिग्विजयाकरिता हे दक्षिणप्रांतांत गेले व काही दिवसांनी उत्तम अशा वेंकटापुरास पोहोचले. ॥३१॥

एवं महीयान्गुरुराज एष तपोनिधिर्मुक्तसमस्तसङ्गः।
रराज तत्रैव महानुभावः श्रीविठ्ठलाराधनतत्परः सन् ॥३२॥

याप्रमाणे हे विषयसंगामापासून अत्यंत विरक्त व तपोनिधी श्रीरमानाथतीर्थ गुरुवर्य वेंकटापुरांतच श्रीविठ्ठलाच्या आराधनेत निमग्न होऊन राहिले. ॥३२॥

*इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंह पौराणिकविरचिते सार्थे श्रीगुरुपरंपरामृते पञ्चमः स्तबकः ॥५॥*

●●●

# । षष्ठः स्तबकः ।

लक्ष्मीनाथो हि संप्राप्तस्तेषां शिष्यत्वकर्मणि।
परम्परागतां कीर्तिं स्वकीयां सोऽभ्यवर्धयत् ॥१॥

श्रीरमानाथतीर्थांच्या शिष्यांचे नांव श्रीलक्ष्मीनाथतीर्थ. यांनी आपली व गुरुपरंपरागत कीर्ति पुष्कळ वाढविली. ॥१॥

गोकर्णस्थं मठं जीर्णं नवं चक्रे तदग्रतः।
लक्ष्मीनाथः स चात्युच्चं मारुतेर्ध्वजगोपुरम् ॥२॥

गोकर्णातील मठ त्या वेळीं जीर्ण झाला होता, तो यांनी नवीन बांधला व त्याच्या अग्रभागी अति उंच मारुतीचें ध्वजगोपुर निर्माण केले. ॥२॥

ततः शिष्यं चकारासौ विनीतं वरसद्गुणम् ।
आनन्दतीर्थनामानं लक्ष्मीनाथयतीश्वरः ॥३॥

मग त्यानी स्ववर्गीयांच्या आग्रहास्तव विनीत व उत्तमगुणांनी युक्त असा आनंदतीर्थनामक शिष्य केला. ॥३॥

एवं पुनर्मठादीनां जीर्णोद्धारान्बहूनपि।
कृत्वा विभवसंयुक्तो यशः स्वीयमवर्धयत् ॥४॥

वरच्या (६/२) प्रमाणें यांनी इतरही अनेक प्राचीन मठांचा जीर्णोध्दार करून आपली कीर्ति वाढविली. ॥४॥

तीर्थाटनासक्तमना मनस्वी युक्तः स्वकीयैर्विभवैश्च वर्यः।
आनन्दतीर्थाभिधशिष्यमत्र मठे प्रतिष्ठाप्य ययौ यतीन्द्रः ॥५॥

काही दिवसानंतर त्यांना तीर्थाटनाची इच्छा होऊन ते आपले शिष्य आनंदतीर्थ याना मठात ठेऊन दक्षिण दिशेस निघाले. ॥५॥

सेतुं तथा वेङ्कटशैलवासिनं दृष्ट्वा महीयान्मठमाजगाम।
ततः परं विष्णुपदीतटं च द्रष्टुं प्रतस्थे किलयोगिराजः ॥६॥

ते सेतुदर्शन व वेंकटगिरीची यात्रा वगैरे करून पर्तगाळीस आले व थोड्या दिवसांनी भागीरथीदर्शन करण्याकरिता पुनः उत्तरदिशेस गेले. ॥६॥

गतस्ततो भीमरथीतटस्थं श्रीविठ्ठलं भीष्मककन्यया युतम्।
समर्च्य योगी स ययौ पुरस्तात्प्राप्तो बडोदापुरमुग्रतेजाः ॥७॥

त्यांनी पंढरपुरास जाऊन श्री रुक्मिणी पांडुरंगांची पूजा केली व तेथून ते बडोदेस गेले.॥७॥

तस्मिन्पुरे राजवरेण पूजितः पुत्रीयता तेन युतेन भार्यया ।
तस्मै ददौ पुत्रवरं फलं च चरुं च पुत्रप्रदमाप्तकामः ॥८॥

त्या गांवी जातांच तिकडील राजाने भार्येसह त्यांची फार प्रेमाने पूजा केली व आपली पुत्रकामना स्वामींना दर्शविली; स्वामींनी त्यास वर देऊन अभिमंत्रण करून एक फळ व हविष्यान्न वगैरे दिले ॥८॥

स्थातव्यमत्रैव भवद्भिरेवं संप्रार्थितो योगिवरः स तेन ।
उवास तत्रैव महानुभावः प्रदर्शयंस्तस्य सुतप्रजन्म ॥९॥

तें हविष्यान्न उभयतांनी भक्षण केले. राजाने त्या वेळी स्वामींना पुत्रप्रचीति आल्यानंतर पुढे गमन करावे अशी प्रेमाग्रहपूर्वक विज्ञप्ति केल्यामुळे ती प्रचीति येईपर्यंत स्वामी तेथंच राहिले. ॥९॥

आनन्दतीर्थः स यतिर्वरिष्ठो विरक्तचित्तोऽपि महाजनानाम् ।
अनुग्रहार्थं शिबिका च पाण्डुच्छत्रं तथोपाकृतवान्यतीशः ॥१०॥

आनंदतीर्थ हे अंतर्बाह्य विरक्त होते तरी स्ववर्गीय महाजनांच्या आग्रहास्तव त्यांवर अनुग्रह करण्याकरिता शिबिका, श्वेतच्छत्र इत्यादिकांचा स्वीकार करीत असत. ॥१०॥

जीर्णं मठं पुनश्चक्रे नवं पर्वतकानने
रामचन्द्रस्य पुरतश्चकार ध्वजगोपुरम् ॥११॥

त्यांनी पर्तगाळीतील मठाचा जीर्णोध्दार करून त्याच्या पुढे ध्वजगोपुर म्हणजे मारुतीचा घूड बांधला ॥११॥

एवं विभवसंयुक्तो महात्मा स्वजनैः सह।
चक्रे दिग्विजयं देशे विदेशेऽपि च सर्वतः ॥१२॥

याप्रमाणे वैभवपुरःसर स्वकीयमंडळीसह स्वदेशात[१] व परदेशांत त्यांनी दिग्विजय केला. ॥१२॥

गोकर्णसंस्थानपरम्पराया धर्मस्य संरक्षणवृत्तिहेतोः।
संपादयामास धनादिसंचयं न तु स्वभोगाय जितेंन्द्रियात्मा ॥१३॥

यांनी परंपरागत मठमर्यादा व धर्मरक्षण करण्यासाठीच भविष्य काळाचे दौर्बल्य पाहून अनेक उपायांनी क्षेत्रद्रव्यादिकांचा संचय केला; आपल्या शरीराच्या उपभोगार्थ केला नाही. ॥१३॥

यात्रां स कृत्वा मतिमान्पुरस्ताच्छ्रीसेतुबन्धस्य ययौ दिशं स्वाम्।
आगत्य गोकर्णमठे निवासं कृत्वा ययौ पर्वतकाननं च ॥१४॥

या विशुध्द-बुध्दिमान् यतिवर्यांनी श्रीरामेश्वराची यात्रा करून गोकर्णमठात येऊन काही दिवसांनंतर पर्तगाळीस गमन केले. ॥१४॥

श्रीरामचन्द्रस्य वरप्रसादं संगृह्य गोकर्णमठं स आद्यम् ।
गत्वा च शिष्यं चकमे हि पूर्णप्रज्ञाभिधानं यतिराजराजः ॥१५॥

तिकडून श्रीरामदेवाच्या आज्ञेने गोकर्णमठात येऊन तेथे त्यांनी श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ नामक शिष्य केला. ॥१५॥

---

१. टीप : त्यावेळी गोव्यात पोर्तुगीजांची व अन्यत्र इतरांची सत्ता होती.

यतिस्तीर्थान्यनेकानि क्षेत्राणि च ततस्ततः ।
चचार विजयी वीरविठ्ठलार्चनतत्परः ॥१६॥

त्यानंतर त्यांनी श्रीवीरविठ्ठलाच्या उपासनेत तत्पर राहून पुष्कळ तीर्थक्षेत्रयात्रा केल्या. ॥१६॥

अनन्तरमुवासात्र मठे पर्वतकानने।
एवमानन्दतीर्थस्य वर्णितं लेशतो यशः ॥१७॥

व वार्धक्यदशा पावल्यामुळे मग पर्तगाळी मठातच राहणे केले. याप्रमाणे श्रीमदानंदतीर्थश्रीपादांचे चरित्र अणुमात्र वर्णन केले. ॥१७॥

येषां मतिः पूर्णतमेति पूर्णप्रज्ञाभिधानं प्रथितं बभूव
वेदान्तविद्यापरिपालनाय घुरंघराणां शरणं भवामि ॥१८॥

आता ज्यांची बुध्दि विषयविरक्त असून ज्ञानविज्ञानाने परिपूर्ण झालेली होती, व म्हणूनच ज्यांना पूर्णप्रज्ञ हे नाव शोभत होते, त्या हरिसर्वोत्तमत्वप्रतिपादक-वेदांतशास्त्रनिष्णात गुरुवर्यांच्या चरणी मी शरणागत होतो. ॥१८॥

अयमपि पूर्णप्रज्ञः पूर्णप्रज्ञेन निर्मितं दिव्यम् ।
सूत्राणां सद्भाष्यं स्वधीतवान्संततं महादरतः ॥१९॥

हेही नावाने पूर्णप्रज्ञच असून आद्य पूर्णप्रज्ञांनी (श्रीमध्वाचार्यांनी) केलेल्या ब्रह्मसूत्रभाष्याचे अध्ययन सतत मोठ्या आदराने करीत असत. ॥१९॥

पुनर्गुरुर्न्यायसुधामधीतुं विनिर्मितां श्रीजयतीर्थवर्यैः।
धृत्वा मनो वृत्तपुरं च गत्वा तत्रस्थमाचार्यमसौ ददर्श ॥२०॥

पुनः श्रीमज्जयतीर्थकृत न्यायसुधा ग्रंथाचे अध्ययन करण्याची इच्छा धरून भटकळास गेले व तेथील स्वकीय न्यायसुधाध्यापक श्रीमदग्निहोत्रि अनंत पौराणिकांचा समागम पावले. ॥२०॥

अनन्तशर्माणमथाग्निहोत्रिणं कृत्वा पुरोवर्तिनमाससाद ।
सुधार्थमत्यर्थमवाप्तकामः पुनर्जगाम श्रवणं धरित्र्याः ॥२१॥

स्वकीयब्रह्मवृंदांतर्गत जो पौराणिक अनंतशर्मा, त्यास आपल्या समोर बसवून त्याकडून श्रीमन्न्यायसुधेचा अभ्यास पूर्ण करून पूर्णप्रज्ञतीर्थ हे पुनः गोकर्णास पोहोचले. ॥२१॥

अतो जगामाशु समाहितात्मा मठं यतिः पर्वतकाननस्थम् ।
शिष्यान्समध्यापयदेष तत्र सूत्राणि भाष्यं च महार्थयुक्तम् ॥२२॥

तेथून पर्तगाळीस जाऊन स्वकीय शिष्यवर्गास सूत्रें व श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यप्रणीत महार्थयुक्त ब्रह्मसूत्रभाष्य आदि करून सिध्दांतशास्त्राचे ग्रंथ ते स्वतः शिकवू लागले. ॥२२॥

प्रकाशिकां तत्त्वविनिर्णयं च विष्णोस्तथा न्यायसुधां बुधेन्द्रः।
अध्यापयच्छिष्यवरान्स पूर्ण-प्रज्ञाख्ययोगी नितरां सहर्षः ॥२३॥

तसेंच ते विद्वत्श्रेष्ठ श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थस्वामी पुनः आपल्या शिष्यवर्यांकडून तत्त्वप्रकाशिका, विष्णुतत्त्वविनिर्णय व न्यायसुधा इत्यादि ग्रंथांचा अभ्यास करवू लागले. ॥२३॥

जना : सुधापण्डितमाहुरेनं तथा वरीयान्गुरुराज एषः ।
चकार शिष्यं निजधर्मवर्तिनं श्रीपद्मनाभं यतिपं तमाहुः ॥२४॥

सर्व जन यांस सुधापंडित (श्रीमन्न्यायसुधाग्रंथ सांगणारे मोठे विद्वान्) असे म्हणतात. काही दिवसानी या धर्माध्यक्ष स्वामीराजांनी स्वकीयामठपरंपरागतधर्मप्रवर्तक असा शिष्य केला; त्यास श्रीपद्मनाभतीर्थश्रीपादवडेर असे म्हणतात. ॥२४॥

छत्रपुरादौ निजमठजीर्णोध्दारादि कर्म कृत्वासौ।
रेजे वदान्यवर्यः पूर्णप्रज्ञाभिधानयतिराजः ॥२५॥

मंगळूर आदि स्वकीयपरंपरागत मठांचा जीर्णोध्दार करून श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ हे लोकात वदान्यप्रभु (दातृश्रेष्ठ) अशी कीर्ति पावले. ॥२५॥

ततः कदाचिद्धरिभक्तिभाजनं पवित्रकर्मा स हि पूर्णबुध्दिः ।
आलोच्य संस्थाप्य मठे स्वशिष्यं श्रीशैलराजं प्रति संप्रतस्थे ।।२६।।

काही दिवसानी भगवद्भक्तीचे पूर्णपात्र व सदाचारनिष्ठ असे हे श्री पूर्णप्रज्ञतीर्थ यतिवर्य श्रीशैलयात्रेस जाण्याच्या उद्देशाने पर्तगाळीमठात श्रीपद्मनाभतीर्थ यास ठेऊन प्रयाण करिते झाले. ।।२६।।

सहानुशिष्यैर्विभवैर्युतः सन्गत्वा गिरि वेङ्कटनायकं च ।
दृष्ट्वा प्रभाते नवनीतयुक्त -मार्तिक्यमार्प्याथ जगामकञ्चीम् ।।२७।।

ते स्वकीयमंडळीसहित छत्रचामरादिकांनी युक्त होत्साते वाटेवरील तीर्थांत स्नान करीत करीत वेंकटगिरीवर पोहोचले व तेथे भैरवदर्शन, वराहार्चन आणि वेंकटेशाचें दर्शन करून व त्याचप्रमाणें तेथे प्रभातकाली नैवनीतार्ति समर्पण करून कंचीक्षेत्रास गेले. ।।२७।।

तस्यां स पश्यन्वरदायकं हरिं ततः क्रमेणाशु जगाम सेतुम् ।
निमज्य तस्मिञ्जलधौ च नत्वा रामेश्वरं प्राप यतिप्रवर्हः ।।२८।।

कंचीत वरदराजाचे दर्शन घेऊन रामेश्वरास गेले व तेथे धनुष्कोटीवर समुद्रस्नानादिक आटोपून श्रीसेतुमाधवाचे दर्शन घेतले. ।।२८।।

ततः पुरस्तादथ पद्मनाभं प्रणम्य गोकर्णमठं ययौ सः।
ततः स्वशिष्यं किल पद्मनाभं प्राध्यापयामास सुधां गरिष्ठः ।।२९।।

मग तेथून पुढे असणाऱ्या अनंतपद्मनाभाचे दर्शन घेऊन त्याच मार्गाने ते गोकर्णमठात आले व तेथून पर्तगाळीस जाऊन तेथे आपले शिष्य श्री पद्मनाभतीर्थ यांना श्रीमन्न्यायसुधा शिकविली. ।।२९।।

मासेमासे स योगीन्द्रो नित्यं भागवतं पठन् ।
विधायावृत्तिमेकैकां भक्त्या विष्णौ समार्पयत् ।।३०।।

त्यानंतर ते श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ योगिवर्ग निरंतर भागवत पारायण करून प्रतिमासाला एक एक आवृत्ति पौर्णिमेदिवशी समाप्ति करून संतर्पणपूर्वक विष्णुस समर्पण करीत होते. ।।३०।।

---

१ ही नवनीतार्ति त्या स्वामिमहाराजांच्या नावाने अनेक वर्षपर्यंत तेथे चालत आहे. अलिकडे कोणत्या कारणाने बंध पडली ते समजत नाही.

अग्र्यो गुरूणां यशसः सुपात्रं यात्रार्थमत्यर्थमथ प्रतस्थे।
दिशामुदीची परिवारसंयुतः कोल्हापुरं प्राप जनार्चिताङ्घ्रिः ।।३१।।

काही दिवसांनी सत्कीर्तीचे पूर्णपात्र असे हे गुरुवर्य उत्तर यात्रेच्या उद्देशाने निघाले ते वाटेवरच्या लोकांनी पूजितपाद असे होऊन कोल्हापुरास पोहोचले. ।।३१।।

रमां समभ्यर्च्य महानुभाव-स्तत्रत्यराजो गुरुणा समर्चितः।
ततः पुरस्ताद्विभवैर्युतः सत्क्रमेण संप्राप स गौतमीतटम् ।।३२।।

हे महात्मे गुरुमहाराज तेथील महाराजांचे गुरु रावजी महाराज यांजकडून पूजनपूर्वक सत्कार पावून व श्री लक्ष्मीदेवीचे पूजन करून, आपल्या वैभवांनी युक्त होऊन, क्रमाने तीर्थक्षेत्रांचे दर्शन करीत नासिक क्षेत्रास जाऊन पोहोचले. ।।३२।।

ततः प्रयागं गत्वासौ विधिना स्नानमाचरन् ।
प्रयागमाधवं नत्वा यतिः काशीं समाययौ ।।३३।।

तेथून प्रयागक्षेत्रास गेले व तेथे विधिपूर्वक स्नान करून प्रयागमाधवाचे नमस्कारपूर्वक दर्शन घेऊन काशीक्षेत्रास गेले. ।।३३।।

अथ तत्र विष्णुपद्यां निमज्य विश्वेश्वरं प्रणम्यासौ ।
विप्राणां द्वादशकं भोजयितुं नित्यमातनोद्वृत्तिम् ।।३४।।

तिकडे भागीरथीत स्नान करून, विश्वेश्वराचे दर्शन घेऊन, तिकडील मठात दररोज बारा ब्राह्मणांचे संतर्पण चालण्यासारखी त्यांनी वृत्ति स्थापन करून दिली. ।।३४।।

एवं कृतकर्मासौ जन्हुसुतायास्तटे हि निष्ठावान् ।
स्नानं विप्रार्चनमपि चक्रे भूयः स माधवायार्प्य ।।३५।।

याप्रमाणे भागीरथीतीरावर काही दिवस राहून, तेथे त्रिषवणस्नान[१], सहस्त्रब्राह्मणसंतर्पण इत्यादि कर्म करून ते तेथील श्रीबिंदुमाधवास अर्पण केले. ।।३५।।

---

१. त्रिषवण - दिवसांत प्रातःस्नान, माध्यान्हस्नान व सायंस्नान अशी तीन वेळा करावयाची स्नाने.

संश्रुत्य कीर्तिं विषदां च शास्त्रिणो निमंत्रयांचक्रुरमुं समुद्यताः।
समागमार्थं वरमण्डपालये तदा तुतोषाशु यतीन्द्रवर्यः ॥३६॥

अशी यांची उत्तम कीर्ति व पांडित्य श्रवण करून तेथील विद्वान शास्त्री व पंडित यांनी त्यांना सभामंडपामध्ये समागमाकरितां आमंत्रण केले; ते ऐकून गुरुवर्यांनाही फार संतोष झाला. ॥३६॥

ततो गतः स्वैर्विभवैर्युतः सन् सभां सुदिव्यां वरमण्डपस्थाम् ।
समागतं वीक्ष्य यतिं संमुत्थिता ये शास्त्रिणस्ते ददुरुच्चमासनम् ॥३७॥

दुसऱ्या दिवशी हे गुरुवर्य आपल्या वैभवासहित वाहनारूढ होऊन सभामंडपात गेले; तो तेथील विद्वज्जनांनीं यांना अभ्युत्थान देऊन सत्कारपूर्वक उच्चासनावर आणून वसविले. ॥३७॥

पाण्डित्यचन्द्रोदयचन्द्रिकामसौ प्रकाशयामास महासभायाम् ।
अनन्तरं तैः प्रसमर्चितोऽयं संभावितोऽ भूज्जयपत्रिकादिभिः ॥३८॥

तिकडे यांनी पांडित्यरूपचंद्रिकेचा प्रकाश पाडला; तेव्हा सर्व सभासद अगदी चकित होऊन गेले व त्यांनी यांची पूजा करून विजयपत्रही दिले. ॥३८॥

सभायां विजयं प्राप्य शास्त्रिणस्तोषयन्धनैः।
ततस्ते घोषयांचक्रुः सुधापण्डितमित्यमुम् ॥३९॥

याप्रमाणें सभेत विजय मिळवून गुरुवर्यांनी तिकडील शास्त्रिपंडितांना विपुल दक्षणा व वस्त्रालंकारादिक देऊन संतुष्ट केले. त्यावेळीं तेथील पंडितांनीं यांना सुधापंडित अशी उपाधि दिली. ॥३९॥

ततो यतिर्गयाक्षेत्रं गत्वा विष्णुपदं वटम् ।
नमस्कृत्य कृतार्थोऽसौ पुनः स्वां दिशमाययौ ॥४०॥

मग तिकडून हे गयेस जाऊन तेथील विष्णुपद व अक्षयवट यांचे दर्शन घेऊन आपल्या देशाकडे वळले. ॥४०॥

तदनु निजजनपदमयन्नयं तापसाग्रणीः क्रमेण पुरग्रामव्रजाकरतीर्थक्षेत्र तदीशनिवासक्षितिमतीत्य महाराजन्यवृन्दाध्युषितमपास्तसुरपुरीवैभवभ्रमं महीयसामग्रजन्मनामावासप्रचुरं पुण्यग्राममवाप्तस्तत्रत्यै रखिल शास्त्रागमार्थप्रचारवद्भिर्विद्वद्भिरादरादनुमोदितः कृतचरणसपर्यश्च तदानीमेतेषां सकलशास्त्रभिज्ञतां पश्यद्भिः काशीस्थपण्डितैः समर्पितमानपत्रमवलोक्य सविनयमेतैरपि निवेदितमानपत्रमुपाकृत्योच्चैरुच्चारितनमो-नारायणायेति-वचनपूर्विकाशीर्भिर्वर्धयँस्तान्धनवसनसंचयैः संभावयन्म-हितमहानुभावोऽत्रभवान्पूर्णप्रज्ञ तीर्थश्रीपादवर्यः श्रवणमङ्गलस्वयशःप्राचुर्येण दिगन्तरालमवभासयँस्तस्याः पुण्यपुर्याः प्रतस्थे ॥४१॥

त्यानंतर हे तपस्विश्रेष्ठ श्रीपूर्णप्रज्ञतीर्थश्रीपादस्वामीगुरुमहाराज स्वदेशास जाण्याच्या हेतूने वाटेवरची क्रमाने प्राप्त होणारी शहरे, गांवे, खेडी, खाण्या, नद्या, तीर्थे, क्षेत्रे वगैरे अनेक स्थळे पार करून आले ते, ज्यांत अनेक राजेरजवाडे होते व विद्वान अशा तद्देशीय ब्राह्मणवृंदांच्या वसती होत्या आणि जे तऱ्हेतऱ्हेच्या वैभवांनी इंद्रनगरी अमरावतीचे गर्व हरण करणारे अशा पुण्यपत्तनी (पुणे येथे) पोचले. तेथे महान् विद्वान शास्त्रीजनांनी यांचे सर्व शास्त्रांमधील प्राविण्य पाहून आणि काशीस्थ पंडितांनीं दिलेले बहुमानपत्रही अवलोकून यांना बहुमानपत्र दिले. त्यावेळी स्वामींनी त्या शास्त्र्यांस नमोनारायणाय असा उच्चारपूर्वक आशीर्वाद देऊन पुष्कळ दक्षिणा व वस्त्रे यांच्या संभावनेनेही संतुष्ट केले. त्या देशांत तर या स्वामींची विद्याकौशल्यकीर्ति त्यावेळी सर्वत्र पसरली. याप्रमाणे पुण्यात विजय मिळवून ते पुढे निघाले. ॥४१॥

क्रमेण तीर्थानि निरीक्ष्य योगी मठालयं पर्वतकाननस्थम् ।
गत्वा रघूणां प्रवरं च नत्वा श्रीविट्ठलं व्यर्च्य मुदं प्रपेदे ॥४२॥

वाटेवरील तीर्थे अवलोकन करीत पर्तगाळी मठात येऊन तेथे श्रीराम व श्रीवीरविट्ठल यांचे पूजन करून संतोष पावले. ॥४२॥

पुनरध्यापयच्छिष्यान्नरहर्यादिकान्सुधाम्।
एवं विभवमापन्नः पूर्णप्रज्ञगुरुस्तदा ।।४३।।

पुनः त्यांनी नरहरि पौराणिक आदिकरून शिष्यांना श्रीमन्न्यायसुधा शिकविली. याप्रमाणें श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थांनी उत्कृष्ट कीर्ति मिळविली. ।।४३।।

अथो चकारैप सहस्रविप्र- संतर्पणं श्रीभृगुरामसंनिधौ।
एवं कृतार्थो मुदमाप तत्र मठे स्वकीये किल तीर्थकीर्तिः ।।४४।।

तसेच त्यांनी पैंगिणीत श्रीपरशुरामदेवाजवळ सहस्रब्राह्मणसंतर्पण केलें व कृतकृत्य होऊन ते आपल्या पर्तगाळी मठातच राहिले. ।।४४।।

अयं महात्मा किल पूर्णबुध्देः शिष्यत्वमाप्तः कृतिनां वरिष्ठः।
भूयाद्यतीन्द्रो गुरुपद्मनाभ- श्रीपादराजो विजयप्रदो नः ।।४५।।

आता श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थांचे शिष्य महानुभाव पंडितश्रेष्ठ श्रीमत्पद्मनाभतीर्थ गुरुमहाराज हे आम्हांस विजय देणारे होवोत. ।।४५।।

सूत्राणि भाष्यं समवाप्य दिव्यं सुधाममोघां स्वगुरोर्गरीयसः।
शाब्दं तथा न्यायनयं च योगी शिष्यान्समध्यापयदुत्तमान्स्वान् ।।४६।।

यांनी ब्रह्मसूत्रें व त्यावरील श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यप्रणीत भाष्य, तसेच श्रीजयतीर्थकृत श्रीमन्न्यायसुधादिक ग्रंथ व पाणिनिकृत व्याकरण आणि न्यायशास्त्र वगैरे ग्रंथांचे आपल्या गुरूंकडे अध्ययन करून ते ग्रंथ आपल्या शिष्यांसही शिकविले. ।।४६।।

यात्राकृतेऽसौ वृषभाद्रिनाथं गत्वा तमाप्राच्र्य जगाम सेतुम् ।
स्नात्वात्र सिन्धौ वरपद्मनाभ- क्षेत्रं ततः प्राप यतीन्द्रवर्यः ।।४७।।

कांही दिवसांनी हे यात्रेकरिता निघाले व श्रीवेंकटगिरीवर जाऊन वेंकटेशाचे दर्शन, अर्चन वगैरे करून दक्षिणेकडे वाटेवरील तीर्थे करीत धनुष्कोटीत श्रीसेतुदर्शन, समुद्रस्नान, श्रीसेतुमाधवार्चन वगैरे करून अनंतपद्मनाभक्षेत्रास गेले. ।।४७।।

तेनाध्वनासौ वरमञ्जुलापुरं प्राप्तः स्वकीयार्चितपादयुग्मः।
तत्रस्थमीशं नृहरिं समर्च्य भद्रं स्वभद्राय ययौ पुरस्तात् ॥४८॥

त्याच मार्गाने ते मंजेश्वरास आले तिकडे स्वकीय लोकांनी त्यांचा उत्तम आदरसत्कार केला. तेथे असलेल्या भद्रनरसिंहाची पूजा करून, स्वकीय मनोभीष्ट प्राप्तीसाठी कांही सेवाही करून पुढे निघाले. ॥४८॥

गत्वा पुरं श्रीरजतासनाख्यं ततो ययौ गर्भपुरं परिव्राट् ।
संपूज्य तत्र स्वमठस्थमाद्यं श्रीविठ्ठलं वृत्तपुरं ययौ ततः ॥४९॥

त्यानंतर ते उडुपिक्षेत्रास येऊन पोहोचले. तेथून ते यतिवर्य बसरूरास येऊन तिकडे स्वकीय मठात श्री दिग्विजयविठ्ठलाची पूजा करून भटकळास आले. ॥४९॥

ततो गोकर्णमागत्य तत्रोवास दिनत्रयम्।
मठे स्वकीये योगीन्द्रो विठ्ठलार्चनतत्परः ॥५०॥

तिकडून गोकर्णास येऊन मठामध्ये श्री भूविजयविठ्ठलाच्या व श्री वीरविठ्ठलाच्या उपासनेत आसक्त होऊन ते तीन दिवस तेथेच राहिले. ॥५०॥

ततो गतः पर्वतकाननस्थं मठं महात्मा किल पद्मनाभः।
श्रीविठ्ठलाराधनसंयतात्मा श्रीरामचन्द्रं मनसा समार्चयत् ॥५१॥

श्री वीरविठ्ठलाची आराधना करण्यात ज्यांचे चित्त आसक्त, असे ते गुरुवर्य गोकर्णाहून पर्तगाळीस जाऊन तेथील मठात श्रीरामचंद्राची मनःपूर्वक पूजा करिते झाले. ॥५१॥

कलेर्बलादागतवन्महद्भयं विज्ञान धर्मं स्वगतः रिरक्षिषुः।
संपादयामास धनं च वृत्ति-क्षेत्राणि नद्यम्बुसमीहितानि ॥५२॥

यांनी पुढे कलिकालामुळे स्ववर्गीयांना द्रव्यद्वारे वगैरे संस्थानची सेवा करण्यास दौर्बल्य प्राप्त होईल असे जाणून स्वधर्मसंरक्षणाच्या उपयोगार्थ अनेक नदीमातृक व देवमातृक अशी शेते वगैरे संपादन केली. ॥५२॥

अतः परं पर्वतकानेनऽस्मि-ञ्छ्रीपद्मनाभो यतिराज एषः।
परम्पराधर्ममवेक्ष्य शिष्यं स इन्दिराकान्तमवाप दिव्यम् ॥५३॥

नंतर श्रीपद्मनाभतीर्थश्रीपादवडेर यांनी श्रीसंस्थान पर्तगाळी मठात निवास करून स्वकीयमठपरंपरागतधर्माप्रमाणे इंदिराकांततीर्थ या नांवाचे शिष्य केले. ॥५३॥

एवं श्रीपद्मनाभाख्ययतीनामूर्ध्वरेतसाम्।
यशसामुदयो मेऽस्तु संपदे विजयाय च ॥५४॥

याप्रमाणे उर्ध्वरेते श्रीपद्मनाभतीर्थस्वामी यांचा कीर्तिमहोदय वर्णन केला; तो मला विजय व ज्ञानसंपत्ति देणारो होवो. ॥५४॥

इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिक
विरचिते सार्थे श्रीगुरुपरम्परामृते षष्ठः स्तबकः ॥६॥

● ● ●

# सप्तमः स्तबकः

श्रीमद्वेदान्तशास्त्रप्रमुखसकलसच्छास्त्ररत्नाकरो यो
यः श्रीसारस्वताख्यद्विजनयनमनःसारसद्वादशात्मा।
शान्त्या दान्त्या विरक्त्या निरशनतपसा योऽद्वितीयश्चसोऽयं
नित्यं सज्ज्ञानवृध्यै भवतु मनसि नःश्रीन्दिराकान्ततीर्थः ॥१॥

श्रीमत्तर्कव्याकरणाद्यङ्गशास्त्रें ह्याच कोणी दीप्ति यांनी दैदिप्यमान अशा श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्योध्दृतवेदांतशास्त्रप्रभृति- समस्तसच्छास्त्ररूपी उत्तमप्रकारच्या रत्नांनी भरलेल्या समुद्राप्रमाणे असणारे जे श्रीगौडसारस्वतब्राह्मणांचे डोळे व हृदयें हींच कोणी कमले यांना प्रफुल्लित करण्याविषयी सूर्यच; जे 'शान्ति म्हणजे बुध्दीची भगवन्निष्ठता, दांति म्हणजे सकलेंद्रियांना जिंकणे, विरक्ति म्हणजे असारसुखसाधनीभूत इंद्रियविषयांच्या ठायीं वैराग्य, व निरशनतप म्हणजे प्रसिध्दान्नाचा परित्याग आहे, ज्या तपश्चर्येंत ते अशा या चार गुणांमुळें ज्यांना दुसरी उपमा देतां येत नाहीं असे; आणि ज्यांच्या हृदयांत श्रीलक्ष्मीपति नारायणाचा वास आहे; असे हे श्रीमादंदिराकांततीर्थश्रीपादवडेरस्वामी तत्वज्ञानाच्या अभिवृध्दीसाठी आमच्या मनामध्ये सदासर्वकाळ वास करोत. ॥१॥

शाके वेदरसावसूडुपमिते संवत्सरे नन्दने
वारे श्रेयसि भूभुवोऽशुचिशुचौ पक्षे तृतीयातिथौ।
विद्वद्वैदिकलौकिकद्विजजनैर्भक्त्याभिषिक्तोऽभव-
च्छ्रीगोकर्णमठावनीसमवने स्वामीन्दिराकान्तराट् ॥२॥

श्रीमत्पद्मनाभतीर्थश्रीपादवडेरस्वामीमहाराज समाधिस्थ झालेल्या दिवसापासून बाराव्या दिवशी म्हणजे म्हणजे श्रीशालिवाहनशक १८१४ नंदननामसंवत्सर आषाढमास कृष्णपक्ष तृतीया मंगलवारी शुभदिवशी श्रीगौडसारस्वतब्राह्मणवृंदांतील समस्त विद्वान अशा वैदिकांनी व गृहस्थांनी श्रीगोकर्णमठसंस्थानरूपी भूतलाचे परंपरागतधर्माने रक्षण होण्याकरिता श्रीमदिंदिराकांततीर्थश्रीपादवडेर स्वामीमहाराज नामे राजाला पट्टाभिषेक केला. ॥२॥

श्रीवीरविठ्ठलसमर्चनसक्तचित्तः श्रीरामदेवपदवारिरुहद्विरेफः
सारस्वतद्विजजनार्चितपादवार्जः प्रभान्मठे यतिपतिर्गिरिकानने सः ।।३।।

तेव्हा, परमहंसांनी उपास्य अशा श्रीवीरविठ्ठलाच्या पूजनाविषयी अतिदृढ भक्तीने आसक्त झाले आहे चित्त ज्यांचे, अशा श्रीरामदेवाच्या चरणरूपी कमलांच्या ठायी भ्रमरच झाले आहेत जे, श्रीगौडसारस्वतब्राह्मणवृंदांनी पूजित आहेत कमलांसारखे चरण ज्यांचे, असे हे यतिवर्य श्रीमंदिंदिराकांततीर्थश्रीपादस्वामी पर्तगाळीतील मठांत अत्यंत प्रकाशमान होते झाले. ।।३।।

आनन्दतीर्थे प्रणिमज्य जिष्णुः सुधां च पीत्वा सुमनःप्रलालिताम् ।
प्रकाशिकायां विहरन्स मञ्जरीर्धृत्वा गले विष्णुपदे रतोऽभूत् ।।४।।

सर्व वादिलोकांस जिंकण्याविषयी समर्थ असे ते श्रीमदिंदिराकांततीर्थस्वामिरूपी देवेंद्र हे श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यप्रणीत वेदांतशास्त्ररूपी नंदनवनातील सरोवरात स्नान करून, विद्वान लोकरूपी देवांकडून बहुमानित असे श्रीमज्जयतीर्थप्रणीत श्रीमन्न्यायसुधारूपी अमृत प्राशन करून, 'तत्वप्रकाशिका' या नांवाची ब्रह्मसूत्र भाष्याची टीका हेच कोणी एक चांदणे त्यात विहार करीत, मंदार-मंजरी मंत्रार्थमंजरी व तत्वमंजरी एतत् ग्रंथरूपी सुगंधी वनस्पतीच्या मंजरींना गळ्यात धारण करून, श्रीमन्नारायण चरणरूपी आकाशात आसक्त झाले.

तात्पर्य काय ? - देवेंद्र हा नंदनवनातील सरोवरात स्नान करितो, देवांनी बहुमानित असे अमृत प्राशन करितो, तऱ्हेतऱ्हेच्या सुगंधी वनस्पतींच्या मंजरीनां (माला करून) गळ्यात धारण करितो, आणि क्रीडेसाठी चांदण्यात (विमानात बसून) आकाशांत इकडे तिकडे फिरतो - तसे श्रीमदिंदिराकांतीर्थस्वामी हे श्रीमदानंदतीर्थ भगवत्पादाचार्यप्रणित वेदांतशास्त्र पढले, विद्वान लोकांनी बहुमानित अशी श्रीमज्जयतीर्थप्रणीत श्रीमन्न्यायसुधा पढले, ब्रह्मसूत्रभाष्याची टीका तत्वप्रकाशिका पढले, 'मंदारमंजरी, मंत्रार्थमंजरी व तत्वमंजरी' मुखोद्गत करिते झाले, व शेवटी 'सकल सच्छास्त्रप्रतिपाद्य श्रीमन्नारायण हा एकटा सर्वोत्तम, सच्चिदानंदाद्यनन्तगुणपरिपूर्ण, सत्य अशा जीवांहून आणि नित्यानित्य जडांहून अत्यंत विलक्षण व सर्व स्वतंत्र असून सर्व जीवांना त्याच्या अनुग्रहाने स्वस्वरूपानंदाविर्भावरूप मुक्ति प्राप्त होते व अत्यंत दृढ भक्तीनें त्याचा अनुग्रह जीवांना साध्य होतो' असे जाणून त्याच्या चरणीं अत्यंत रत झाले ।।४।।

सोऽयं शास्त्राणि सर्वाणि योगीशः समधीतवान्।
ज्ञानार्थानि हि शास्त्राणि ज्ञानमर्थो हि योगिनाम् ॥५॥

या परमहंसश्रेष्ठ श्रीमदिंदिराकांततीर्थ गुरुमहाराजांनी तर्कव्याकरणब्रह्ममीमांसादि सर्व शास्त्रांचे अध्ययन केले. परमहंसश्रेष्ठ अशा या गुरुमहाराजाना श्रमसाध्य अशा त्या शास्त्राध्ययनाचे काय प्रयोजन आहे बरे?- शास्त्र ही चेतनाचेतनात्मक अशा या सर्व जगाचे ज्ञान उत्पन्न करून देणारी असतात; त्यामुळें शास्त्राध्ययनाने शास्त्रजन्य तत्वज्ञानाचेच या परमहंसांना प्रयोजन आहे. परमहंसांचे धन कोणते? तर तत्वज्ञान हेच.

तात्पर्य काय ? - 'तत्वज्ञानान्निःश्रेयसाधिगमः' म्हणजे तत्वज्ञानाने सर्वेश्वराच्याठायीं भक्ति, तिने सर्वेश्वराचा अनुग्रह, त्याने मुक्ति; मुक्तीच्या प्राप्तीसाठी विषयविरक्त मनुष्यास परमहंसाश्रमाचा स्वीकार; परमहंसाश्रमांत जाऊन तत्त्वज्ञान संपादन करणे हे परमहंसाचे धन अशी परंपरा असल्यामुळे मुक्तिसाधनीभूत अशा तत्वज्ञानाच्याच प्राप्तीसाठी या गुरुमहाराजांनी सर्व शास्त्रांचे अध्ययन केले. ॥५॥

अयं महात्मा ह्यसकृद्दिशासु सर्वासु गत्वा विजयं च कृत्वा।
लब्ध्वा च वित्तं मठमेत्य च स्वं श्रीरामदेवाय समार्पयच्च ॥६॥

हे महानुभाव श्रीगुरुमहाराज आपल्या संस्थानच्या धर्माप्रमाणे चोहो दिशांकडे सर्वत्र जाऊन, दिग्विजय करून, स्वस्वर्गीयांनी अर्पण केलेले द्रव्यादिक घेऊन, परत स्वकीय पर्तगाळी मठात येऊन, आणलेले द्रव्यादिक श्रीरामदेवाला भक्तीने अर्पण करिते झाले; असे यांनी पुष्कळदा केले. ॥६॥

अथ योगिवरस्य कामना समभूत्तीर्थनिषेवणे परम् ।
तदपेक्षत वीरविठ्ठलो ननु चित्रं स हि तीर्थतीर्थपत् ॥७॥

असे असता कांही काळानंतर तीर्थयात्रा करावी अशी या मुनिवर्यास मोठी इच्छा झाली; त्याचप्रमाणे यांच्या उपास्य दैवत श्रीवीरविठ्ठलासही तीर्थयात्रा करावी अशी इच्छा झाली; येथे श्रीवीरविठ्ठलास तीर्थयात्रा करावी अशी इच्छा उत्पन्न झाली असें म्हणणे याचें आश्चर्य वाटेल; कारण - त्याच्या चरणाच्याठायी तर सर्व तीर्थांचे तीर्थ अशी गंगा आहे!

तात्पर्य काय ? - सर्व तीर्थांना सुध्दां पवित्र करणारी गंगा ही ज्याच्या चरणाच्या ठायी सदासर्वकाळ आहे, त्या श्री वीरविठ्ठलाच्या चरणाचे नित्य पूजन करणाऱ्या या मुनिवर्याला जरी तीर्थयात्रेची मुळीच गरज नसली, तरी केवळ भगवत्प्रीतीसाठी श्री वीरविठ्ठलाला बरोबर घेऊन त्याची उपासना करीत करीत तीर्थयात्रा करावी अशी या मुनिवर्य श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपाद गुरुमहाराजांस मोठी इच्छा झाली ।।७।।

प्रातिष्ठतास्मान्मुनिराण्मठाद्यदा यात्राकृते सच्छिबिकारथस्थः।
अज्ञानचोरा हि तदा पलायिता- स्तत्तद्दिशावर्तिनृहृद्गृहेभ्यः ।।८।।

त्यापुढे हा मुनिराजरूपी राजा उत्तमप्रकारच्या पालखीरूपी रथात बसून यात्रेच्या उद्देशाने पर्तगाळीतील श्रीमठसंस्थानातून जेव्हा निघाला, तेव्हा त्या दिशेतील लोकांच्या अंतःकरणरूपी घरांतून अज्ञानरूपी चोर पळाले.

तात्पर्य काय ? - राजा हा फिरण्याकरिता आपल्या उत्तम प्रकारच्या रथांत बसून राजसंस्थानांतून ज्या दिशेकडे तोंड करून जेव्हा निघतो, तेव्हा तें वर्तमान ऐकून त्या दिशेतील लोकांच्या घरी आलेले चोर भिऊन पळ काढतात. तसे - श्रीमदिंदिराकांततीर्थ गुरुमहाराज तीर्थयात्रेकरिता आपल्या उत्तमप्रकारच्या पालखीत बसून श्रीसंस्थान पर्तगाळी मठातून दक्षिणदिशेकडे तोंड करून निघाले तेव्हा तें वर्तमान ऐकून त्या दिशेतील लोक सज्ञान झाल्यामुळे त्यांच्या हृदयांतील अज्ञाने दूर झाली. ।।८।।

ततो गोकर्णमाप्नोत्स तदा तस्मान्मुनीश्वरात् ।
वटुर्मोक्षाय संन्यासं प्राप्नोन्नरहरिर्हि सः ।।९।।

पर्तगाळी मठांतून निघालेले ते मुनिवर्य गोकर्णक्षेत्रांत आले आणि आपल्या मठात राहिले; तेव्हा त्यांच्याकडून विषयविरक्त असे एक ब्रह्मचारी मुक्तीसाठी परमहंसाश्रम स्वीकारिते झाले; त्यांचे नांव नरहरितीर्थ होय. ।।९।।

अथो सशिष्यो यतिराडवाप्नो- त्कुम्भापुरं श्रीकरुणास्पदं सः।
समादृतस्तत्र महाजनेन श्रीगौडसारस्वतवंशजेन ।।१०।।

त्यानंतर सशिष्य गोकर्णाहून निघालेले ते मुनिवर्य श्रीलक्ष्मीदेवीच्या पूर्णकृपाकटाक्षाला पात्र झालेल्या कुमठा या नामक शहरांत पोहोचले; तिकडे स्ववर्गीय महाजनांनी मोठ्या भक्तीने त्यांचे आदरातिथ्य केलें. ।।१०।।

यतिपतिरपि दृष्ट्वा तत्र कुम्भापुरे स्वा-न्नरहरिगुरुभक्तान्वैदिकाँलौकिकांश्च।
निजसमयपथस्थान्दानशूरान्द्विजातीन्मुदमलभत यस्माध्दर्मपास्तन्मठेशाः ॥११॥

त्या कुमठा शहरांत सर्वही वैदिक व गृहस्थ लोक आपला सिध्दांत जे मध्वमत त्यात गुंग झालेले, तसेच स्ववर्णाश्रमोचित स्नानसंध्यावंदनादि नित्यनैमित्तिक अशा कर्मांत निष्णात झालेले, परमात्मा श्रीमन्नारायण हा सर्वोत्तम असें जाणून व लक्ष्मीब्रह्मरुद्रांपासून मनुष्योत्तमांपर्यंत असणारे सर्वही आपआपल्या योग्यतेप्रमाणे उपदेशद्वारें तत्त्वज्ञान देणारे गुरु होत. असे जाणूनही तारतम्याने त्यांची यथाशक्ति भक्ति करणारे, व दानधर्म करण्याविषयी महान् शूर असलेले, अशा स्ववर्गीय ब्राह्मणांस पाहून ते यतिवर्य श्रीमदिंदिराकांत तीर्थस्वामी अत्यंत संतोषित झाले, कारण - गोकर्णमठसंस्थानचे अधिपति सर्वही गुरुमहाराज स्ववर्णाश्रमोचित धर्म राखणारे व स्ववर्गीयांकडून राखविणारे होत. (५/८) ॥११॥

ततः पुरस्ताद्गुरुराजभृङ्गो गच्छन्नयं वृत्तपुरीमवाप्य।
नम्रोऽभवतत्र समाधिवर्तिजीवोत्तमाङ्घ्र्यम्बुजयोःसहर्षः ॥१२॥

त्यानंतर तिकडून पुढे निघालेले गुरुमहाराजरूपी भ्रमर भटकळास पोहेचले व तिकडे समाधिस्थ श्रीजीवोत्तमतीर्थ गुरुमहाराजांच्या चरणरूपी कमलांच्याठायी आनंदाने लीन झाले.

तात्पर्य काय ? - भ्रमर ज्याप्रमाणें एक ठिकाणाहून निघतो, कमलांस शोधीत जातो व कमल दिसतांच संतोषानें त्याच्याठायीं मकरंद पिण्याकरितां आसक्त होतो. त्याप्रमाणे - हे श्रीमदिंदिराकांतीर्थ गुरुमहाराज कुमठा शहराहून निघाले, जात जात भटकळास पोहचले, आणि संतोषाने समाधिस्त श्रीजीवोत्तमतीर्थ गुरुमहाराजांच्या चरणानां आपल्यावर गुरुप्रसाद होण्याकरिता नमस्कार करिते झाले. ॥१२॥

संपूजितोऽभून्नरसिंहनाम्ना[१] गुरुः स पौराणिकपुंगवेन ।
तत्रापि तत्प्रार्थनया रजन्यां तपस्विराजोऽकथयत्पुराणम् ॥१३॥

तेथे श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुत नरसिंह पौराणिकांनी या गुरुमहाराजांचे आदरातिथ्य केले; मग रात्रीच्या वेळी पुराण सांगण्याकरिता त्या पौराणिकांनी प्रार्थना केल्यामुळे या गुरुमहाराजांनी तेथे पुराण सांगितले. ॥१३॥

१ हे पौराणिक या गुरुमहाराजांचे पूर्वाश्रमीचे जनक होत.

नित्यं पुराणवचसा नरहर्षकोऽपि पौराणिकः स्वयमहो स सुहर्षमाप्नोत् ।
यत्याननेन्दुसृतवाग्वरचन्द्रिकायां सक्तस्तदा नरचकोरधरेश्वरः सन् । ।।१४।।

अहाहा!!! सदासर्वदा आपण पुराण सांगून लोकांस अत्यंत संतुष्ट करणारे असे ते नरसिंहपौराणिक होते तरी, जेव्हा हे गुरुमहाराज पुराण सांगूं लागले तेव्हां, या गुरुमहाराजांचे पुराण ऐकण्यास जमलेल्या जनरूपी चकोरपक्षांत आपण राजा होऊन या गुरुमहाराजांच्या वदनरूपी पौर्णिमेच्या चंद्रापासून निघालेल्या वाणीरूपी चांदण्यात आसक्त होत्साते ते नरसिंहपौराणिक अत्यंत संतुष्ट झाले.

तात्पर्य काय ? - चकोरपक्षी हे चांदणें पान करणारे असतात; त्यांतही पौर्णिमेचें चांदणें तर त्यांस अत्यंत प्रिय असतें; पौर्णिमेच्या चांदण्यात चकोरराजा हा अनेक चकोरांनी युक्त होऊन चांदणे पान करून अत्यंत संतुष्ट होतो त्याप्रमाणे - हे गुरुमहाराज पुराण सांगतात असे वर्तमान ऐकून पुराण श्रवण करण्यास पुष्कळ मंडळी जमली होती; त्या मंडळीत नरसिंह पौराणिक आपण मुख्य श्रोते झाले; या गुरुमहाराजांचे पुराण श्रवण करून जमलेली सर्व मंडळी अत्यंत संतुष्ट झाली; हे नरसिंह पौराणिक तर फार फार संतुष्ट झाले; अहाहा!!! धन्य आहे या गुरुमहाराजांची पुराण सांगण्याची शक्ति; कारण ते नरसिंहपौराणिक सदासर्वदा आपण पुराण सांगून लोकांना अत्यंत संतुष्ट करणारे असतांही त्यांना ह्या गुरुमहाराजांचे पुराण ऐकून आनंद झाला !!! ।।१४।।

ततः पुरो गर्भपुरं प्रपद्य स्वीये मठे विट्ठलमाद्यमार्च्य।
तीर्थप्रसादेन निजान्प्रसाद्य चित्तं न्यधत्ताशु स रौप्यपीठे ।।१५।।

त्यानंतर हे गुरुमहाराज तेथून पुढें बसरूरास जाऊन, स्वकीय मठांत श्रीदिग्विजयविट्ठलाची व श्रीवीरविट्ठलाची पूजा करून, स्ववर्गीय लोकांस आपला अनुग्रहसूचक श्रीतीर्थप्रसाद देऊन, पुढे श्रीक्षेत्र उडपि येथे जाण्यास तयार झाले. ।।१५।।

हंसो महारजतपीठमवाप्य सोऽयं पूजां प्रगृह्य विहितां खलु पक्षिभिः स्वैः।
पूर्णं रसेन वहुना निजमानसाब्जं श्रीकृष्णलोकपतये प्रसमार्पयद्धि ।।१६।।

असे ते परमहंस श्रीगुरुमहाराजरूपी हंसपक्षी तेथून निघून पूज्य अशा श्रीक्षेत्र उडुपिरूपी सत्यलोकस्थ ब्रह्मदेवाच्या कनकासनास पोंचून आपल्या पक्षाचे स्ववर्गीय लोक हेच कोणी एक अन्य हंसपक्षी यांनी केलेला पूजासत्कार स्वीकारून मोठ्या भक्तिरूपी मकरंदानें पूर्ण भरलेल्या आपल्या मनरूपी मानससरोवरांतून आणिलेले कमल जगदीश्वर श्रीकृष्णरूपी ब्रह्मदेवास आदरपूर्वक अर्पण करिते झाले.

तात्पर्य काय ? - ब्रह्मदेवाचा वाहनभूत हंसपक्षी हा, पुष्कळ मकरंदाने भरलेले कमल मानससरोवरांतून उपटून घेतो, तेथून निघतो, सत्यलोकी ब्रह्मदेवाच्या कनकासनाजवळ जातो, तेथे आपल्या जातीच्या हंसपक्ष्यानीं केलेला वहुमान स्वीकारितो आपण आणिलेले ते कमल कनकासनावर बसलेल्या ब्रह्मदेवास आदरपूर्वक अर्पण करितो. त्याप्रमाणे हे गुरुमहाराज श्रीमदिंदिराकांततीर्थस्वामी बसरूराहून निघाले, श्रीक्षेत्र उडुपीस पोहोंचले, तेथें स्ववर्गीय लोकांनी केलेले पादपूजादिक स्वीकारिते झाले, आणि तेथील श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्य प्रतिष्ठित कृष्णास आपलें मन आदरपूर्वक अर्पण करिते झाले, - अर्थात् तेथे त्यांनी श्रीकृष्णाची मानसपूजा केली. ।।१६।।

ततः पुरस्तादगमत्स मूलिका पुरीं पुरस्थैरथ पूजितोऽभवत् ।
तत्रत्य उग्रो नरसिंहदेवः शान्तस्तदाभूत्तदुदर्चिताङ्घ्रिः ।।१७।।

मग तेथून पुढे ते गुरुमहाराज मुल्की येथे पोहोंचले; तेथे ग्रामस्थ लोकांनी त्यांची पूजा केली; तेथील श्रीमदुग्रनरसिंहदेवाची या गुरुमहाराजांनीं अत्यंत भक्तीने पूजा केली; तेव्हा तो नरसिंहदेव स्वतः उग्र असला तरी या गुरुमहाराजांच्या मोठ्या भक्तीने केलेल्या पूजेने शांत झाला; - अर्थात - संतुष्ट होऊन यांवर फार प्रसन्न झाला. ।।१७।।

इन्दिरासुरतमन्दिरं ततस्तुङ्गगेहमपि मङ्गलापुरम्।
दण्डधारिजनचण्डगुर्गुरुः शान्तिमदनुरपि दान्तिमानयात् ॥१८॥

तेथून निघालेले हे इंद्रियदमन करणारे गुरुमहाराज, आपण स्वतः थंड (शांत) व गोड गोड बोलणारे असे असले तरी दंडधारि यतिजनांस 'चंडगु' म्हणजे क्रूर बोलणारे असे होऊन, म्हणजे सूर्य होऊन, उन्नत उन्नत घरांनी गजबजलेल्या व लक्ष्मीदेवीचें क्रीडागृह बनलेल्या अशा मंगळूरास पोहोंचले.

तात्पर्य काय ? - इंद्रियांना जिंकलेले, शांत व गोड गोड बोलणारे असे हे यतिश्रेष्ठ गुरुमहाराज मुल्कीहून निघाले ते, श्रीलक्ष्मीदेवीच्या अनुग्रहास पात्र झालेल्या व उन्नत उन्नत घरांनी गजबजलेल्या मंगळूरास पोहोंचले. ॥१८॥

पौरोत्पूजितपादः प्राचरदस्मिन्निजे स्थले स्थित्वा।
व्रतमथ चातुर्मास्यं विष्णुपदेऽसौ रतो रसी चाब्दः ॥१९॥

मग तिकडे सर्व शहरांत राहणाऱ्या विद्वान् अशा वैदिक व गृहस्थ लोकांनी या गुरुमहाराजांचे भक्तियुक्त उत्तम आदरातिथ्य केले. श्रीवीरविठ्ठलाच्या चरणी आसक्त झालेले हे गुरुमहाराज तेथे आपल्या मठात राहून चातुर्मास्य व्रत आचरिते झाले - म्हणजे मेघ हा उदकानें भरलेला असून आकाशांत आपल्या जागी येऊन पुरस्थ लोकांनी केलेला बहुमान स्वीकारून आपले चातुर्मास्य व्रत योग्य रीतीने तेथे आचरितो त्याप्रमाणे यांनी केले असे म्हणण्यास हरकत नाही ॥१९॥

कलिदुर्गमयात्सस्वः कलिं जेतुमिव प्रयन् ।
अथो बण्ट्वाळमार्गेण यतिराण्मङ्गलापुरात् ॥२०॥

चातुर्मास्य व्रत संपल्यानंतर हा यतिराजरूपी राजा, आपल्या परिवारजनांनी व विभवांनी युक्त होऊन, मंगळुरांतून निघून, कलिपुरुषास जिंकण्याकरिताच की काय, बण्ट्वाळमार्गानें कलिदुर्ग म्हणजे कलिकोट येथे पोहोचले.

तात्पर्य काय ? - कलिपुरुषाला प्रियभूत असा अधर्म नष्ट करणारे हे गुरुमहाराज, चातुर्मास्य व्रत संपल्यानंतर आपल्या परिवारजनांनीं व नाना वैभवांनीं युक्त होऊन मंगळूर सोडून निघाले ते, बंट्वाळमार्गानें कलिकोट येथे पोहोंचले. ॥२०॥

तत्रस्थ एवास्मरदेषयोगी गोश्रीपुरीसंस्थितवेङ्कटेशम्।
श्रीगौडसारस्वतवंशजानां महाजनानामभयप्रदं हि ॥२१॥

तेथेच राहून हे गुरुमहाराज आपल्या मनाने श्रीगौडसारस्वत ब्राह्मणवर्गीय महाजनांना अभय देणारा व गोश्रीपुरी म्हणजे कोच्चीन येथे विराजमान होणारा जो श्रीवेंकटेश भगवान्, त्याचे स्मरण करिते झाले. ॥२१॥

महाजना यत्र महामनस्काः श्रीमध्वशास्त्रामृतपानसक्ताः।
सदासदाचारपरायणाः श्रीकृपाकटाक्षोत्तमलक्ष्यभूताः ॥२२॥

प्रसिद्धमाटेषु विराजते श्रीगोश्रीपुरी भूमितले प्रसिद्धा।
वरैः सुपूर्णा सकलोपभोगैः पुरीवरा सा ह्यमरातीव ॥२३॥

कोचिन येथे असणारे महाजन हे महानुभाव श्रीमध्वशास्त्ररूपी अमृत पान करण्याविपयी तत्पर, सदोदित स्ववर्णाश्रमोचित धर्म राखणारे व श्रीमहालक्ष्मीदेवीच्या कृपाकटाक्षाला उत्तमप्रकाराने पात्र झालेले आहेत. पुरीश्रेष्ठ अशीही कोच्चिपुरी या भूलोकी प्रख्यात अशा मातृदेशांत सुप्रसिध्द आहे, उत्तमप्रकारच्या व तऱ्हेतऱ्हेच्या सुखसाधनीभूत स्रक्चंदनादिकांनी परिपूर्ण असून सर्वप्रकारे देवपुरी अमरावतीसारखी आहे. ॥२२॥२३॥

संतर्पणं तत्र सदा द्विजानां सहस्रसंख्यादिकसंख्यकानाम् ।
नानासुमिष्टौदनशाकपूर्णं श्रीवेङ्कटेशस्य सदोत्सवोऽपि ॥२४॥

व त्या कोच्चिन्पुरींत दररोज उत्तमप्रकारे तऱ्हेतऱ्हेचें भक्ष्य शाकपायस वगैरेनी युक्त असे हजारो गौडसारस्वत ब्राह्मणांचे अन्नसंतर्पण होत असते व श्री वेंकटेशाचा उत्सव सदोदित होत असतो. ॥२४॥

इति योगीश्वरस्तत्र स्मृत्वा गोश्रीपुरीमपि।
हर्षपूरयुतो गौडसारस्वतजनार्चितः ॥२५॥

या प्रकारें हे गुरुमहाराज कलिकोट येथे कोच्चिन्पुरीचें वैभव आठवून अतिसंतुष्ट झाले; त्या कलिकोटांत गौडसारस्वतब्राह्मणांनी तर यांचे पुष्कळ आदरातिथ्य केले ॥२५॥

ततो योगिमेघो हरिप्रेरितः सन्भवार्केण तप्ताञ्जनांस्तत्रतत्र ।
स्वकारुण्यनीरेण शान्तान्विधाय श्रयन्रङ्गनाथं नतो विष्णुपादे ॥२६॥

तेथून निघालेला हा गुरुमहाराजरूपी मेघ, श्रीमन्नानारायणरूपी वायूनें प्रेरित होत्साता, पूर्वदिशेकडे जात असता. त्या त्या स्थळीं संसाररूपी सूर्यांने संतप्त झालेल्या लोकांना आपल्या अनुग्रहरूपी उदकाने थंड करीत, श्रीरंगक्षेत्र येथे जाऊन श्रीरंगनाथभगवंताच्या चरणरूपी आकाशाच्या ठायी नम्र झाला.

तात्पर्य काय ? - ज्याप्रमाणे मेघ हा, वायूनें प्रेरित होऊन, पश्चिम दिशेंतून पूर्वदिशेकडे जात असता, त्या त्या स्थळी सूर्याने संतप्त झालेल्या लोकांना आपल्या उदकाने थंड करीत, विवक्षित स्थळी पोहोंचून, आकाशाच्या ठायी नम्र होतो म्हणजे लीन होतो. त्याप्रमाणे - हे गुरुमहाराज, श्रीमन्नारायणा कडून प्रेरित होऊन, पश्चिमदिशेकडील कलिकोट येथून पूर्वदिशेकडे जात असता, त्या त्या स्थळी संसाराने संतप्त झालेल्या लोकांना आपल्या अनुग्रहाने थंड करीत, श्रीरंगक्षेत्री पोहोंचून श्रीरंगनाथ भगवतांच्या चरणी नम्र झाले म्हणजे नमस्कार करिते झाले ॥२६॥

कर्तव्यं कर्म तत्सर्वं कृत्वा तत्र यतीश्वरः।
क्रमेण मधुरामापद्धनुष्कोटिं ततोऽपि च ॥२७॥

तेथे हे गुरुमहाराज जे जे सोपस्कार करावयाचे असतात ते ते (कावेरी स्नानादिक) यथाविधि करून, तेथून क्रमाने मधुरेस व तेथून धनुष्कोटिसही पोहोंचले. ॥२७॥

धनुष्कोटौ निमज्यासौ दृष्ट्वा सेतुं च माधवम् ।
रामेश्वरं पुनः प्राप्य रामचन्द्रं तथास्मरत् ॥२८॥

तेथे यथाविधी धनुष्कोटितीर्थात स्नान करून, सेतूचे दर्शन घेतले, पुनः सेतुमाधवाची व रामेश्वराची भेट घेऊन श्रीरामचंद्राचे स्मरण करिते झाले. ॥२८॥

श्रीदर्भशयनं गत्वा ततो नत्वा स राघवम् ।
कुम्भघोणं ततः प्राप्य कावेर्यां स्नानमातनोत् ॥२९॥

तिकडून श्रीदर्भशयनास येऊन, श्रीरामाला नमस्कार करून, तेथून कुंभघोणांत येऊन, कावेरीत स्नान करिते झाले. ॥२९॥

अथो कञ्चीं समागत्य नत्वा श्रीवरदायकम् ।
ततो योगीश्वरः सोऽयं प्रापच्छ्रीवेङ्कटाचलम् ॥३०॥

हे यतिवर्य पुढे कंची येथे जाऊन तेथे श्री वरदराजाला नमस्कार करून पुढे श्री वेंकटगिरीस पोहोंचले. ॥३०॥

स्नात्वा पुष्करिणीतीर्थे वराहं प्राप्य योगिराट् ।
श्रीनिवासं स साष्टाङ्गमानमद्भक्तितो मुहुः ॥३१॥

श्रीपुष्करिणीतीर्थात स्नान करून वराहदेवास भेटून, श्रीनिवासाचे दर्शन घेऊन त्याला भक्तिपूर्वक अनेकदा साष्टांग नमन करिते झाले. ॥३१॥

स पापनाशिनीतीर्थे स्नानं कृत्वा यथाविधि।
कल्याणोत्सवतो योगी श्रीनिवासमतोषयत् ॥३२॥

विध्युक्तप्रकारे पापनाशिनीतीर्थात स्नान करून, कल्याणोत्सवाने श्रीनिवासास अत्यंत संतुष्ट करिते झाले. ॥३२॥

दिनत्रयमुषित्वा स श्रीनिवासस्य पर्वते।
नानाविधान्नतस्तत्र द्विजातीन्समतर्पयत् ॥३३॥

हे गुरुमहाराज, त्या वेंकटगिरीवर तीन दिवस राहून, तरेकवार अन्नादिकांनी ब्राह्मणांचे संतर्पण करिते झाले. ॥३३॥

पद्मावतीमथ प्राप्य गत्वा पद्मसरोवरम् ।
अपश्यदेष मध्वस्य सिध्दान्तोन्नाहिनीसभाम् ॥३४॥

तेथून गुरुमहाराज, पद्मसरोवर येथें गेले व श्रीपद्मावतीची भेट घेऊन, तेथील श्रीमध्वसिध्दांतोन्नाहिनीसभामंदिर पाहते झाले. ॥३४॥

सद्वाहैररूणाम्बरेण च युतो गोभिस्तमो नाशय -
न्नज्ञानाभिधमाप्रसारितकरो लोकैः प्रसंपूजितः।
तिष्ठन्सच्छिबिकारथेऽथ जनहृन्नेत्राम्बुजोद्बोधकः
सक्तो विष्णुपदेऽगमत्स परमो हंसो मठग्रामकम् ॥३५॥

त्यानंतर हा परमहंस श्रीमदिंदिकाराकांततीर्थ गुरुमहाराजरूपी सर्वोत्कृष्ट सूर्य उत्तम प्रकारचे वाहकलोकरूपी अश्व व रक्त अशा काषाय वस्त्ररूपी सारथीभूत अरुणाने युक्त आकाशाने संयुक्त होत्साता, आपली वचने हीच किरणे यांनी अज्ञान या नांवाचा अंधकार नाश करीत, 'दानधर्म करणे हेच जग प्रकाशित करणे' आपले हात हीच कोणी किरणे लोकांत नित्य विस्तार करून, 'अर्घ्य, नमस्कार' इत्यादिके करून लोकांनी आदरपूर्वक पूजित होत्साता, उत्तम प्रकारच्या पालखीरूपी रथात बसून, लोकांची हृदये व नेत्ररूपी कमलांना जागृत करीत, श्रीमन्नारायणाच्या चरणरूपी अंतरिक्षात आसक्त होऊन, मठग्राम म्हणजे पश्चिमदिशेतील मडगांव येथे पोहोचला. ॥३५॥

तात्पर्य काय ? - सर्वोत्कृष्ट सूर्य हा, उत्तम प्रकारच्या घोड्यांनी व सारथी अरूणाने युक्त अशा आकाशाला मिळत असतो, आपल्या किरणांनीं अंधकार नाश करितो, जग प्रकाशित करण्यासाठी आपले किरण लोकांत सतत फेंकतो, 'अर्घ्य, नमस्कार' इत्यादिकेकरून आदरपूर्वक लोकांकडून पूजित होतो, उत्तमप्रकारच्या रथांत बसलेला असतो, कमलांना विकसित करितो व अंतरिक्षांतून पूर्वदिशेहून पश्चिमदिशेस येतो. त्याप्रमाणें उत्तम प्रकारच्या वाहक लोकांनी युक्त असणारे, रक्त असें काषायवस्त्र धारण करणारे, आपल्या वचनांनीं लोकांचें अज्ञान नाश करणारे, दानधर्म करण्यासाठी आपले हात लोकांत सतत उचलणारे. हे गुरुमहाराज, उत्तमप्रकारच्या पालखीत बसून, श्रीमन्नारायणाचे चरण स्मरण करीत, लोकांची हृदयें व डोळे प्रफुल्लित करीत, 'पाद्य, अर्घ्य, नमस्कार' इत्यादिकेंकरून आदरपूर्वक पूजित होत्साते, पद्मसरोवराहून निघाले ते मडगांव येथे पोंहचले. ॥३५॥

क्षत्राणि हत्वा बहुधा धरित्र्यां दत्त्वा धरित्रीं किल विप्रराड्भ्यः।
प्राप्य प्रदेशं जलधेः सकाशाच्छ्रीभार्गवः कोङ्कणदेश आसीत् ॥३६॥

पूर्वी श्री परशुराम हा या भूतलावर अनेकदा क्षत्रियांचा नाश करून, ब्राह्मणश्रेष्ठांला भूमिदान करून, आपणास राहण्याकरितां समुद्राकडून काही जागा घेऊन, त्यापैकी कोंकणदेशांत आपण राहिला होता. ॥३६॥

हव्यादि कृत्यं हि निजं विधातुं श्रीगौडसारस्वतविप्रवर्यान् ।
आनीय रामो निजगौडदेशादावासयामास निजे प्रदेशे ॥३७॥

मग तो श्रीपरशुराम, आपली हव्यकव्यादिकृत्ये चालविण्याकरिता पूर्वीच्या आपल्या गौडदेशातून सांगवेदशास्त्रसंपन्न श्रीगौडसारस्वतब्राह्मणवर्यांना आणून, आताच्या आपल्या कोंकणदेशात ठेविता झाला. ॥३७॥

यत्र स्थितास्ते वरभूमिदेवा गोमन्तकं तस्य पुराणनाम ।
गोवेति नामाधुनिकं प्रसिध्दं सा पोर्तुगाल्राजवशाधुना हि ॥३८॥

ह्या कोंकणदेशापैकी ज्या भागी हे ब्राह्मणश्रेष्ठ [२]राहिले होते, त्या भागाचे नांव गोमंतक[३]असे पुराणप्रसिध्द आहे. अर्वाचीन नाव गोवा म्हणून लोकप्रसिध्द आहे; ती ही गोवापुरी आता (इ.स. १९०४) पोर्तुगाल राजाच्या अधीन आहे. ॥३८॥

---

१. श्रीमद्भागवते दशमेस्कन्धे त्रिपञ्चाशततमेऽध्याये -
'गोमन्तं पर्वतश्रेष्ठं तुङ्गद्रुमलतान्वितम् ॥१॥'
'वसन्तं साग्रजं रम्ये गोमन्ते पर्वतोत्तमे ॥१३॥'
२ श्रीमन्मध्वविजये दशमे सर्गे -
'स शंकरपदद्विजोपहृतमाप्य गोवाख्यगां
गरिष्ठकदलीलसद्दशशतीचतुष्कं चरन्।
पयः कलशपञ्चकत्रिकयुगाभिपूर्णं पपा-
वदृष्टगतिरप्यभून्नृपनृमण्डलैरुद्यतैः ॥५२॥
३ गोवा प्रांत.

सर्वेऽपि लक्ष्मीपतयो हि यस्यां यस्यां हि वाणीपतयोऽपि सर्वे ।
सर्वे रतीशा धनदाश्च सर्वे गोभिः सुधागुं दरयन्ति सर्वे ॥३९॥
यस्यां पशूनां पतयोऽपि सर्वे वज्रप्रदीप्ता अपि गन्धवाहाः ।
हाहा हि सर्वे सकला हि हुह्वो भानुं प्रभावेन जयन्ति सर्वे ॥४०॥
सर्वेऽपि दस्रा धिषणाश्च सर्वे श्रीगौडसारस्वतभूमिदेवाः
संराजते भूमितले हि सेयं गोवापुरी देवपुरीं जयन्ती ॥४१॥

महावैभवांनी युक्त झालेली ती गोवापुरी, सर्वप्रकारे देवपुरी अमरावतीला जिंकणारी होत्साती, सर्वोत्कृष्टपणानें या भूतलावर विराजमान आहे; कारण - देवपुरीत (स्वर्गातील) देव असतात, या गोवापुरीत श्रीगौडसारस्वत हे भूदेव (ब्राह्मण) आहेत; देवपुरीत प्रत्येक देव एका एका पदवीला पोहोचलेला असतो, या गोवापुरीत सर्वही श्रीगौडसारस्वतभूदेव सर्वही पदवींना पोहोचलेले आहेत; ते असे - देवपुरींत लक्ष्मीदेवीचा पति उपेंद्र हा एकटा असतो, या गोवापुरीत सर्वही श्रीगौडसारस्वतभूदेव संपत्तीने लक्ष्मीपति झालेले आहेत. त्या देवपुरीत सरस्वतीचा पति ब्रह्मदेव हा एकटा असतो, या पुरी सर्वही भूमिदेव[1] विद्येनें सरस्वतीपति झालेले आहेत. त्या पुरीत रतीचा पति मदन हा एकटा असतो, या पुरीत सर्वही[2] रमण करण्याविषयी किंवा सौंदर्याने रतिपति झालेले आहेत. त्या पुरींत धन देणारा कुबेर हा एकटा असतो, या पुरीत सर्वही दरिद्रीलोकांस धन देतात वरून धनद झालेले आहेत. त्या पुरीत सुधागुं[3] म्हणजे अमृताची गो म्हणजे किरणे ज्याचीं असतात असा चंद्र हा एकटा असतो, परंतु-त्या सुधागु चंद्राला भीति घालणारे असे सर्वही आपल्या अमृतसमान गो म्हणजे वचनांनीं सुधागु झालेले या पुरींत आहेत. तसेच - त्या पुरीत नंदिका या पशूचा पति महादेव हा एकटा असतो. या पुरींत सर्वही गाई घोडे वगैरेचे पशूंना रक्षण करणारे पशुपति झालेले आहेत. त्या पुरीत वज्रायुधाने प्रकाशमान असा वज्रप्रदीप्त इंद्र हा एकटा असतो, या पुरीत सर्वही वज्रांनीं म्हणजे हिऱ्यांनीं प्रकाशमान असे वज्रप्रदीप्त झालेले आहेत. त्या पुरीत गंधवाह म्हणजे वायु हा एकटा असतो. या पुरींत सर्वही 'गुलाब, हिना, जाई, जुई, अंबर, पाच, केवडा, बकुळी, वाळा, चमेली. मोतिया, दौणा' वगैरे अत्तरे 'बेलिया, मोगरा, मसाला, वगैरे सुगंधि तेले व चंदन, कस्तुरी, इत्यादि सुगंधि पदार्थ धारण करितात यावरून गंधवाह झालेले आहेत. त्या पुरींत 'हा हा हा हा हा'

---

१ श्रीगौडसारस्वतब्राह्मण. २ भूमिदेव. ३ 'गोस्त्रियोरूपसर्जनस्य' (१/२/४८) इति पाणिनिः

असें गायन करणारा हाहा हा एकटा असतो, या पुरीत सर्वही 'हा हा हा हा हा' असे गायन करितात वरून हाहा झालेले आहेत, त्या पुरीत 'हू हू हू हू हू' असें गायन करणारा हूहू हा एकटा असतो, या पुरीत सर्वही 'हूहूहूहूहू' असें गायन करितात वरून हूहू झालेले आहेत. त्या पुरीत प्रभावाने म्हणजे लखलखीत तेजाने युक्त असा प्रभावी सूर्य हा एकटा असतो, परंतु - त्या प्रभावी सूर्याला जिंकणारे असे सर्वही आपल्या प्रभावाने म्हणजे द्रव्यभांडार व परिवार जनांचे साहाय्य यांनी उत्पन्न झालेल्या सामर्थ्याने प्रभावी झालेले आहेत. तसेच त्या पुरींत वैद्यशास्त्र जाणणारे असे दस्र म्हणजे अश्विनीकुमार हे दोघे असतात, या पुरींत सर्वही वैद्यशास्त्र जाणतात वरून दस्रच झालेले आहेत; आणि त्या पुरीत सर्वही जाणणारा असा धिषण[1] म्हणजे वृहस्पति हा एकटा असतो, या पुरीत सर्वही एकंदर जाणतात या वरून धिषणच झालेले आहेत.

तात्पर्य (स्पष्ट आहे.) ॥३९॥४०॥४१॥

अस्यां गोवापुर्यां नन्दनवन्या हरन्गुरुं गर्वम् ।
स हि सहसुमनोद्विजवरवारवशो राजते मठग्रामः ॥४२॥

देवपुरीला जिंकणाऱ्या या गोवापुरीच्या मध्यभागी, तो (७/३५) हा मडगांव, नंदनवनाचा मोठा गर्व हरण करणारा होत्साता; विराजमान असतो; कारण - ते नंदनवन हे इंद्रादिक देव, मंदारपारिजातादि पुष्पे, हंसचकोरचक्रवाकशुकपिकादि उत्तम पक्षि, उर्वशी मेनका रंभा तिलोत्तमादि अप्सरा स्त्रिया, व हस्तिन्या यांनी भरलेले असे यावरून 'सहसुमनोद्विजवरवारवश' झाले आहे; तो मडगांव हाही मल्लिकाचंपकजातिगुलाबपारिजातादि पुष्पे, सद्विद्याबुध्दिमान् असे श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठ, शुकपिकमयूरादि उत्तम पक्षि अति मनोरम अशा वारस्त्रिया व गाई यानी भरलेला आहे. यावरून 'सहसुमनोद्विजवरवारवश' झाला आहे.

तात्पर्य काय ? - (स्पष्ट आहे.) ॥४२॥

---

१ धिषणा 'बुद्धिः' अस्यास्तीति धिषण; 'अर्शआदिभ्योऽच्' (५/२/१२७) इति पाणिनिः.

संपूजितोऽभूद्धि धरासुरेशः कुशेशयाक्षो विबुधावलीभिः ।
शङ्खेन लक्ष्यः खगवाहकोऽस्मिञ्छ्रीमानयन् योगिहरिस्तदानीम् ॥४३॥

भूमिदेव (ब्राह्मण) रूपी देवांचा स्वामी जो, कमलासारखे डोळे ज्याचे, शंखाने लक्ष्य जो, पक्ष्यासारखे वाहक लोकरूपी गरुड वाहक ज्याचा व कांति किंवा संपत्तिरूपी लक्ष्मीने युक्त जो, असे हे यतिवर्य श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादरूपी विष्णु, जेव्हा नंदनवनाचा गर्व हरण करणाऱ्या या मडगांवात पोहोंचले, तेव्हा समस्त विद्वान् असे श्री गौडसारस्वतब्राह्मणरूपी भूदेव यांनी त्यांचे महासंभ्रमाने आदरातिथ्य केले.

तात्पर्य काय ? - देवांचा राजा जो, कमलांसारखे डोळे ज्याचे, असा तो विष्णु लक्ष्मीसहवर्तमान, गरुडावर बसून, आपले आगमन सूचविण्याकरिता शंख वाजवितो, जेव्हा नंदनवनात पोहोचवतो, तेव्हा समस्त देव त्याचे महावैभवपुरःसर आदरातिथ्य करितात. त्याप्रमाणे - ब्राह्मणांचे स्वामी जे, कमलांसारखे डोळे ज्यांचे, कांतिमान् व संपत्तिमान् जे, असे हे यतिवर्य श्रीमदिंदिराकांततीर्थश्रीपाद, वेगवान् अशा वाहक लोकांनी धारण केलेल्या पालखीत बसून शंखध्वनिपुरःसर, जेव्हा या मडगांवात पोहोचले, तेव्हा सर्व विद्वान् वैदिक व गृहस्थ अशा श्री गौडसारस्वतब्राह्मणांनी त्यांचें महावैभवपुरःसर आदरातिथ्य केले. ॥४३॥

ततः स्वीयं मठं प्राप्य योगी पर्वतकानने ।
श्रीरामचन्द्रदेवेशमनमद्भक्तिपूर्वकम् ॥४४॥

हे गुरुमहाराज तेथून निघाले ते पर्तगाळीत आपल्या मठात पोहोचले; व तेथील श्रीरामदेवास साष्टांगनमस्कार करिते झाले. ॥४४॥

संतर्पणेन विप्राणां श्रीरामाय महामतिः ।
महायात्रं समर्प्यासौ व्यराजत निजे मठे ॥४५॥

हे महानुभाव यतिवर्य तेथे ब्राह्मणसंतर्पणपूर्वक ती महायात्रा श्रीरामदेवाला आदरपूर्वक समर्पण करून आपल्या मठात शोभते झाले ॥४५॥

हेमलम्बिगतमार्गशीर्षके मङ्गलेऽह्न्यसितषष्ठिकातिथौ ।
मुक्ततामथ गतोऽगकानने हन्त हा नरहरिर्यतिः स हि ।।४६।।

नंतर काही दिवसांनी म्हणजे हेमलंबिसंवत्सर मार्गशीर्षमास कृष्णपक्ष षष्ठी मंगळवारी नरहरीतीर्थ (७/९) हे पर्तगाळीत या नश्वर देहाचा परित्याग करून स्वयं मुक्त झाले. ।।४६।।

अन्नं च दुग्धं गुडशर्करादिकं त्यक्तं हृषीकेशमुदे ततः परम् ।
तेनेन्दिराकान्तमुनीश्वरेण हि प्रीतिः परेशस्य महाप्रसादिनी ।।४७।।

त्यानंतर या श्रीमदिदिंकांततीर्थ गुरुमहाराजांनी इंद्रियांचा अभिमानी देव जो, त्या हृषीकेशपरमात्म्याच्या अतिप्रीतीसाठीच इंद्रिये अतिशय कृश करावी म्हणून प्रसिध्द अन्न, दूध, गूळ, साखर वगैरे पौष्टिक पदार्थांचा त्याग केला. परमात्म्याची अतिप्रीति ती कशी असते ? - परमात्म्याची अतिप्रीति ही मोक्षाला कारणीभूत अशा परमात्म्याच्या महाप्रसादाला कारण असते. ।।४७।।

संत्यक्तवानन्नपयोगुडादि प्रियस्वशिष्यस्य वियोगतोऽयम् ।
इत्याहुरत्रत्यनरा हि केचिद्युक्तं न तध्दि प्रविरक्त एषः ।।४८।।

परंतु तेथील काही लोक असे म्हणतत की, 'या गुरुमहाराजांनी आपल्या प्रिय शिष्याच्या (७/४६) विरहजन्य संतापाने प्रसिध्द अन्न, दूध, गूळ, साखर वगैरे पदार्थ त्याजिले.' परंतु कवि म्हणतो की, 'त्या लोकांचे हे म्हणणे योग्य दिसत नाही; कारण हे गुरुमहाराज अत्यंत विषयविरक्त आहेत; त्यामुळे त्या आपल्या नश्वर शिष्यशरीराचा विरह ह्या अशा विरक्त महान् सत्पुरुषांना संतापविण्यास कारण कसा होईल बरे ! ।।४८।।

अथो भीरथीस्नानं कर्तुकामो महामनाः ।
निर्गत्य स महाशैले चातुर्मास्यं समाप्तवान् ।।४९।।

त्या नंतर हे यतिराज काही दिवसांनी भीमरथीत स्नान करण्यासाठी निघून गेले ते महाशैल (म्हाशेल) (१९०० सन) येथे राहून चातुर्मास्य व्रत समाप्त करिते झाले. ।।४९।।

ततोऽथो शृङ्खलाग्रामं गत्वा तत्र सुरालयम् ।
दृष्ट्वा बिम्बं त्रिमूर्धानं द्विपादं तत्र षट्करम् ॥५०॥

विलक्षणस्वरूपं स प्रतिष्ठापितमैक्ष्य च।
विस्मितः सन्नवादीन्नृंस्तत्रत्यान्किमिदं जनाः ॥५१॥

नंतर तेथून हे यतिराज सांखळी येथें पोहोचले; तेथे त्यांनी एक नूतन देवालय पाहिले व त्यात प्रतिष्ठित केलेली अशी एक मूर्तीही पाहिली. 'तिला तीन तोंडे, दोन पाय व सहा हात वगैरे होते व तिचे स्वरूप तर वैदिकलौकिक धर्माच्या अगदी उलट आहे, असे समजून या यतिवर्यांनी तेव्हाच तेथील लोकांकडे असे विचारले की, 'अहो! हे स्वरूप कोणाचे आहे?' ॥५०॥५१॥

ते दत्तात्रयमित्येव प्राबुवन्यतिरब्रवीत् ।
मातात्रयं कदा मर्त्या जायेतात्र सुरालये ॥५२॥

तेव्हा ते लोक म्हणाले की, 'हे दत्तात्रयाचे स्वरूप आहे.' पुनः यतिवर्य म्हणाले की, 'तर या देवालयात मातात्रयांचे स्वरूप केव्हा उगवणार आहे?' ॥५२॥

तात्पर्य काय ? - अत्रिऋषीला दत्त, दुर्वास व सोम असे तीन पुत्र होते; त्यात दत्त हा विष्णु, दुर्वास हा रुद्र (१/१५), व सोम हा चंद्र असून त्यावर ब्रह्माचा आवेश मात्र होता, कारण ब्रह्माला या लोकी अवतार नसतो अत्रीच्या पुत्रास आत्रेय[१] म्हणतात, दत्तात्रेय म्हणण्याचा तो अत्रीचा पुत्र विष्णूच; त्याला अशी तीन तोंडे वगैरे नसतात; एक तोंडाच्या दत्तात्रेयाची उपासना ती अभीष्टदात्री होय; द्वैतसिध्दांताप्रमाणे ब्रह्मा, विष्णु व महेश्वर यांची ऐक्योपासना अत्यंत अनिष्टदात्री होय, तसेच विष्णूची उपासना सर्वोत्तमत्वाने व लक्ष्मीब्रह्मरुद्रादिकांची उपासना तारतम्याने करावी लागते; द्वैतसिद्धांतात रुद्राचा द्वेष करावा असे सांगितले नाही, उलट इंद्रचंद्रादिकांना आरंभ करून तृणपर्यंत सर्व मुक्तियोग्य जीवांना तो तारकमंत्राचा उपदेष्टा आहे. यावरूनच वैष्णवांचा गुरुवर्य असा विष्णुभक्त रुद्र होय, म्हणून द्वैत्यांनी रुद्राची उपासना वैष्णवगुरुवर्यत्वाने अवश्य करावी लागते, असे न करता उलट रुद्राचा द्वेष करणारे लोक किंवा रुद्राच्या ठायी अपूज्यताबुध्दि असणारे लोक खरोखरी द्वैतसिध्दांत न

१ 'इतश्चनिञः' (४/१/११२) इति पाणिनिः

जाणणारे होत; रुद्राचा द्वेष तो दोन प्रकारचा असतो, तो असा - 'विष्णु, ब्रह्मा व रुद्र हे तिघेही एकच होत म्हणून अशा समजूतीने किंवा उपासनादिकांनी घडणारा द्वेष तो पहिल्या प्रकारचा, व 'आह्मी वैष्णव आहो, रुद्र हा शैवांचा देव होय, यावरून आम्ही त्याची उपासना सर्वथा करू नये.' इत्यादि प्रकारच्या अज्ञानाने किंवा निंदादिकांनी घडणारा द्वेष तो दुसऱ्या प्रकारचा.' आता - व्यावहारिकदशेत ब्रह्मा, विष्णु, रुद्र, इंद्र, चंद्र, घट, पट वगैरे सर्व पदार्थांना परस्पर भेद आहे तरी, पारमार्थिकदशेत 'ब्रह्मा, विष्णु व रुद्र हे तिघेही एकच ब्रह्म' इतके मात्र नव्हे, तर 'इंद्र, चंद्र, घट, पट वगैरे सर्व पदार्थही एकच ब्रह्म' असे म्हणणाऱ्या अद्वैती शंकरादिपूर्वाचार्यांनी किंवा निदान एकट्याने तरी, व्यावहारिकदशेत 'ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांची तीन तोंडे व सहा हात वगैरे अत्रिपुत्र एकट्या दत्तात्रेयाला आहेत किंवा त्या रीतीने उपासना करावी.' असे म्हटले आहे की काय ? नूतन गुरुचरित्रकर्त्यानें 'ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांची तीन तोंडे व सहा हात वगैरें एकट्या दत्तात्रयाला आहेत असे म्हटले आहे. उद्या 'मातात्रय म्हणून एक आहे त्याला किंवा तिला सरस्वती, लक्ष्मी व गौरी यांची तीन तोंडे व सहा हात वगैरे आहेत.' असे नूतन मातृचरित्रकर्त्याने म्हटले असता ते तुम्ही मान्य कराल किंवा काय ? 'पारमार्थिक दशेत ब्रह्मा, विष्णु व रुद्र हे एकच ब्रह्म आहे.' असे जाण्याकरितां व्यावहारिकदशेतील अत्रिपुत्र दत्तात्रेयाला त्यांची तीन तोंडे वगैरे केली आहेत असे म्हणत आहात. तर - पारमार्थिकदशेत घट, बैल, माकड वगैरे सर्व पदार्थ हें एकच ब्रह्म आहे.' असे जाणण्याकरिता व्यावहारिकदशेतील अत्रि पुत्र दत्तात्रेयाला घटाचे तोंड, बैलाचे शिंग व माकडाचे केश वगैरे केले असता नुकनास तरी काय आहे? -

सारांश काय ? - अद्वैत्यांनी अशा स्वपूर्वाचार्यानुक्त तीन तोंडाच्या दत्तात्रेयाची उपासना करणे हे युक्त होत नाही. अथवा अशा उपासकांनी दत्तात्रेयमत किंवा गुरुचरित्रमत म्हणून नवीन तरी एक पंथ काढला पाहिजेच; तेव्हा ते शांकरमताचे अद्वैति होणार नाहीत. नवीन दत्तात्रेयमताचे किंवा गुरुचरित्रमाचे अद्वैति बनणार. द्वैत्यांनी तर अशा तीन तोंडांच्या दत्तात्रयाची उपासना सर्वथा करूच नये; कारण - द्वैतसिध्दांताप्रमाणे ईश्वरद्रोहास किंवा गुरुद्रोहास तसले उपासक पात्र होतील; सर्वोत्तमत्वाने अत्रिपुत्र विष्णुरूप एकतोंडी दत्तात्रेयाची उपासना करावीच, वैष्णवगुरुवर्यत्वाने अत्रिपुत्र रुद्ररूप एकतोंड दुर्वासआत्रेयाची उपासना करावी, व प्रकृतिबध्दजीवोत्तमत्वाने अत्रिपुत एकतोंड सोमात्रेयाच्या ठायीं आविष्टचतुर्मुखस्वरूप ब्रह्माची उपासना करावी. ॥५२॥

ततः कोह्लापुरं प्रापत्तत्र वैभवतो यतिः
रघुनाथाभिधानेन राजमित्रेण पूजितः ॥५३॥

तेथून हे यतिवर्य कोल्हापुरास पोहोचले; तेथील महाराजांचे स्नेही रघुनाथराव शिरगांवकर यांनी या यतिवर्यांचे महावैभपुरःसर आदरातिथ्य केले. ॥५३॥

लक्ष्मी तत्र समभ्यर्च्य ततः कृष्णामयाद्यतिः ।
स्नात्वा तत्र विधानेन प्रागाद्भीमरथीतटम् ॥५४॥

नंतर तेथे हे यतिराज लक्ष्मीदेवीची पूजा करून, त्या पुढे कृष्णानदीस पोहोचले; तेथे यथाविधि स्नान वगैरे करून, पंढरपुरास गेले. ॥५४॥

तत्र स्नात्वा विधानेन पाण्डुरङ्गं समार्चयत् ।
अथो गोवां स संप्राप्य प्रार्चयच्छ्रीमहालसाम् ॥५५॥

तेथेही विधिपूर्वक स्नान वगैरे करून, श्रीरुक्मिणीविठ्ठलाची पूजा करून, तेथून परत गोवेस येऊन म्हाड्डोळ येथे श्री महालसेची पूजा करिते झाले. ॥५५॥

शैलकाननमाप्यैनां यात्रां रामाय चार्पयत् ।
एवं तत्र स मौनीशः कृतकृत्यो व्यराजत ॥५६॥

तेथून पर्तगाळीस येऊन ही यात्रा श्रीरामदेवाला अर्पण करिते झाले; या प्रमाणे हे मुनिश्रेष्ठ श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादवडेर कृतकृत्य होत्साते पर्तगाळी मठात विराजमान झाले. ॥५६॥

स्वसंप्रदायरक्षायै स वृत्तीः समपादयत्
तथा विद्याभिवृद्ध्यर्थ विद्येच्छूनप्यपाठयत् ॥५७॥

पुढे स्वकीय मठसंप्रदायास दौर्बल्य प्राप्त होऊ नये म्हणून यांनी पुष्कळ वृत्ति म्हणजे शेतेभाते वगैरे संपादन केली; आणि विद्येची अभिवृद्धि व्हावी म्हणून अन्नादिदानपुरःसर विद्यार्थ्यांना आपणच काव्यादि वेदातांत शास्त्र पढवूं लागले. ॥५७॥

धनदानेन धीरोऽयं पाठशालाभिरक्षणे ।
तत्रतत्र स्वकीयेभ्यःकरोति च सहायताम् ॥५८॥

आणि त्या त्या स्थळी स्ववर्गीय वेदशास्त्रांच्या पाठशालांचे रक्षण व्हावे म्हणून वुद्धिमान् हे यतिराज स्वयं स्ववर्गीयांना द्रव्यद्वारा साहाय्यही करिते झाले व आताही करीत आहेत. ॥५८॥

अथो मुनिर्ब्रह्मपुरीमयदयं तत्र स्थितैरुत्सवतोऽर्चितोऽभवत् ।
श्रीगौडसारस्वतविप्रपार्थिवै-र्विद्वद्वरैः स्वाचरणे परायणैः ॥५९॥

हे यतिवर्य काही दिवसानी पर्तगाळीहून ब्रह्मपुरी म्हणजे लोलिये येथे आले; तेव्हा स्ववर्णाश्रमोचित धर्म रक्षण करण्याविषयीं तत्पर म्हणजे सदाचारसंपन्न व सांगवेदवेदांतशास्त्रांमध्ये महाप्रवीण अशा तेथील समस्त वैदिक व गृहस्थ श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठांनी गुरुमहाराजांची मोठ्या उत्सवाने पूजा केली. ॥५९॥

आनन्दवान्वैदिकवज्रिणोऽभवच्छ्रीश्रीधराचार्यसुतस्य संगमात् ।
श्रीरामचन्द्रस्य स सूक्ष्मदृष्टेः स्वेषां गुरूणां दयितस्य तस्याम् ॥६०॥

हे यतिवर्य त्या लोलियेत महासूक्ष्मविचारशील, म्हणूनच निजगुरुचरण श्रीमत्पद्मनाभतीर्थ श्रीपादस्वामिमहाराजांचे पूर्ण प्रीतिपात्र व वैदिकशिखामणि असे श्रीश्रीधराचार्यसुत श्रीरामचंद्राचार्य या वृध्द पंडितवर्यांच्या समागमाने मोठे हर्षभरीत झाले. ॥६०॥

सोऽप्याचार्यवरतस्य मुनीन्द्रस्य सुसंगमात् ।
आनन्दवांस्तदा जातश्चन्द्रस्येव महोदधिः ॥६१॥

ते आचार्यश्रेष्ठ श्रीरामचंद्राचार्यही ज्याप्रमाणे महासमुद्र हा चंद्राच्या समागमाने आनंदाने उचंबळतो, त्याप्रमाणे या यतिवर्यांच्या समागमाने आनंदाने उचंबळले. ॥६१॥

ततः प्रयन्स योगीन्द्रस्तत्रतत्र महाजनैः।
अर्चितः प्रापदात्मज्ञः स्वीयैर्युक्तः शहापुरम् ॥६२॥

पुढे परापरतत्वज्ञानवान् यतिवर्य आपल्या परिवारजनासहवर्तमान वाटेवरील त्या त्या स्थळी स्ववर्गीय जनांनी केलेला पूजासत्कार स्वीकारीत शहापूर येथे पोहोचले. ॥६२॥

स्वङ्गा-घनान्ता वरवेदविद्यावाणी पदन्यासवरा सुवर्णा ।
चारुस्वरा नृत्यति यत्र नित्यं श्रीगौडसारस्वततुण्डरङ्गे ॥६३॥

उत्तमप्रकारची वेदांगे म्हणजे ''शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिःशास्त्र व छन्दःशास्त्र' हीच 'घ्राण, हात, तोंड, कान, डोळे व पाय' आहेत. शरीरांगे जिची, घनपाठरूपी कांस्यतालादि वाद्याने निश्चय केली जाते जी, अथवा, घनपाठरूपी शरीराचा अतिसूक्ष्म असा मध्यप्रदेश आहे जिचा, पदपाठाच्या आवृत्तिरूपी पायांच्या न्यासांनी श्रेष्ठ आहे जी, उत्तमप्रकारचे 'अ, ग्नि, मी, ळे-' (ऋ. १/१/१) इत्यादि अक्षररूपी शोभन आहे. शरीराचा वर्ण जिच्या व मनोहर असे उदात्तानुदात्तदि स्वर हाच मन हरण करणारा असा कंठस्वर आहे जिचा, ती श्रेष्ठ वेदविद्यारुपी सरस्वती ही, त्या शहापुरांतील श्रीगौडसारस्वतब्राह्मणांच्या मुखकमलेरूपी रंगस्थळांत सदोदित नर्तन करीत आहे, -

तात्पर्य काय ? - सरस्वती ही रङ्गस्थळांत नर्तन करीत असते, 'घ्राण, हात, तोंड, कान, डोळे व पाय' ही शरीरांगे तिला उत्तम प्रकारचीं असतात, कांस्यतालादि वाद्यांच्या नादाने 'आता रंगस्थळात सरस्वती आली आहे.' असा जन निश्चय करितात, तिच्या शरीराचा मध्यप्रदेश फार सूक्ष्म असतो, ती नर्तन करीत असताना भरतशास्त्राप्रमाणे उत्तमप्रकारचे पायांचे न्यास करीत असते. तिच्या शरीराची कांति अति शोभायमान असते, व तिचा कंठस्वर श्रोत्यांचे मन हरण करणारा असतो. तद्वत त्या शहापुरात पुष्कळ श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठ आहेत, ते नित्य वेदपाठी आहेत, 'शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिःशास्त्र व छंदःशास्त्र' हि वेदांगें ते पढलेले आहेत. ते धनपाठ पर्यंत पढलेले असून पदपाठाच्या आवृत्ति करीत असतात, त्यांच्या तोंडांतून 'अ, ग्नि, मी, ळे-' इत्यादि अक्षरे शुद्ध निघालेली असतात आणि त्यांच्या तोंडांतून निघालेले उदात्तानुदात्तादिस्वरही मनोहर असतात. ॥६३ ॥

लक्ष्मीप्रदाः प्रोद्यततुण्डचन्द्रा रत्नाश्रयाः शर्करिलाः समुद्राः ।
श्रीगौडसारस्वतविप्ररूपा राजन्त्यगाधाश्च सरस्वतीपाः ॥६४॥

आणि संपत्तिरूपी लक्ष्मी देणारे जे, वर आलेले असून प्रकाशमान आहेत वदनेंदुरूपी चंद्र ज्यांचे, नवरत्नाला आधार जे, खडीसाखर व पिठीसाखररूपी वाळुकेने युक्त जे, अतिगंभीर जे, व विद्यारूपी नदीना राखणारे जे, पुष्कळशा सोन्याच्या व रुप्याच्या नाण्यांनी परिपूर्ण असे ते श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठ एतद्रूप समुद्र, त्या शहापुरांत विराजमान आहेत -

तात्पर्य काय ? - समुद्र हा श्रीमन्नारायणाला लक्ष्मी देणारा होय, समुद्रांतून चंद्र हा वर आलेला असून प्रकाशमान असतो, समुद्रांत नवरत्नें पुष्कळ असतात. समुद्रांत वाळुका पुष्कळ असते. समुद्राच्या तलाचा अंत लागत नाही आणि समुद्र हा सर्व नद्यांना उदक देऊन किंवा त्यांचा पति झाल्यामुळे त्यांना राखणारा असतो. त्या शहापुरात विराजमान असे श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठ हे गरीबांना संपत्ति देणारे होत, त्यांची तोंडे प्रकाशमान असतात, त्यांच्याकडे नवरत्ने पुष्कळ असतात, त्यांच्या घरी खडीसाखर व पिठीसाखर पुष्कळ भरलेली असते, त्यांच्याकडे सोन्याची व रुप्याची नाणी पुष्कळ असतात. ते अतिगंभीर असतात म्हणजे त्यांचा दुसऱ्याला अंत लागत नाही आणि ते संस्कृत व प्राकृत विद्या आपण पढून दुसऱ्यांना स्वतः किंवा द्रव्यद्वारा पढवून विद्या राखणारे असतात. ॥६४॥

योगीश्वरस्तत्र समर्चितः सन्स्वीयैः परैश्चादरतो द्विजेशैः।
मासद्वयं वासमधत्त मर्त्यान्मध्वागमात्तत्त्वमुपादिशच्च ॥६५॥

अशा त्या शहापुरात हे यतिवर्य पोहोचल्यावेळी तेथील स्वकीय समस्त श्रीगौडसारस्वतब्राह्मणश्रेष्ठांनी व परकीय देशस्थब्राह्मणश्रेष्ठांनीही मोठ्या प्रेमाने या यतिवर्यांचे आदरातिथ्य केले; नंतर हे यतिवर्य तेथे सुमारे दोन महिने राहिले; त्या वेळी या यतिवर्यांनी श्रीमन्मध्वशास्त्रास अनुसरून तेथील लोकांना तत्त्वमार्गाचा बराच उपदेश केला. ॥६५॥

मा यात मा यात कदापि मानवा मायाविना निर्मितशस्त्रमार्गतः।
सौख्येच्छवो गच्छत गच्छतानिशं श्रीमध्वसंदर्शितशास्त्रमार्गतः ।।६६।।

संसारदुःखित, शाश्वतसौख्यापेक्षि लोक हो! तुम्ही त्या मार्गावरून केव्हाही जाऊं नका. जाऊ नकां कोणत्या मार्गावरून?- माया या नावाच्या असुरीचा अंगीकार केला आहे ज्यांनी, अशा त्या मायाविजनांनी रचिलेल्या मार्गावरून. कारण - तो मार्ग शस्त्रांनी भरलेला असतो; तात्पर्य - सौख्यासाठी शस्त्रावर पाय ठेविला असता जसे सौख्य न होता उलट दुःखाला मात्र कारण होते, तसे त्या मायाविजनांनी रचिलेल्या मार्गावरून जाणाऱ्या सौख्यापेक्षि लोकांना किंचित्ही सौख्य न होता उलट ते शाश्वत महादुःखास मात्र कारण होते. तर कोणत्या मार्गावरून गेलो असता शाश्वत सौख्यास पोहोचू? - श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यांनी कृपा करून दाखविलेल्या सच्छास्त्ररूपी मार्गावरून गेले असता शाश्वत सौख्यास पोहोचाल. ।।६६।।

श्रीमन्मध्वमते हरिःपरतरः सत्यं जगत्तत्वतो
भेदो जीवगणा हरेरनुचरा नीचोच्चभावं गताः
मुक्तिर्नैजसुखानुभूतिरमला भक्तिश्च तत्साधनं
स्वक्षादित्रितयं प्रमाणमखिलाम्नायैकवेद्यो हरिः ।।६७।।

श्रीमन्मध्वाचार्यांच्या म्हणजे श्रीमदानंदतीर्थभगवत्पादाचार्यांच्या मतातील मुख्य सारांश कोणता ? - जड, जीव व ईश असे तीन पदार्थ असतात, हे तीनही पदार्थ सत्य असतात, 'जड व जीव' हे सदासर्वकाळ ईशाधीन असतात, या जडजीवांना यथायोग्य परिमित व नानाप्रकारच्या अपूर्णशक्ति असतात; 'जीव व ईश' हे नित्य असून बरोबरीने म्हणजे अवियुक्तपणाने असतात, हा जीवेशांचा अवियोग सत्य असून नित्य असतो; जडाला ज्ञान नसते व सुखदुःखाद्यनुभवही नसतो, जीवेशांना ज्ञान असते, परंतु अल्प ज्ञान जीवाला व सर्व ज्ञान ईशाला असते, जड दोन प्रकारचे, नित्य व अनित्य, व्याप्त असलेली 'प्रकृति, अव्याकृताकाश, अकारादि अक्षरे व कालप्रवाह' ही नित्य जडे असतात आणि व्याप्त असलेला क्षणलवादिकाल व ईशाने जीवांचा उपयोगासाठी किंवा लीलेने प्रकृतीस उपादान करून निर्मिलेली व अव्याप्त असलेली अशीं 'सत्त्व, रज व तम' असे तीन गुण व महत्तत्व, अहंकारतत्व, बुध्दि, मन, घ्राण,

---

१ हा श्लोक अन्यग्रन्थस्थ होय; याचा अर्थाकडे बरेच लक्ष द्या.

रसना, चक्षु, श्रोत्र व त्वक्' ही पांच ज्ञानेंद्रिये, 'वाक्, पाणि, पाद, गुद व उपस्थ' अशीं पांच कर्मेंद्रिये, 'शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध' अशा पांच मात्रा, 'आकाश, वायु, अग्नि, जल व पृथ्वी' अशी पांच भूते, ब्रह्मांड व ब्रह्मांडांतर्गत पांच भूते आणि तज्जन्य घटपटादि जडपदार्थ'' ही अनित्य जडे होत. जीव यथायोग्य अपरिपूर्णसच्चिदानंदादिपरिमितगुणपूर्ण असून सावयव असतो, आपण अस्वतंत्र झाला तरी ईशदत्त स्वातंत्र्यांनी यथायोग्य युक्त झाल्यामुळे स्वतंत्र झालेला असतो, जीव ते दोन प्रकारचे, नित्यमुक्त व प्रकृतिबद्ध, नित्यमुक्त लक्ष्मी एकटीच आणि प्रकृतिबध्द ब्रह्मरुद्रेंद्रचंद्रादि तृणपर्यंत अनंत आहेत, यांतही 'ब्रह्मजीव निरनिराळे अनंत, रुद्रजीव निरनिराळे अनंत, इंद्रजीव निरनिराळे अनंत' याप्रकारे प्रत्येक जीवांचे गणही अनंत अनंत असतात, हे प्रकृतिबद्ध जीव परिमाणानें अणु असतात; नित्यमुक्त लक्ष्मी व ईश हे दोघे परिमाणाने 'अणु, मध्यम व महान्' असे असतात, कारण - ते दोघे स्वशक्तीने निरनिराळी रूपे धरितात, म्हणूनच प्रकृतिबद्ध जीवासारखे अव्याप्तच नसून व्याप्तही असतात; ईश तो हरि एकटाच, तो नित्यमुक्त असून सर्व स्वतंत्र परिपूर्णसच्चिदानंदाद्यनंतगुणपरिपूर्ण अनंताद्भुतपरिपूर्णनानाविधशक्तिमान् व सावयव असतो, तो ईश सकल जडजीवांहून श्रेष्ठ असतो, ईशाहून श्रेष्ठ किंवा ईशासमान दुसरा कोणीही नसतो; जीवात 'त्याहून हा इतक्या गुणांनी कमी, हा इतक्या गुणांनी त्याच्या समान व हा त्याहून इतक्या गुणांनी श्रेष्ठ असे तारतम्य सत्य असून नित्य असते; 'जडजडांना परस्पर भेद, जीवजीवांना परस्पर भेद, जडजीवाना परस्पर भेद, जडेशांना परस्पर भेद व जीवेशांना परस्पर भेद' असे हे भेद सत्य असून नित्यही असतात; हे परिदृश्यमान जग सत्य असून अनित्य म्हणजे नश्वर आहे म्हणून पूर्वीच सुचविले आहे; सकल सच्छास्त्रांनी मुख्यत्वें ईश एकटाच ज्ञेय असतो आणि जडजीव अमुख्यत्वेच ज्ञेय असतात; असाक्षात्कारि पुरुषांनी ईश हा कशा रीतीने जाणिला जातो? - सकल सच्छास्त्रांनी; ती सच्छास्त्रे कोणती? - 'ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, उपनिषदे, भारत, पंचरात्रागम, पुराणें, मूलरामायण, ब्रह्ममीमांसाशास्त्र आणि एतदनुकूल ग्रंथ' ही सच्छास्त्रे; दुःशास्त्रे कोणती? - सच्छास्त्रांना अनुकूल नसलेली ती सर्वही दुःशास्त्रेच; प्रकृतिबध्द जीव तो कसा असतो? जीवाच्या सायवय स्वरूपाला अंगरख्यासारखे प्रकृतीचे एक आवरण असते, त्यालाच लिंगदेह म्हणतात, तो लिंगदेह जीवस्वरूपाला चिकटून असेपर्यंत शाश्वतस्वस्वरूपानन्दाद्यनुभव जीवाला होत नसून उलट 'जनन, मरण, स्वर्ग, नरक' वगैरे अनर्थ प्राप्त होऊन याच असार संसारात लोळत असतो; प्रकृतिबध्द जीव कितीप्रकारचे? - 'तमोयोग्य,

नित्यसंसारि व मुक्तियोग्य' असे तीन प्रकारचे; तमोयोग्य जीव कोण? 'मीच ईश किंवा ईशच मी, सर्वही ईशच किंवा ईशच सर्व, ईशाला गुण नाही, ईशाला आकार नाही.' इत्यादि भ्रमज्ञानाने ईशद्रोहाला पात्र होत्साता जो जीव वायूच्या गदेच्या तडाक्याने फुटून लिंगदेहातून मुक्त होऊन अंधंतमरूपी नित्य नरकात पडून शाश्वतस्वस्वरूपदुःखानुभव घेतो तोच तो तमोयोग्य; नित्य संसारी जीव कोण? -'ईश श्रेष्ठ किंवा मी श्रेष्ठ, ईश कनिष्ठ किंवा मी कनिष्ठ' इत्यादि ज्ञानाविषयी औदासीन्यबुध्दीने राहून किंवा संशयज्ञानाने केवळ दुःखप्रधान अशा या आत्मात्मीय स्त्रीपुत्रादिरूप संसाराचा असार किंचित्सुखानुभव घेण्याविषयी तत्पर असून ईशौदासीन्याला पात्र होत्साता जो जीव वायूच्या हुंकाराच्या नादश्रवणाच्यायोगाने भीतीनें झडून लिंगदेहातून मुक्त होऊन नित्यसंसारात घुसून शाश्वतस्वस्वरूपसुखदुःखानुभव घेतो तोच तो नित्यसंसारी; मुक्तियोग्य जीव कोण? विरजानदीच्या स्नानाने गळून लिंगदेहांतून मुक्त होऊन जो जीव 'श्वेतद्वीप, अनंतासन व वैकुंठ' रूपी नित्यलोकांपैकी कोणत्याही स्वयोग्य लोकांत जाऊन स्वेच्छेने नानाप्रकारच्या उपभोगांनी शाश्वतस्वस्वरूपानंदानुभव घेतो तोच तो मुक्तियोग्य; विरजानदीचे स्नान कसे होईल? - ईशाच्या साक्षात्कारानें; ईशाचा साक्षात्कार तो कसा होईल? - ईशाच्या अनुग्रहानें; ईशाचा अनुग्रह कसा होईल? ईशमाहात्म्यज्ञानपूर्वक ईशाच्या ठायी सुदृढ भक्तीनेयुक्त अशा ईशध्यानानें; ईशमाहात्म्यज्ञान म्हणजे काय? - 'ईश हा लक्ष्मीब्रह्मरुद्रादिकांहून अनंतानंतगुणांनी श्रेष्ठ, त्याच्या समान किंवा त्याहून श्रेष्ठ दुसरा नाही, परिपूर्णसच्चिदानंदाद्यनंतगुणपरिपूर्ण, सर्वस्वतंत्र, सर्वज्ञ, सृष्ट्यादिकार्याष्टककर्ता, कल्याणावयववान्' इत्यादि ईशविषयक यथार्थज्ञान जे तेच ते ईशमाहात्म्यज्ञान; आतापर्यंत सांगितलेला विषय सर्व कसा जाणता येईल? - प्रमाणांनी; प्रमाणें किती प्रकारची? निर्दोष असलेली 'प्रत्यक्ष अनमान व आगम अशी तीन प्रकारची; निर्दोष प्रत्यक्षदिप्रमाणांचे ज्ञान वगैरे कसे होईल? - सद्गुरूच्या उपदेशाने; सद्गुरु उपदेश केव्हा करील? - सुप्रसन्न झाला असता; तो सद्गुरु सुप्रसन्न कसा होईल? त्याच्याठायीं भक्ती ठेविल्याने; सारांश - संसारदुःखित शाश्वतसौख्यापेक्षी लोकांनी प्रथमतः सद्गुरूच्या ठायी येन केन प्रकारेण भक्ति करावी. (२/३,३,४) ।।६७।।

इति तत्वमुपादिश्य ततो निर्गत्य योगिराट् ।
शैलकाननमागत्य राजतेऽलं मठे निजे ॥६८॥

याप्रमाणें हे यतिवर्य श्रीमदिंदिराकान्ततीर्थ श्रीपाद वडेर महाराज त्या शहरांतून लोकांना श्रीमन्मध्वमतास अनुसरून तत्वमार्गाचा बराच उपदेश करून तेथून ते पर्तगाळीत येऊन आपल्या मठात आतां विराजमान असतात. ॥६८॥

इति सज्ज्ञानकामेन वर्णितं लेशतो मया ।
श्रीन्दिराकान्ततीर्थ श्रीपादचारित्रमिष्टदम् ॥६९॥


कवि म्हणतो - 'या प्रमाणे, सर्व मनोभिष्ट परिपूर्ण करणारे श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादवडेर गुरुमहाराजांचे आतापर्यंतचे चरित्र तत्वज्ञानाच्या प्राप्तीसाठी अल्पसे मी या ग्रंथांत वर्णन केले आहे. ॥६९॥

शाके मार्गणदृग्वसूडुपमिते संवत्सरे शोभने
श्रीमच्चैत्रिकपूर्णिमार्किदिवसे गुर्वङ्घ्रिपद्मालिनाम् ।
प्रीत्यै सप्ततिपद्यपुष्पकलितः पूर्णो रसैः सर्वदा
प्राणीतः स्तबकोऽयमस्तु कुमठा -नारायणाचार्यतः ॥७०॥


श्रीशालिवाहनशक १८२५ शोभननामसंवत्सर चैत्रमास पूर्णिमा शनिवारी श्रीकुमठा-नारायणाचार्य यांनी गुंफिलेला म्हणजे निर्मिलेला, सत्तर श्लोकरूपी पुष्पांनी युक्त असलेला, काव्यरसरूपी मकरंदानी सदोदित परिपूर्ण असा हा सार्थ श्रीगुरुपरंपरामृत ग्रंथाचा अवयव भूत स्तबकरूपी पुष्पांचा घोस, श्रीगुरुमहाराजाचे चरित्र हेच कोणी अमृत त्याचे आस्वादन करण्यासाठी श्रीमदिंदिराकांततीर्थश्रीपादवडेर गुरुमहाजांच्या चरणरूपी कमलांच्या ठायी जे भ्रमरच झाले आहेत त्यांच्या प्रीतीस हा पात्र होऊं. ॥७०॥

*इति श्रीमद्धरिगुरुभक्तश्रीकुमठा - नारायणाचार्यविरचितः सार्थे श्रीगुरुपरम्परामृते सप्तमः स्तबकः ॥७॥*

● ● ●



श्रीमद् कमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी



श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

(वृन्दावनस्थल पुण्यतिथिबोधकं नाम प्रथमं)

## १ परिशिष्टम्।

# अष्टमः स्तबकः।

नारायणमुनेश्चैत्रदर्शे वृत्तपुरे वरम् ।
गोपीनाथनदीतीरे वृन्दावनमजायत ॥१॥

चैत्रकृष्ण अमावास्येच्या दिवशी भटकळांत गोपीनाथ नदी तीरावर श्रीनारायणतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१॥

तीरे भीमरथीनद्या वासुदेवमुनेरभूत् ।
वैशाखे मासि शुक्लायां तृतीयायां समाधिभूः ॥२॥

वैशाख शुक्ल तृतीयेच्या दिवशीं पंढरपुरांत भीमरथी नदी तीरावर श्रीवासुदेवतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥२॥

जीवोत्तमयतीशस्य वृत्तपुर्यां नदीतटे
सिते भाद्रपदे जातः समाधिः पञ्चमीतिथौ ॥३॥

भाद्रपद शुक्ल पंचमीच्या दिवशी भटकळांत गोपीनाथनदी तीरावर श्रीजीवोत्तमतीर्थांचें वृंदावन स्थापन झाले. ॥३॥

पुरुषोत्तमतीर्थगुरोर्गोकर्णे रुद्रभूमितले ।
मार्गासितद्वितीयादिवसे वृन्दवनं पवित्रमभूत् ॥४॥

मार्गशीर्षकृष्ण द्वितीयेच्या दिवशी गोकर्णात रुद्रभूमीवर श्रीपुरुषोत्तमतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥४॥

अणुजीवोत्तमाख्यस्य कार्तिकासितसप्तमी ।
पुण्यतिथिर्दिचोल्याख्यग्रामे समभवद्गुरोः ॥५॥

कार्तिककृष्ण सप्तमीच्या दिवशीं दिचोलीत (डिचोली) श्रीमदणुजीवोत्तमतीर्थांचें वृंदावन स्थापन झालें. ॥५॥

ऋषिवनमठे समाधिर्वैशाखे मासि कृष्णविजयायाम् ।
श्रीरामचन्द्रतीर्थ श्रीपादस्याभवत्पवित्रतरः ॥६॥

वैशाखकृष्ण तृतीयेच्या दिवशी रिवणांतील मठांत श्रीरामचंद्रतीर्थांचे वृंदावन स्थापन झालें. ॥६॥

यतीश्वरो दिग्विजयरामचंद्राभिधानकः ।
अंङ्कोलायां माघकृष्णनवम्यां मुक्तिगोऽभवत् ॥७॥

माघ कृष्ण नवमीच्या दिवशी अंकोलेतील मठांत श्रीदिग्विजयरामचंद्रतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥७॥

स्वर्णपुर्यां पौषशुक्लपौर्णिमास्यां समाधिगः ।
रघुचन्द्रमुनिः श्रीमान्गौडसारस्वतार्चितः ॥८॥

पौष शुक्ल पूर्णिमेच्या दिवशी होन्नावरांतील मठात श्रीरघुचंद्रतीर्थांचें वृंदावन स्थापन झाले. ॥८॥

फाल्गुनासितसप्तम्यां लक्ष्मीनारायणस्य तु ।
वृन्दावनमभूद्दिव्यं गोदावर्यास्तटे शुभे ॥९॥

फाल्गुन कृष्ण सप्तमीच्या दिवशी गोदावरी नदीतीरावर श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥९॥

मार्गशीर्षे शुक्लपक्षे द्वितीयायां विमुक्तिगः ।
लक्ष्मीकान्तयतीशस्तु स्वर्णपुर्यां मठालये ॥१०॥

मार्गशीर्ष शुक्ल द्वितीयेच्या दिवशी होन्नावरांतील मठांत श्रीलक्ष्मीकांतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१०॥

अङ्कोलायां मार्गशीर्षशुक्लस्थप्रतिपत्तिथौ।
रमाकान्तयतीशस्य वृन्दावनमजायत ॥११॥

मार्गशीर्षक शुक्ल प्रतिपदेच्या दिवशी अंकोलेंतील मठात श्रीरमाकांततीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥११॥

गोकर्णे पौषमासस्य शुक्लाष्टम्यामजायत ।
यतेः श्रीकमलाकान्तनाम्नो वृन्दावनं शुभम् ॥१२॥

पौषशुक्ल अष्टमीच्या दिवशी गोकर्णांतील मठांत श्रीकमलाकांततीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१२॥

आषाढासितपक्षस्य नवभ्यां परिकीर्तितम् ।
श्रीकान्ताख्यमुनीन्द्रस्य दिनं पर्वतकानने ॥१३॥

आषाढकृष्ण नवमीच्या दिवशी पर्तगाळीतील मठात श्रीश्रीकांततीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१३॥

भूविजयरामचन्द्रकयतिराजो मार्गशीर्षशुक्लाख्ये ।
पक्षे तिथौ नवम्यामङ्कोलायां समाधिरभवच्च ॥१४॥

मार्गशीर्ष शुक्ल नवमीच्या दिवशी अंकोलेतील मठांत श्रीभूविजयरामचंद्रतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१४॥

चैत्राधिकसितपक्षे तिथौ नवभ्यामभूत्समाधिस्थः ।
वेङ्कटपुरे मुनीन्द्रो गुरुवर्यः श्रीरमानाथः ॥१५॥

अधिक चैत्रशुक्ल नवमीच्या दिवशी वेंकटापुरांतील मठांत श्रीरमानाथतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१५॥

लक्ष्मीनाथयतीशस्य बडोदायामजायत ।
वृन्दावनं मार्गशीर्षे नवम्यां कृष्णपक्षके ॥१६॥

मार्गशीर्षकृष्ण नवमीच्या दिवशी वडोदेंत श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१६॥

श्रीमदानन्दतीर्थस्य मठे पर्वतकानने ।
वृन्दावनमभूच्छ्रेष्ठं नवम्यां श्रावणे सिते ॥१७॥

श्रावणशुक्ल नवमीच्या दिवशी पर्तगाळीतील मठात श्रीमदानंदतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१७॥

श्रीमत्पूर्णप्रज्ञकयतिराजो ज्येष्ठशुक्लभद्रायाम् ।
प्रथमायां गिरिकाननमठालयेऽभूत्समाधिवरपीठम् ॥१८॥

ज्येष्ठ शुक्ल द्वितीयेच्या दिवशी पर्तगाळीतींल मठांत श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१८॥

श्रीपद्मनाभयोगीशो मठे पर्वतकानने ।
आषाढशुक्लसप्तम्यां समाधौ समतिष्ठत ॥१९॥

आषाढशुक्ल सप्तमीच्या दिवशी पर्तगाळीतील मठांत श्रीपद्मनाभतीर्थांचे वृंदावन स्थापन झाले. ॥१९॥

*इति श्रीमदग्निहोत्रिकृष्णद्वैपायनपौराणिकसुतनरसिंहपौराणिकविरचिते सार्थे श्री गुरुपरम्परामृतेऽष्टमः स्तबकः ॥८॥*

● ● ●

## २ परिशिष्टम् ।

# नवमः स्तबकः

ब्रह्मान्ता गुरवः साक्षादिष्टं दैवं श्रियः पतिः ।
आचार्याः श्रीमदाचार्याः सन्तु मे जन्मजन्मनि ॥१॥

वडेरपदवीधारं नारायणपरायणम् ।
नारायणयतिं गौडसारस्वतगुरुं भजे ॥२॥

वासुदेवगुरुं वन्दे रागदोषविवर्जितम् ।
पूतगात्रं महायात्रं नारायणकरोद्भवम् ॥३॥

विठ्ठलत्रयलब्धारं वादिराजयतिप्रियम् ।
जीवोत्तमगुरुं वन्दे विमानेन दिवं गतम् ॥४॥

कर्मसिध्दान्तसंन्यासपद्धत्यादिकृतं गुरुम् ।
श्रये श्रौतादिधर्मोपदेष्टारं पुरुषोत्तमम् ॥५॥

शान्तिमन्तमहं वन्दे दान्तिमन्तं निरन्तरम् ।
कामितार्थप्रदातारमणुजीवोत्तमं गुरुम् ॥६॥

श्रीरामचन्द्रवैदेहीससौमित्रिहनूमताम् ।
लब्धारमनिशं वन्दे रामचन्द्रयतीश्वरम् ॥७॥

येन वातेः पदोर्मूले भूतो नारायणाभिधः ।
स्तब्धीकृतो दिग्विजयरामचन्द्रगुरुं भजे ॥८॥

स्रष्टुमष्टौ मठान्येन महान्यत्नः कृतोऽपि स : ।

---

१. हा श्लोक अन्यग्रन्थस्थ होय.

विष्णुना चोदितस्त्यक्तो रघुचन्द्रगुरुं भने ।।९।।
स्रष्टुमष्टौ मठान्येन महान्यत्नः कृतोऽपिसः
विष्णुना चोदितस्त्यक्त रघुचंद्रगुरुं भजे ।।९।।

प्राप्तपत्रार्जुनच्छत्रशङ्खचामरदीपिकम् ।
भूयोभूयो भजे भक्त्या लक्ष्मीनारायणं गुरुम ।।१०।।

लक्ष्मीकान्तगुरुं वन्दे दीनसज्जनतारकम् ।
लक्ष्मीकान्तकृपापात्रं ज्ञानवैराग्यसागरम् ।।११।।

स्वान्तदोषप्रशान्त्यर्थं शान्तस्वान्तमुपाश्रये ।
लक्ष्मीकान्तकरोद्भूतं रमाकान्तयतीश्वरम् ।।१२।।

नमामि कमलाकान्तं रमाकान्तकरोद्भवम् ।
इन्द्रियाणां प्रदान्त्यर्थ प्रदान्तिं योगिदन्तिनम् ।।१३।।

श्रीकान्तचरणाम्भोजभृङ्गं निःसङ्गमानसम् ।
श्रये श्रीकान्तयोगीशं विषयासङ्गसिध्दये ।।१४।।

व्यासराजमठाधीशलक्ष्मीनाथयतिप्रियम् ।
भूत्यै भूविजयं रामचन्द्रयोगीन्द्रमाश्रये ।।१५।।

यस्य रोषाङ्कुराज्ञातो भस्मसादकरोच्छिखी ।
गृहान्दुर्हैविकाणां तं रमानाथगुरुं भजे ।।१६।।

यो बडोदामहाराजं सत्पुत्रमकरोच्छ्रितम् ।
लक्ष्मीनाथगुरुर्मेऽस्तु स मनोभीष्टदः स्तुतः ।।१७।।

आनन्दतीर्थमौनीन्द्रं सदानन्दपयोनिधिम् ।
प्रवन्दे दीनमन्दारं सदानन्दाप्तये सदा ।।१८।।

पीत्वा सम्यक्सुधासारं चरित्वा वसुधातलम् ।
वादिवारा जिता येन पूर्णप्रज्ञगुरुं भजे ॥१९॥

न्यायव्याकरणाभिज्ञं मध्वसिद्धान्ततत्परम् ।
पद्मनाभगुरुं वन्दे मध्वसिद्धान्तलब्धये ॥२०॥

वेदवेदान्ततर्कादिशास्त्रज्ञो यो निरोदनः ।
तं श्रीमदिन्दिराकान्ततीर्थं वन्दे तपोनिधिम् ॥२१॥

कमलानाथ पादाब्ज भ्रमरायित मानसम् ।
ममता रहितं वंदे कमलानाथ योगिनम् ॥२२॥

कमलानाथदोर्जातं विद्यार्थीगणसेवितम् ।
वंदे सुहास्य वदनं द्वारकानाथ योगिनम् ॥२३॥

द्वारकानाथतीर्थानां अनुग्रहसमुद्भम्
विद्याधिराजयोगीशं वंदे विद्याभिवृद्धये ॥२४॥

*इति श्रीमद्धरिगुरुभक्तश्रीकुमठा नारायणचार्यविरचितः सार्थे श्री गुरुपरम्परामृते नवमः स्तवकः ॥९॥*

*इति (गुरुस्तवनं नाम द्वितीयं) परिशिष्टम् ।*

• • •

# श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाची परंपरा

| परंपरा | स्वामीजींचें नांव | वृंदावनाचें स्थळ | महानिर्वाणाविषयींची माहिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | श्रीशक | संवत्सर | महिना | तिथि | दिवस | दिनांक |
| १. | श्रीनारायणतीर्थ | गोपी नदीच्या किनारी, भटकळ | १४३९ | ईश्वर | चैत्र | अमावस्या | सोमवार | २०.४.१५१७ |
| २. | श्रीवासुदेवतीर्थ | भीमा नदीच्या किनारी, पंढरपूर | १४४० | बहुधन्य | वैशाख | शु.३ | मंगळवार | १३.४.१५१८ |
| ३. | श्रीजीवोत्तमतीर्थ | गोपी नदीच्या किनारी, भटकळ | १५१० | सर्वधारी | भाद्रपद | शु.५ | शुक्रवार | १६.८.१५८८ |
| ४. | श्रीपुरूषोत्तमतीर्थ | गोकर्ण | १५१० | सर्वधारी | मार्गशीर्ष | व.२ | रविवार | १०.११.१५८८ |
| ५. | श्रीअणुजीवोत्तमतीर्थ | डिचोली - गोवा | १५५९ | ईश्वर | कार्तिक | व.७ | सोमवार | ३०.१०.१६३७ |
| ६. | श्रीरामचंद्रतीर्थ | रिवण - गोवा | १५८७ | विश्वावसु | वैशाख | व.३ | शनिवार | २२.४.१६६५ |
| ७. | श्रीदिग्विजयरामचंद्रतीर्थ | अंकोला | १५९० | कीलक | माघ | व.९ | रविवार | १४.२.१६६९ |
| ८. | श्रीरघुचंद्रतीर्थ | होनावर | १६०४ | दुंदुभि | पौष | शु.१५ | मंगळवार | २.१.१६८३ |
| ९. | श्रीलक्ष्मीकान्ततीर्थ | गोदावरी नदीच्या किनारी | १६२४ | चित्रभानु | फाल्गुन | व.७ | शनिवार | २७.०२.१७०३ |
| १०. | श्रीलक्ष्मीकान्ततीर्थ | होनावर | १६२९ | सर्वजित | मार्गशीर्ष | शु.२ | शनिवार | १५.११.१७०७ |
| ११. | श्रीरमाकांततीर्थ | अंकोला | १६७२ | प्रमोद | मार्गशीर्ष | शु.१ | सोमवार | १९.११.१७५० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | **श्रीकमलाकान्ततीर्थ** | गोकर्ण | १६७९ | ईश्वर | पौप | शु.८ | मंगळवार १७.१.१७५८ |
| १३. | **श्रीश्रीकान्ततीर्थ** | पर्तगाळी - गोवा | १७०८ | प्रभव | आपाढ | शु.९ | वुधवार ५.७.१७८६ |
| १४. | **श्रीभूविजयरामचंद्रतीर्थ** | अंकोला | १७२५ | रुधिरोद्गारी | मार्गशीर्प | शु.९ | वुधवार २२.११.१८०३ |
| १५. | **श्रीरमानाथतीर्थ** | व्यंकटापूर | १७२६ | रक्ताक्षी | चैत्र | शु.९ | सोमवार १९.३.१८०४ |
| १६. | **श्रीलक्ष्मीनाथतीर्थ** | बडोदा | १७४३ | वृष | मार्गशीर्प | व.९ | सोमवार २५.१२.१८२१ |
| १७. | **श्रीआनन्दतीर्थ** | पर्तगाळी | १७५० | सर्वधारी | श्रावण | शु.९ | मंगळवार १८.८.१८२८ |
| १८. | **श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ** | पर्तगाळी | १८०१ | प्रमादी | ज्येष्ठ | शु.२ | शुक्रवार २२.५.१८७९ |
| १९. | **श्रीपद्मनाभतीर्थ** | पर्तगाळी | १८१४ | नन्दन | आपाढ | शु.७ | शुक्रवार २.७.१८९२ |
| २०. | **श्रीइन्दिकान्ततीर्थ** | पर्तगाळी | १८६४ | चित्रभानु | चैत्र | व.७ | मंगळवार २६.४.१९४२ |
| २१. | **श्रीकमलानाथतीर्थ** | पर्तगाळी | १८६५ | सुभानु | चैत्र | शु.१२ | शनिवार १६.४.१९४३ |
| २२. | **श्रीद्वारकानाथतीर्थ** | पर्तगाळी | १८९४ | परिधावि | फाल्गुन | व.६ | रविवार २५.३.१९७३ |
| २३. | **श्रीमद्विद्याधिराजतीर्थ**<br>विद्यमान गुरुस्वामीजी | संन्यास दीक्षा - आश्रम स्वीकार २६.२.१९६७<br>पीटारोहण ५.४.१९७३ | | | | | |

*(काही दिनांक गणितसाधित)*

(श्रीगोकर्णमठ संप्रदायबोधकं नाम तृतीयं)

# ३ परिशिष्टम्।

१. श्रीमन्मध्वमतानुयायि वैष्णवसंप्रदायक मठ अनेक असून त्यांत सशास्त्र असे काही संप्रदाय भिन्नभिन्न प्रकारचे चालू असतातच; ते ते मठाधिपति पूर्वीपासून चालत आलेल्या आपापल्या मठसंप्रदायांप्रमाणेच चालत असून आपापल्या शिष्यवर्गासही चालवीत असतात व स्वस्वमठव्यतिरिक्तमठसंप्रदायांप्रमाणे आपण चालत नसून आपापल्या शिष्यवर्गासही चालवीत नसतात; त्यांपैकी काही संप्रदाय असे आहेत -

१. दररोज तीर्थ प्राशन करण्याच्यावेळी, आधी तीर्थ प्राशन करून नंतर तीर्थ मस्तकी एकदां धारण करण्याचा संप्रदाय असतो १, आणि आधी तीर्थ मस्तकी एकदा धारण करून नंतर तीर्थ प्राशन करण्याचाही संप्रदाय असतो २; या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा[1] होय.

२. श्रीपादस्वामी दिग्विजयास (संचारार्थ) निघाले म्हणजे प्रत्येक गांवच्या स्वकीय शिष्यवर्गातील वैदिक किंवा गृहस्थ यांनी आपापल्या घरी अगर श्रीपादस्वामींचे मुक्काम असलेल्या ठिकाणी येऊन भिक्षा (सिदा, पुडी) वगैरे प्रकारांनी श्रीपादस्वामींचा सन्मान करण्याची रीति असते; त्यांत भिक्षेच्या वेळी म्हणजे भोजनाच्या वेळी, हस्तोदक मात्र यजमानाकडून घेऊन तीर्थमात्र श्रीपादस्वामीनींच घेण्याचा संप्रदाय असतो १, आणि हस्तोदक व तीर्थही यजमानाकडूनच घेण्याचाही संप्रदाय असतो २;

या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा होय.

३. श्रीकृष्णजयंतीव्रताच्या किंवा श्रीकृष्णजन्माष्टमीव्रताच्या[2] मात्र दुसऱ्या दिवशी हरिवासर असला तर, तत्संबंधि पारणाला वगैरे प्रतिवंध मानीत नसून तो हरिवासर न काढण्याचा संप्रदाय असतो१, आणि तत्संबंधि पारणाला वगैरे प्रतिबंध मानित असून तो हरिवासर काढण्याचाही संप्रदाय असतो २; या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा होय.

---

१. श्रीगोकर्णमठाचा.

२. एकादशीव्रताचा हरिवासर तो पारणादिप्रतिबंधकत्वानें सर्व मठीयांना लागूच असतो.

४. श्रीपादस्वामींना भिक्षेकरिता किंवा पादपूजेकरिता यजमानाने घरी नेणे असल्यास श्रीपादस्वामी घरच्या दरवाज्यात पोहचल्याबरोबर श्रीपादस्वामीना पाटावर उभे करून, पायावार पाणी ओतण्याचा मात्र संप्रदाय असतो१; आणि पायांवर पाणी ओतल्यानंतर घरच्या यजमाननीने किंवा मुलगी वगैरे सुवासिनींनी राटाचें पाणी (कुङ्कुमोदक) दाखवून दीपावळी ठेऊन श्रीपादस्वामींच्या मस्तकावर किंवा पायांवर अक्षत टाकण्याचाही संप्रदाय असतो २; या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा होय.

५. श्रीपादस्वामीची पादपूजा करण्याच्या वेळी यजमानानें संकल्प करून, पादप्रक्षालादि (नैवेद्याशिवाय) पादपूजा मात्र श्रीपादस्वामीची करण्याचा संप्रदाय असतो१; आणि आधी श्रीगणपतीची व श्रीपादस्वामींच्या पादुकांची पूजा करून नंतर पादप्रक्षालनादि (नैवेद्यासह) पादपूजा श्रीपादस्वामींची करण्याचाही संप्रदाय असतो २; या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा होय.

६. आपला मठ सुचविण्यासाठी उजव्या स्तनाच्या वरच्या भागात करावयाचा पुंड्राचे (नामाचे) अग्र, खाली बारीक करण्याचा संप्रदाय असतो १; आणि वर बारीक करण्याचाही संप्रदाय असतो २; या उभय संप्रदायांपैकी पहिला संप्रदाय या मठाचा होय.

**२.** श्रीमन्मध्वमतानुयायि वैष्णवसंप्रदायक सर्व स्त्रीपुरुष महाजनांना उद्देशून काही सशास्त्र संप्रदाय लिहिण्यांत येत आहे ते हे कीं --

१ अखाद्य, अपेय, अचोष्य व अलेह्य असे पदार्थ स्वदेशांत किंवा परदेशांत अतिस्वस्त मिळूं लागले तरी त्यांकडे लक्ष्य न देता अखाद्य पदार्थ न खाण्याचा व अपेय पदार्थ न पिण्याचा वगैरे संप्रदाय अत्यंत प्रशस्त होय.

* २ विष्णु, लक्ष्मी व मुख्यप्राण या तीन देवतांचा नैवेद्य अब्राह्मणाकडून घडलेला व या तीन देवतांकडून अन्य कोणत्याही देवतेचा नैवेद्य योग्य ब्राह्मणाकडून घडलेलाही असेल तरी तो न ग्रहण करण्याचा संप्रदाय अत्यंत प्रशस्त होय.

---

* परान्न गृहण प्रसंगी हा उल्लेख लागू होतो अशें समजावे.

३. तुलसीच्या मण्याहून किंवा पद्माक्षाच्या मण्याहून इतर मणी म्हणजे रुद्राक्षमणि, भद्राक्षमणि, स्फटिकमणि वगैरे शरीरावर न धारण करण्याचा संप्रदाय अत्यंत प्रशस्त होय.

४. सुवासिनी स्त्रियांनी सौभाग्यसूचक कुंकुमाचा सरळ लांब अवर्तुल, नातिस्थूल, नातिसूक्ष्म असा तिलक कपाळावर धारण करण्याचा व कांकणे हाती धारण करण्याचा संप्रदाय प्रशस्त होय, इतर आधुनिक अप्रशस्त पध्दति सर्वथा न आचरण करण्याचा संप्रदायही अत्यंत प्रशस्त होय.

५. विधवास्त्रियांनी पुरुषांप्रमाणे श्रीच्या अंगारशेषाने सरळ लांब तिलक कपाळावर धारण करण्याचा संप्रदाय अत्यंत प्रशस्त होय याकरिता तशा स्त्रियांनी अंगारा धारण करावा.

६. ज्या केवळ नावांच्या उच्चाराने वाणी पवित्र होते ती नावे आपापल्या मुलांबाळांना ठेवण्याचा संप्रदाय अत्यंत प्रशस्त होय; म्हणजे - 'नारायण, श्रीनिवास, माधव, वासुदेव, विट्ठल, व्यास, मध्व, पूर्णप्रज्ञ, जीवोत्तम, इंदिराकांत, कृष्ण, गोविंद, दामोदर वगैरे नांवे मुलांना व इंदिरा, रमा, लक्ष्मी, कमला, सीता, सरस्वती, भारती, तुळसी, गंगा, तुंगा वगैरे नावे मुलींना ठेवावीत.'

*इति श्रीमद्धरिगुरुभक्तश्रीकुमठा - नारायणाचार्यलिखितं सार्थे श्री गुरुपरम्परामृते श्रीमदिन्दिराकान्ततीर्थश्रीपादवडेराज्ञापितं*

*(श्रीगोकर्णमठीयसंप्रदायबोधकं नाम तृतीयं) परिशिष्टम् ।*

इति सार्थ

श्रीगुरुपरम्परामृतं

विश्रान्तम् ।

● ● ●

# विसाव्या शतकांतील श्रीगुरुपरंपरा

श्रीइंदिराकान्ततीर्थ यांचा शके १८१४ (सन् १८९२)मध्ये पट्टाभिषेक झाला आणि शके १८६४ (सन १९४२) मध्ये ते वृन्दावनस्थ झाले. पन्नास वर्षांची त्यांची कारकीर्द विसाव्या शतकातील नव्या आव्हानांचा यशस्वी मुकावला करणारी ठरली. त्यांचा काळ गोकर्ण पर्तगाळी मठाच्या इतिहासांतील सुवर्णकाळच म्हणावा लागेल. लहानपणापासूनच एक असामान्य विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति होती. भटकळ येथील पुराणिक या नेमनिष्ठ आणि विद्वान घराण्यांत त्यांचा जन्म झाला. दिसायलाहि ते अत्यंत तेजस्वी होते.

वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना आश्रमदीक्षा देण्यात आली. वेद, देवांगे, काव्य, व्याकरण, साहित्य, न्याय, मीमांसा आदि प्रत्येक ज्ञानशाखांचे त्यांनी सखोल ज्ञान घेतले. गीता व ब्रह्मसूत्रे यांचा त्यांनी विशेप अभ्यास केला. मुळांत तीव्र बुध्दि, अभ्यासाची आवड आणि तासन् तास श्रम करण्याची तयारी या गुणांमुळे इंदिराकान्ततीर्थांची गणना एका विद्वान पंडितांत होऊं लागली. कुठल्याहि विषयावर ते इतक्या अधिकारवाणीने बोलत असत की त्यांची विद्वत्ता पाहून देवगुरु बृहस्पतीनेहि त्यांची पाठ थोपटावी.

श्रीइंदिराकान्ततीर्थ स्वतः कर्मठ आचार विचारांचे होते. पण बदलत्या काळाची गरज त्यांनी ओळखली होती. तरी सुध्दा शिष्यवर्गाने आपला धर्म तळमळीने आचरावा असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी पंचवीसदां भारतयात्रा केली. हिमालयातील पुण्यस्थानांचेहि दर्शन घेतले. शके १८१४ या वर्षी पीठाधिष्ठित झाल्यानंतर चार वर्षांनी त्यांनी नरहरीतीर्थ यांना संन्यासदीक्षा दिली. हेहि गुरुप्रमाणेच बुध्दिमान होते. स्वतः गुरुस्वामीनी शिप्यस्वामींच्या अभ्यासाकडे विशेप लक्ष पुरविले होते. सुमारे दीड वर्षानंतर अल्पकालीन आजार होऊन नरहरीतीर्थ समाधिस्त झाले.

श्रीइंदिराकांतीर्थांनी चारशे पृष्ठां एवढा गीतेवरील भाष्याचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे प्रशिष्य श्रीद्वारकानाथतीर्थ यांनी पन्नास वर्षांनंतर त्यांच्या या ग्रंथाची तिसरी आवृत्ती प्रसिध्द केली. गीताभाष्याशिवाय 'गीतागौरव', 'न्यायमीमांसा', 'द्वैतबोधिनी' असेही ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. सागररामाचार्य रचित श्रीमद् सुनीति भागवतावर त्यांनी टीकाहि लिहिली आहे.

शके १८६४, चैत्र वद्य सप्तमी हा त्यांच्या अवतार समाप्तीचा दिन. त्या दिवशी रात्रौ बाराच्या सुमारास ते समाधिस्थ झाले.

**श्रीकमलानाथ (२१)**

श्रीइंदिराकांततीर्थ समाधिस्थ झाल्यानंतर त्यांचे शिष्य श्रीकमलानाथतीर्थ पीठाधिष्ठित झाले. तेही एक विद्वान पंडित होते. तसेच व्यवहारांतही ते निपुण होते. श्रीइंदिराकांतांचा बहुतेक

काळ संचार आणि तीर्थयात्रा यांतच गेला. मठाचा कारभार स्वतः श्रीकमलानाथ यांनीच पाहिला. सर्व प्रकारच्या आर्थिक घडामोडी कुशलतेने हाताळून त्यांनी मठाचा आर्थिक पाया भरभक्कम केला. मठासाठी सुमारे शंभरावर ठिकाणे त्यांनी मिळवली. त्यांची गुरुभक्तीहि अतुलनीय होती. श्रीइंदिराकांतांनी सर्व कारभार जरी त्यांच्याच हाती सोपविला होता तरी कुठलीहि गोष्ट करतांना ते गुरुंचा सल्ला घेत. कारवारच्या मुरलीधर मठाची स्थापना आणि गोकर्ण व व्यंकटापुर मठाच्या जीर्णोध्दारही त्यांनीच केला.

पीठाधीश म्हणून त्यांची कारकीर्द ११ महिने वीस दिवस इतकी अल्प ठरली. श्रीइंदिराकांत शके १८६४ चैत्र वद्य सप्तमीस समाधिस्थ झाले आणि त्यांचे शिष्य गुरुभक्तपरायण श्रीकमलानाथतीर्थ यांनी शके १८६५ ह्या वर्षी चैत्र शुक्ल एकादशीस समाधी घेतली. त्यापूर्वी त्यांनी शिष्यस्वीकार केला. श्रीइंदिराकांतांनीच नियुक्त केलेल्या बटूला त्यांनी आश्रम दिला. तेच श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी होत.

**श्रीमद् द्वारकानाथतीर्थ (२२)**

श्रीमठाचे २२वे स्वामी श्रीमद् द्वारकानाथतीर्थ यांचा पट्टाभिषेक शके १८६५ मध्ये झाला व जवळ जवळ तीस वर्षे त्यांनी आपली गौरवशाली कारकीर्द समर्थपणे चालविली. या कालावधींत मठाचा कारभार अधिक योजनावध्द, सुव्यवस्थित करण्यासाठी त्यांनी उपाय योजले. पण तसे करताना अखंड परंपरा व मठाचे मांगल्य यांना कोणत्याच प्रकारे बाधा पोचणार नाही याची दक्षता घेतली आणि मठाच्या गौरवात मोलाची भर घातली. त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्व आम्हा सर्वांना सुपरिचित आहे. आसेतुहिमाचल भारत-वर्षाचा संचार करून त्यांनी शिष्यवर्गाला वेळोवेळी मार्गदर्शन केले व अनेक जीर्णोध्दाराची कामेही हातीं घेतली. त्यांचे आशीर्वाद मिळविण्याचे भाग्य आम्हा सर्वांनाच लाभलेले आहे. त्यांची विद्वत्ता, बुध्दिमत्ता, शांत प्रेमळ वृत्ति, दानशूरता, आदीचा आपण सर्वांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. मुंबई येथील द्वारकानाथ भवन व श्रीराममंदिर ही त्यांच्या गौरवशाली कारकिर्दीची स्मारके म्हणता येतील. दक्षिणेकडे संचारार्थ गेले असतां श्रीमद् द्वारकानाथ स्वामीजी यांचे दि. १५ मार्च १९७३ रोजी (फाल्गुन वद्य ६ष्टी शके १८९५) अंकोला येथील मठात महानिर्वाण झाल्यावर पर्तगाळ येथे इतर पूर्वपीठाधीशांच्या वृन्दावनालगत त्यांचे वृन्दावन उभारण्यात आले.

**श्रीविद्याधिराजतीर्थ (२३)**

श्रीविद्याधिराजतीर्थ १९७३ साली ज्या तिथीला श्रीगुरुपीठावर आले तो दिवस श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या संस्थापनेचा दिवस होता. पांच शतके पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या श्रीमठाला तोंवर बावीस पुण्यवंत स्वामीजींची अखंड परंपरा लाभली होती. श्रीविद्याधिराजतीर्थ हे परंपरेतील तेविसावे स्वामी.

श्रीगुरुपीठावर येतांच त्यांनी श्रीमठसंस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचा संकल्प जाहीर केला. पण कारकिर्दीचा शुभारंभ त्यांनी वारणासी क्षेत्रांतील श्रीसंस्थानच्या आद्य मठाच्या जीर्णोध्दाराद्वारे केला व श्रीगुरुपीठारोहणाच्या रौप्यमहोत्सवी वर्षांत (सन

१९९८) त्यांनी दुर्लभ अशी श्रीशैलक्षेत्राची (गंडकी) यात्रा करून वास्को (गोवा) येथे भव्य नूतन मठवास्तू बांधली.

१९ मार्च १९९९ (चैत्र शुक्ल द्वितीया, शके १९२१) रोजी तीन टप्प्यांनी जीर्णोध्दार व विस्तार करण्यांत आलेल्या अतिभव्य अशा पर्तगाळ येथील मुख्य मठाच्या वास्तूचें विधिवत् उद्घाटन केले. गेल्या ३१ वर्षांत श्रीस्वामीजींनी जेवढे कार्य केले तेवढे यापूर्वीच्या पांचशे वर्षांत होऊ शकले नव्हते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. श्रीस्वामीजींनी जे जे संकल्प केले ते सारे पूर्णत्वास नेले. अशा कार्यामध्ये जुन्या मठवास्तूंचे जीर्णोध्दार व विस्तार, सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती स्थापन झाल्या तेथें नूतन मठवास्तूंची बांधणी, श्रीमठाच्या कक्षेतील देवमंदिरांची डागडुजी व त्या मंदिरांमध्ये नूतन विग्रहांची प्रतिष्ठापना, यज्ञयाग व अनुष्ठानांद्वारे धर्म व धार्मिकतेच्या क्षेत्राचा विस्तार, ठिकठिकाणी चातुर्मास्य व्रताचरण करून त्या त्या परिसरांतील समाजवृंदामध्ये कुलदेव व गुरुपीठांतील श्रध्दा दृढतर केल्या, संन्यस्त जीवनाची सारी व्रते कर्तव्यनिष्ठेने पाळून आपली वैयक्तिक अध्यात्म साधना व स्वाध्यायरूपी ज्ञानार्जनाचा महायज्ञ अखंड चालू ठेवला.


विसावें शतक शेवटच्या टप्प्यांत पोंचत असताना श्रीस्वामीजी श्रीगुरुपीठावर आले व श्रीमठाचा पाया अधिक दृढ व व्यापक करून, समाज अधिक संघटित व उन्नत बनवून एकविसाव्या शतकाची संभाव्य आव्हाने पेलण्याची शक्ति समाजांत विकसित केली. दोन शतकांमधील दुवा बनताना परंपरेशीं फारकत येऊं न देतां जे कार्य त्यांनी केले त्या कार्याचा विस्तृत आढावा इतिहास घेईलच.

पीठावर आल्यापासून सामाजिक व सांस्कृतिक, त्याचप्रमाणे धार्मिक कार्यांचा व्याप सतत विस्तारत राहिला तरी पूज्य स्वामीजींनी आपली स्वाध्याय साधना अखंड चालू ठेवली. या साधनेचा कळस म्हणजे कल्याणपुर येथे सुरू केलेल्या श्रीमन्न्यायसुधा पाठाची त्याच ठिकाणी १९९८ मध्ये केलेली यशस्वी परिपूर्ति होय.

पर्तगाळ मठांतील जीवोत्तम वैदिक पाठशाळेची गुणवत्ता वाढवून शिस्तबध्द अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वेद, संस्कृत, धर्मशास्त्र, ज्योतिष आदि विषयांचे क्रमबध्द शिक्षण दिलें जातें. या पाठशाळेतून दरवर्षी सुमारे पन्नास विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असतात. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमाचें हें गुरुकुल देशभर ख्याति मिळवून बसले आहे.

मठक्षेत्राच्या पलीकडे जाऊन समाजाचे प्रश्न व त्यांची दुःखे ओळखून ती दूर करण्यासाठी दोन धर्मादाय विश्वस्त मंडळांची स्थापना केलेली आहे. स्वामी द्वारकानाथ विश्वस्त मंडळ व श्री विद्याधिराज धर्मादाय विश्वस्त मंडळ हीं ती मंडळे होत. शिक्षण, आरोग्य, सामाजिक संस्कार इत्यादि क्षेत्रांत ही मंडळे समाजाला सहाय्य करीत आहेत.

गेल्या एकतीस वर्षांत जी धार्मिक होमहवनें मठानुयायी वर्गाकडून स्थानिक देवदेवतांच्या सान्निध्यांत पूज्य स्वामीजींच्या उपस्थितींत पार पडलीं, त्यांमध्ये सहस्रकुंभ महाविष्णु, महारुद्र, शतचंडी, रक्षात्रय हवन आदि यज्ञांचा समावेश आहे.



श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

विष्णू : सर्वोत्तम : सेव्यो । वायुर्जीवोत्तमोऽपिव: ॥



श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ

